# अर्थसंवाद

खंड ६ * अंक ४ * जानेवारी–मार्च १९८३

कार्ल मार्क्स निर्वाण शताब्दी

शेतीमालाच्या किमतींचा प्रश्न

केन्द्रराज्य वित्तीय संबंध

प्रसामान्य नफा कोणत्या कार्यांचे वेतन आहे ?

भारताच्या परकीय चलन-संचयाचे प्रश्न

मराठी अर्थशास्त्र परिषद आजीव सभासद

# अर्थसंवाद साहित्य सूची

## खंड सहावा

## एप्रिल १९८२ ते मार्च १९८३


| लेख, टिपणे आणि चर्चा | पृष्ठे |
|---|---|
| अर्थसिद्धांत – चुकीचे आणि / वा चकवे | ६९ |
| आतला विरोधाभास | ५१ |
| कार्ल मार्क्स निर्वाण शताब्दि | १४१ |
| केंद्र-राज्य वित्तीय संबंध | १४९ |
| केंद्र-राज्य वित्तीय संबंध : ऋणग्रस्ततेची समस्या | ११७ |
| केन्स-शास्त्रज्ञ की राजकारणी | २० |
| परिभाषा का व कशी ? | ४५ |
| प्रसामान्य नफा कोणत्या कार्याचे वेतन आहे ? | १८३ |
| प्रा. सोवनी आणि विनिमय मूल्ये | १२२ |
| भारताच्या परकीय चलन–संचयाचे प्रश्न | १६५ |
| भारतीय करव्यवस्था | ८७ |
| महाराष्ट्रातील औद्योगिक वर्गीकरण, तौलनिकतेच्या दृष्टिकोनातून | ३२ |
| मार्क्स यांचा विस्तारित पुनरुत्पादन तक्ता : काही शंका | ७५ |
| मुक्त व्यापार संघाचा सिद्धान्त | १ |
| वि. मो. महाजनीकृत अर्थशास्त्रीय ग्रंथांची परीक्षणे | ४३ |
| वेतनाचा सीमान्त उत्पादकता सिद्धान्त : एक अनुभवनिष्ठ विश्लेषण | १०३ |
| शेतमालाच्या किमतींचा प्रश्न | ५८ |
| शेतमालाच्या किमतींचा प्रश्न – श्री. चा. अ. दाभोलकर यांना उत्तर | १७२ |

| ग्रंथ परिचय/ग्रंथ परीक्षण | पृष्ठे |
|---|---|
| आपल्या आर्थिक विकासाची समस्या | १२५ |
| समाजवादाचे अर्थशास्त्र | ७८ |
| Employment Guarantee Scheme | ८० |
| **अहवाल / पत्रव्यवहार / सूची** | |
| अर्थसंवाद : वार्षिक अहवाल – १९८१–८२ | १३१ |
| मराठवाडा विद्यापीठ पारितोषिक | ८३ |
| मराठी अर्थशास्त्र परिषद : आजीव सभासद | १८७ |
| मराठी अर्थशास्त्र परिषद : सहाव्या वार्षिक अधिवेशनाचा वृत्तांत | १२७ |

| लेखक | |
|---|---|
| कुरिअन्, सी. टी. | ५१ |
| कुळकर्णी, मुकुंद | ७५,१२२ |
| कुळकर्णी, शा. धों | १६५ |
| खांदेवाले, श्रीनिवास वि. | १८३ |
| खेर, सी. पं. | १४९ |
| खोबरे, शिवकुमार | ८० |
| गोस्वामी, सुरेश्वर | ३२ |
| घुगे, वि. बा. | ११७ |
| जोशी, अविनाश य. | ५१ |
| पानसे, रमेश | ४३,४५ |
| बापट, भ. ग. | १,७८ |
| दांडेकर, वि. म. | १४१ |
| दाभोलकर, चा. अ. | ५८ |
| देशपांडे, वसंत द. | १२५ |
| दोशी, रवीन्द्र | १०३ |
| ताडकर्णी, आनंद | ८७,१३१ |
| रारावीकर, यशवंत | १६५ |
| सबनीस, रवीन्द्र | १२७ |
| सोवनी, नी. वि. | २०,६९,१७२ |

लोककल्याणमूलस्य अर्थशास्त्रस्य सिद्धये । शोधचर्याविवादार्थं संवादोऽयं प्रवर्तितः ॥

# अर्थसंवाद

जानेवारी – मार्च १९८३
खंड ६ : अंक ४

प्रमुख संपादक : आनंद नाडकर्णी

संपादकीय पत्रव्यवहाराचा पत्ता
आनंद नाडकर्णी
अ-३, प्रबोधन को-ऑप. हौसिंग सोसायटी
६१ अ/९-१०, एरंडवणा
पुणे ४११ ००४

व्यवस्थापकीय पत्ता
रवीन्द्र सबनीस
कार्यवाह
मराठी अर्थशास्त्र परिषद, द्वारा सेंटर फॉर द स्टडी ऑफ सोशल चेंज, मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय, दादर
मुंबई ४०० ०१४

'मराठी अर्थशास्त्र परिषदे'च्या सभासदांना 'अर्थसंवाद' हक्काने मिळेल.

इतरांसाठी :
वार्षिक वर्गणी : रु. २५/–

सल्लागार मंडळ

**वि. वि. बोरकर**
**स. ह. देशपांडे**
**रवीन्द्र दोशी**
**रमेश पानसे**

साहाय्यक संपादक
प्रमोद ठोम्बरे

## आभार


( १ ) अर्थसंवाद प्रकाशनासाठी **महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ** आणि **भारतीय सामाजिक विज्ञान अनुसंधान परिषद, पश्चिम विभागीय केंद्र** यांच्याकडून अनुदान मिळाले आहे. आम्ही या दोन संस्थांचे आभारी आहोत.

( २ ) मुखपृष्ठावरील चित्र तयार करून दिल्याबद्दल तसेच एकूण सजावटीविषयी सल्ला दिल्याबद्दल **डॉ. अनिल अवचट** यांचे आम्ही अत्यंत ऋणी आहोत.


## या अंकात


१. कार्ल मार्क्स निर्वाण शताब्दी १४१

**वि. म. दांडेकर**

२. केन्द्र-राज्य वित्तीय संबंध १४९

**सी. पं. खेर**

३. भारताच्या परकीय चलन– संचयाचे प्रश्न १६५

**यशवंत रारावीकर**
**शा. धों. कुळकर्णी**

४. टिपणे व चर्चा १७२

शेतमालाच्या किमतींचा प्रश्न
श्री. चा. अ. दाभोळकर यांना उत्तर

**नी. वि. सोवनी**

प्रसामान्य नफा कोणत्या कार्याचे वेतन आहे ?

**श्रीनिवास वि. खांदेवाले**

५. मराठी अर्थशास्त्र परिषद आजीव सभासद १८७

मार्क्स क्रांतिकारक आणि पंडित असला तरी तेवढाच कुटुंबवत्सल होता. आत्यंतिक दारिद्र्यामुळे त्याची काही मुले बालवयातच मृत्युमुखी पडली होती. परंतु अशा दारिद्र्यातही त्याने कुटुंबाचे मोठ्या वात्सल्याने पालन केले होते. डिसेंबर १८८१ मध्ये त्याची पत्नी कॅन्सरने निर्वतली, आणि जानेवारी १८८३ मध्ये त्याची सर्वात पहिली आणि सर्वात लाडकी मुलगी वयाच्या अवघ्या ३८ व्या वर्षी निधन पावली. या धक्क्याने मार्क्स खचला तो सावरला नाही. १४ मार्च १८८३ रोजी आपल्या अभ्यासिकेत खुर्चीत बसल्याबसल्याच हा भौतिकवादी क्रांतिकारी तत्त्ववेत्ता आपला भौतिक देह मागे ठेवून अनंतात विलीन झाला.

१८३९ ते १८४३ म्हणजे मार्क्सच्या पंचविशीचा काळ आर्थिक मंदी, बेकारी व त्यातून निर्माण होणारे संप व अशांततेचा होता. या काळात भांडवलशाहीविरोधी क्रांतीची चाहूल त्याला प्रथम लागली. १८४२ साली जर्मनीत सायलेशियातील विणकरांनी बंडाळी केली त्यातून मोठा उत्पात होईल अशी त्याची अपेक्षा होती. याच काळात इंग्लंड-मध्ये सार्वत्रिक मतदानाच्या हक्ककारिता कामगारांच्या पाठिंब्याने चार्टिस्ट चळवळ झाली. त्यातही कामगारक्रांतीचा उगम त्यास भासत होता. त्या काळी इंग्लंडमध्ये औद्योगिक क्रांतीच्या झपाट्यात कारखान्यातील, खाणीतील कामगारांना विशेषतः अल्पवयी मुलांना अनन्वित अमानुष वागणूक मिळत असे. एंगेल्सचा इंग्लंडमधील कारखानदारीशी प्रत्यक्ष संबंध असल्याने त्याला या परिस्थितीची तीव्र जाणीव होती. 'इंग्लंडमधील कामगारांची स्थिती' हा त्याचा ग्रंथ १८४५ साली प्रसिद्ध झाला. या ग्रंथात त्या वेळच्या कामगारांच्या परिस्थितीचे विदारक वर्णन तर आहेच परंतु त्यातून जागृत होऊन भांडवलशाहीविरुद्ध लढ्यास सिद्ध होत असलेल्या कामगाराचे दर्शनही आहे वर्गकलहाच्या सिद्धांताची पूर्व-सूचना त्यात असून प्रस्थापित सत्ता उलथून पाडणे किती सुलभ आहे हे कामगारांच्या लक्षात आले की सामाजिक क्रांती अपरिहार्य आहे असा संदेश आहे. नवोदित भांडवलदारवर्गाची सत्ता कामगारांच्या आपसातील स्पर्धेवर अवलंबून आहे म्हणून ही स्पर्धा नष्ट करण्याकरता कामगार संघटनांचे महत्त्व सांगून तो म्हणतो की संपातून कामगारांना सैनिकी शिक्षण मिळते आणि त्यायोगे ते भावी पण अपरिहार्य कामगारक्रांतीस सिद्ध होतात. एंगेल्सचा हा ग्रंथ, त्यातून स्पष्ट होणारे कामगारांचे शोषण, त्याकरता सादर केलेला अधिकृत पुरावा आणि त्यात दिलेला वर्गकलहाचा संदेश मार्क्सला पुढील दोन वर्षे विचारमंथनास उपयोगी पडला. कम्युनिस्ट जाहीरनाम्याचा पहिला मसुदा एंगेल्सचाच होता.

त्याच काळात जर्मनीत प्रस्थापित राजेशाही-सरंजामशाहीविरुद्ध नवोदित भांडवलदारवर्गाचा संघर्ष सुरू होता. या संघर्षातूनच कामगारक्रांती होईल अशी मार्क्सची व एंगेल्सची अपेक्षा होती. १८४८ सालच्या कम्युनिस्ट जाहीरनाम्यातील दुर्दम्य आशावाद या भरवंशावरच होता. परंतु सुरुवातीसच सांगितल्याप्रमाणे १८४८ च्या बंडाळ्यांचा निःपात झाला आणि अपेक्षित कामगार क्रांती झाली नाही. आर्थिक मंदी आणि तज्जन्य बेकारी लवकरच संपली आणि १८५० पासून भांडवलशाहीच्या तेजीचा आणि उत्कर्षाचा काळ सुरू झाला. कामगारक्रांतीच्या आशा मावळल्या. परंतु आज ना उद्या पुनश्च आर्थिक मंदी येणार हे निश्चित आणि त्याचबरोबर कामगारक्रांती होणार हेही तितकेच निश्चित असा मार्क्सला विश्वास वाटत होता.

१८५७ साली पुनश्च मंदीची लाट आली आणि ती इंग्लंडबरोबर युरोपमधील इतर देश तसेच अमेरिकेतही पसरली. शेअरबाजार कोसळले. बँका धोक्यात आल्या. इंग्लंडमध्ये तर परिस्थिती अतिशय बिकट झाली. मार्क्स व एंगेल्स दोघांच्या क्रांतीच्या आशा पुनः पल्लवित झाल्या. १५ नोव्हेंबर १८५७ ला एंगेल्स मार्क्सला लिहितो की मँचेस्टरच्या शेअरबाजारात सर्वत्र घबराट आहे. माझ्याच चेहऱ्यावर मात्र उत्साह व हास्य आहे आणि ते पाहून सारी मंडळी दातओठ खाताना दिसतात. परंतु या आशा फार काळ टिकल्या नाहीत. लवकरच मंदी संपली आणि भांडवल-शाहीवरचे अरिष्ट पुनः टळले. कामगारक्रांती झाली नाही.

कामगारक्रांतीच्या शक्यतेविषयी मार्क्सचे मन साशंक होऊ लागले. त्या वेळी मार्क्स त्याच्या कॅपिटल ग्रंथाकरता मूलभूत टिपणे तयार करीत होता. पुढे ती ग्रुंडरिस् या नावाने स्वतंत्र प्रकाशित झाली. यांत्रिक व तांत्रिक प्रगतीतून उत्पादनशक्ती वाढवून भावी विकासाच्या अनेक दिशा व पुष्कळच वाव भांडवलशाहीस अजून उपलब्ध आहे याची जाणीव मार्क्सला होऊ लागल्याचे या टिपणांतून दिसते. या काळात ब्रिटिश भांडवलशाहीने तुफानी घोडदौड करून अमेरिकेत पश्चिमेस कॅलिफोर्नियापर्यंत, पूर्वेस आशिया खंडाच्या अंतापर्यंत आणि नव्याने

समाजपरिवर्तनाच्या मूलतत्वांची रूपरेषा त्याच्या मनात निश्चित झालेली होती. परंतु त्याचा पिंड जिज्ञासूचा असल्याने अधिक सखोल अभ्यासाचे महत्व जाणून लंडनला आल्यानंतरची निदान पंधरा वर्षे त्याने आत्यंतिक दारिद्र्य व हाल-अपेष्टा सोसून मोठ्या निग्रहाने अभ्यासात घालविली. लंडनच्या वस्तुसंग्रहालयातील ग्रंथशाळेत अहोरात्र बसून त्या वेळी प्रस्थापित असलेले सर्व अर्थशास्त्रीय सिद्धांत व तत्संबंधीचे विवेचन आणि संदर्भित साहित्य त्याने चिकित्सक दृष्टीने अभ्यासून काढले आणि भांडवलशाहीचा विकास व विनाश या विषयीचा आपला सिद्धांत कॅपिटल या प्रचंड ग्रंथरूपाने मांडला. या ग्रंथात भांडवलशाही अर्थव्यवस्थेत भांडवलनिर्मितीकरिता होणाऱ्या कामगारवर्गाच्या शोषणावर पुराव्यानिशी विदारक प्रकाश टाकलेला असून त्याला जबाबदार असलेले भांडवलदार, त्यांचे हस्तक आणि या अर्थव्यवस्थेचे समर्थक या सर्वांची अत्यंत तीव्रतेने निर्भत्सना व निषेध केला आहे. भांडवलशाहीच्या दास्यातून मानवाच्या मुक्तीचा संदेश त्यात ग्रथित आहे.

कॅपिटल या महान् ग्रंथाचा पहिला खंड १८६७ साली प्रसिद्ध झाला, आणि त्याची मोठ्या प्रमाणावर दखल घेतली गेली. तो मूळ जर्मन भाषेत प्रसिद्ध झाला. परंतु अल्पावधीतच त्याची रशियन व फ्रेंच भाषेत भाषांतरे प्रसिद्ध झाली. परंतु उरलेले दोन खंड मार्क्स पूर्ण करू शकला नाही. मार्क्सच्या निधनानंतर मार्क्सचा जीवाभावाचा एकमेव सहकारी एंगेल्स याने या दोन खंडांची अपूर्ण व इतस्ततः विखुरलेली टिपणे, संपादित करून ते दोन खंड यथावकाश प्रकाशित केले. परंतु मार्क्सने स्वतः ते आहेत तसे प्रसिद्ध केले असतेच असे म्हणवत नाही. त्यातील अपूर्णतेची जाणीव त्याला असावी

सन १८६७ साली कॅपिटलचा पहिला खंड प्रसिद्ध झाल्यानंतर मार्क्सने दुसरे काही महत्वाचे लिखाण केले नाही. विविध व स्फुट लिखाण केले परंतु त्यात जुन्याच सिद्धांतांची पुनरुक्ती होत राहिली. नवा विचार आला नाही. मार्क्सने आणखी लिहावे, कॅपिटलचे उरलेले दोन खंड पूर्ण करावे म्हणून एंगेल्स त्याच्या मागे सतत होता. परंतु मार्क्सचा जोम कमी झाला होता. पन्नाशीही उलटली नव्हती. परंतु वार्धक्याची चाहूल लागली होती. अनेक वर्षे सोसलेले आत्यंतिक दारिद्र्य, खडतर जीवन आणि अभ्यासाचे अविरत परिश्रम या अकाली वार्धक्यास कारणीभूत होते. परंतु त्यापेक्षाही जवळजवळ पंचवीस वर्षे ज्या कामगारक्रांतीची त्याने अपेक्षा आणि प्रतीक्षा केली ती कामगारक्रांती एक दोन तीन संधी येऊनही घडत नाही आणि भांडवलशाहीचा विनाश होण्याऐवजी ती नव्या उर्मीने प्रगतच होत राहते याचे त्याला सखेद आश्चर्य वाटत होते आणि त्याचे मन व्यथित व विषण्ण झाले होते. जुना आत्मविश्वास ढळून आत्मसंदेहाने मन विचलित झाले होते. सन १८७१ त पॅरिसमध्ये क्रांती होऊन पॅरिस कम्युन स्थापन झाले त्या वेळी सर्वंकष क्रांतीच्या आशेने त्याचे मन क्षणभर प्रफुल्लित झाले. परंतु ती प्रफुल्लता बळेच आणली होती. ती धगधग फार काळ टिकली नाही.

वास्तविक १८७३ ते १८८३ ही मार्क्सच्या आयुष्यातील शेवटची दहा वर्षे आणि त्यानंतरही काही वर्षे भांडवलशाहीस बिकट गेली. १८७३ मध्ये भयानक मंदीचा तडाखा बसला परंतु १८४८ प्रमाणे ही संधी साधून क्रांती-करिता कामगारवर्गास आवाहन करण्यास मार्क्स सिद्ध वा समर्थ नव्हता. त्या वर्षी तो कॅपिटलच्या पहिल्या खंडाची दुसरी व काहीशी स्वस्त आवृत्ती काढण्यात गुंतला होता. त्याच वर्षी त्याची प्रकृती एकदम खालावली. त्यातच पुढील दोन वर्षे तो कॅपिटलच्या पहिल्या खंडाची फ्रेंच आवृत्ती तयार करण्यात गुंतला होता. त्याच्या जर्मन व रशियन प्रकाशकां-कडून कॅपिटलचा दुसरा खंड लवकर देण्याकरता लकडा चालूच होता. १८७६ साली तो आता थोड्याच दिवसांत तयार होईल असे आश्वासन एंगेल्सने दिले. परंतु आणखी दोन वर्षे उलटली तरी दुसरा खंड तयार होईना. तो बहुधा १८७९ अखेर तयार होईल असे मार्क्सने सांगितले. परंतु एप्रिल १८७९ मध्ये त्याने विलंबाचे कारण सांगितले. त्यात इतर कारणांत एक असे की गेली पाचसहा वर्षे इंग्लंडमध्ये भांडवलशाही ज्या अरिष्टातून जात होती ते अरिष्ट काहीसे वेगळ्या प्रकारचे, त्याला नीटसे न उमगलेले असे होते आणि त्याचा तात्त्विक शोध घेण्याची आवश्यकता त्याला भासत होती. तात्पर्य, साठी ओलांडल्यानंतरही आणि शरीर दुर्बल झाले असताही नवीन घटनांच्या, अनुभवांचा तात्त्विक शोध घेऊन त्यातून वस्तुनिष्ठ बोध घेऊन जुन्या सिद्धांतांचा पुनर्विचार करण्याचा मार्क्सचा आग्रह कायम होता. दुर्दैवाने ते होऊ शकले नाही.

मार्क्स क्रांतिकारक आणि पंडित असला तरी तेवढाच कुटुंबवत्सल होता. आत्यंतिक दारिद्र्यामुळे त्याची काही मुले बालवयातच मृत्युमुखी पडली होती. परंतु अशा दारिद्र्यातही त्याने कुटुंबाचे मोठ्या वात्सल्याने पालन केले होते. डिसेंबर १८८१ मध्ये त्याची पत्नी कॅन्सरने निवर्तली, आणि जानेवारी १८८३ मध्ये त्याची सर्वात पहिली आणि सर्वात लाडकी मुलगी वयाच्या अवघ्या ३८ व्या वर्षी निधन पावली. या धक्क्याने मार्क्स खचला तो सावरला नाही. १४ मार्च १८८३ रोजी आपल्या अभ्यासिकेत खुर्चीत बसल्याबसल्याच हा भौतिकवादी क्रांतिकारी तत्त्ववेत्ता आपला भौतिक देह मागे ठेवून अनंतात विलीन झाला.

१८३९ ते १८४३ म्हणजे मार्क्सच्या पंचविशीचा काळ आर्थिक मंदी, बेकारी व त्यातून निर्माण होणारे संप व अशांततेचा होता. या काळात भांडवलशाहीविरोधी क्रांतीची चाहूल त्याला प्रथम लागली. १८४२ साली जर्मनीत सायलेशियातील विणकरांनी बंडाळी केली त्यातून मोठा उत्पात होईल अशी त्याची अपेक्षा होती. याच काळात इंग्लंड-मध्ये सार्वत्रिक मतदानाच्या हक्काकरिता कामगारांच्या पाठिंब्याने चार्टिस्ट चळवळ झाली. त्यातही कामगारक्रांतीचा उगम त्यास भासत होता. त्या काळी इंग्लंडमध्ये औद्योगिक क्रांतीच्या झपाट्यात कारखान्यातील, खाणीतील कामगारांना विशेषतः अल्पवयी मुलांना अनन्वित अमानुष वागणूक मिळत असे. एंगेल्सचा इंग्लंडमधील कारखानदारीशी प्रत्यक्ष संबंध असल्याने त्याला या परिस्थितीची तीव्र जाणीव होती. 'इंग्लंडमधील कामगारांची स्थिती' हा त्याचा ग्रंथ १८४५ साली प्रसिद्ध झाला. या ग्रंथात त्या वेळच्या कामगारांच्या परिस्थितीचे विदारक वर्णन तर आहेच परंतु त्यातून जागृत होऊन भांडवलशाहीविरुद्ध लढ्यास सिद्ध होत असलेल्या कामगारांचे दर्शनही आहे वर्गकलहाच्या सिद्धांताची पूर्व-सूचना त्यात असून प्रस्थापित सत्ता उलथून पाडणे किती सुलभ आहे हे कामगारांच्या लक्षात आले की सामाजिक क्रांती अपरिहार्य आहे असा संदेश आहे. नवोदित भांडवलदारवर्गाची सत्ता कामगारांच्या आपसातील स्पर्धेवर अवलंबून आहे म्हणून ही स्पर्धा नष्ट करण्याकरता कामगार संघटनांचे महत्त्व सांगून तो म्हणतो की संपातून कामगारांना सैनिकी शिक्षण मिळते आणि त्यायोगे ते भावी पण अपरिहार्य कामगारक्रांतीस सिद्ध होतात. एंगेल्सचा हा ग्रंथ, त्यातून स्पष्ट होणारे कामगारांचे शोषण, त्याकरता सादर केलेला अधिकृत पुरावा आणि त्यात दिलेला वर्गकलहाचा संदेश मार्क्सला पुढील दोन वर्षे विचारमंथनास उपयोगी पडला. कम्युनिस्ट जाहीरनाम्याचा पहिला मसुदा एंगेल्सचाच होता.

त्याच काळात जर्मनीत प्रस्थापित राजेशाही-सरंजामशाहीविरुद्ध नवोदित भांडवलदारवर्गाचा संघर्ष सुरू होता. या संघर्षातूनच कामगारक्रांती होईल अशी मार्क्सची व एंगेल्सची अपेक्षा होती. १८४८ सालच्या कम्युनिस्ट जाहीरनाम्यातील दुर्दम्य आशावाद या भरवंशावरच होता. परंतु सुरुवातीसच सांगितल्याप्रमाणे १८४८ च्या बंडाळ्यांचा निःपात झाला आणि अपेक्षित कामगार क्रांती झाली नाही. आर्थिक मंदी आणि तज्जन्य बेकारी लवकरच संपली आणि १८५० पासून भांडवलशाहीच्या तेजीचा आणि उत्कर्षाचा काळ सुरू झाला. कामगारक्रांतीच्या आशा मावळल्या. परंतु आज ना उद्या पुनश्च आर्थिक मंदी येणार हे निश्चित आणि त्याचबरोबर कामगारक्रांती होणार हेही तितकेच निश्चित असा मार्क्सला विश्वास वाटत होता.

१८५७ साली पुनश्च मंदीची लाट आली आणि ती इंग्लंडबरोबर युरोपमधील इतर देश तसेच अमेरिकेतही पसरली. शेअरबाजार कोसळले. बँका धोक्यात आल्या. इंग्लंडमध्ये तर परिस्थिती अतिशय बिकट झाली. मार्क्स व एंगेल्स दोघांच्या क्रांतीच्या आशा पुनः पल्लवित झाल्या. १५ नोव्हेंबर १८५७ ला एंगेल्स मार्क्सला लिहितो की मँचेस्टरच्या शेअरबाजारात सर्वत्र घबराट आहे. माझ्याच चेहऱ्यावर मात्र उत्साह व हास्य आहे आणि ते पाहून सारी मंडळी दातओठ खाताना दिसतात. परंतु या आशा फार काळ टिकल्या नाहीत. लवकरच मंदी संपली आणि भांडवल-शाहीवरचे अरिष्ट पुनः टळले. कामगारक्रांती झाली नाही.

कामगारक्रांतीच्या शक्यतेविषयी मार्क्सचे मन साशंक होऊ लागले. त्या वेळी मार्क्स त्याच्या कॅपिटल ग्रंथाकरता मूलभूत टिपणे तयार करीत होता. पुढे ती ग्रुंडरिस् या नावाने स्वतंत्र प्रकाशित झाली. यांत्रिक व तांत्रिक प्रगतीतून उत्पादनशक्ती वाढवून भावी विकासाच्या अनेक दिशा व पुष्कळच वाव भांडवलशाहीस अजून उपलब्ध आहे याची जाणीव मार्क्सला होऊ लागल्याचे या टिपणांतून दिसते. या काळात ब्रिटिश भांडवलशाहीने तुफानी घोडदौड करून अमेरिकेत पश्चिमेस कॅलिफोर्नियापर्यंत, पूर्वेस आशिया खंडाच्या अंतापर्यंत आणि नव्याने

समाजपरिवर्तनाच्या मूलतत्वांची रूपरेषा त्याच्या मनात निश्चित झालेली होती. परंतु त्याचा पिंड जिज्ञासूचा असल्याने अधिक सखोल अभ्यासाचे महत्त्व जाणून लंडनला आल्यानंतरची निदान पंधरा वर्षे त्याने आत्यंतिक दारिद्र्य व हाल-अपेष्टा सोसून मोठ्या निग्रहाने अभ्यासात घालविली. लंडनच्या वस्तुसंग्रहालयातील ग्रंथशाळेत अहोरात्र बसून त्या वेळी प्रस्थापित असलेले सर्व अर्थशास्त्रीय सिद्धांत व तत्संबंधीचे विवेचन आणि संदर्भित साहित्य त्याने चिकित्सक दृष्टीने अभ्यासून काढले आणि भांडवलशाहीचा विकास व विनाश या विषयीचा आपला सिद्धांत कॅपिटल या प्रचंड ग्रंथरूपाने मांडला. या ग्रंथात भांडवलशाही अर्थव्यवस्थेत भांडवलनिर्मितीकरिता होणाऱ्या कामगारवर्गाच्या शोषणावर पुराव्यानिशी विदारक प्रकाश टाकलेला असून त्याला जबाबदार असलेले भांडवलदार, त्यांचे हस्तक आणि या अर्थव्यवस्थेचे समर्थक या सर्वांची अत्यंत तीव्रतेने निर्भत्सना व निषेध केला आहे. भांडवलशाहीच्या दास्यातून मानवाच्या मुक्तीचा संदेश त्यांत ग्रथित आहे.

कॅपिटल या महान् ग्रंथाचा पहिला खंड १८६७ साली प्रसिद्ध झाला, आणि त्याची मोठ्या प्रमाणावर दखल घेतली गेली. तो मूळ जर्मन भाषेत प्रसिद्ध झाला. परंतु अल्पावधीतच त्याची रशियन व फ्रेंच भाषेत भाषांतरे प्रसिद्ध झाली. परंतु उरलेले दोन खंड मार्क्स पूर्ण करू शकला नाही. मार्क्सच्या निधनानंतर मार्क्सचा जीवाभावाचा एकमेव सहकारी एंगेल्स याने या दोन खंडांची अपूर्ण व इतस्ततः विखुरलेली टिपणे, संपादित करून ते दोन खंड यथावकाश प्रकाशित केले. परंतु मार्क्सने स्वतः ते आहेत तसे प्रसिद्ध केले असतेच असे म्हणवत नाही. त्यातील अपूर्णतेची जाणीव त्याला असावी

सन १८६७ साली कॅपिटलचा पहिला खंड प्रसिद्ध झाल्यानंतर मार्क्सने दुसरे काही महत्त्वाचे लिखाण केले नाही. विविध व स्फुट लिखाण केले परंतु त्यात जुन्याच सिद्धांतांची पुनरुक्ती होत राहिली. नवा विचार आला नाही. मार्क्सने आणखी लिहावे, कॅपिटलचे उरलेले दोन खंड पूर्ण करावे म्हणून एंगेल्स त्याच्या मागे सतत होता. परंतु मार्क्सचा जोम कमी झाला होता. पन्नाशीही उलटली नव्हती. परंतु वार्धक्याची चाहूल लागली होती. अनेक वर्षे सोसलेले आत्यंतिक दारिद्र्य, खडतर जीवन आणि अभ्यासाचे अविरत परिश्रम या अकाली वार्धक्यास कारणीभूत होते. परंतु त्यापेक्षाही जवळजवळ पंचवीस वर्षे ज्या कामगारक्रांतीची त्याने अपेक्षा आणि प्रतीक्षा केली ती कामगारक्रांती एक दोन तीन संधी येऊनही घडत नाही आणि भांडवलशाहीचा विनाश होण्याऐवजी ती नव्या उर्मीने प्रगतच होत राहते याचे त्याला सखेद आश्चर्य वाटत होते आणि त्याचे मन व्यथित व विषण्ण झाले होते. जुना आत्मविश्वास ढळून आत्मसंदेहाने मन विचलित झाले होते. सन १८७१ त पॅरिसमध्ये क्रांती होऊन पॅरिस कम्यून स्थापन झाले त्या वेळी सर्वंकष क्रांतीच्या आशेने त्याचे मन क्षणभर प्रफुल्लित झाले. परंतु ती प्रफुल्लता बळेच आणली होती. ती धगधग फार काळ टिकली नाही.

वास्तविक १८७३ ते १८८३ ही मार्क्सच्या आयुष्यातील शेवटची दहा वर्षे आणि त्यानंतरही काही वर्षे भांडवलशाहीस बिकट गेली. १८७३ मध्ये भयानक मंदीचा तडाखा बसला परंतु १८४८ प्रमाणे ही संधी साधून क्रांती-करिता कामगारवर्गास आवाहन करण्यास मार्क्स सिद्ध वा समर्थ नव्हता. त्या वर्षी तो कॅपिटलच्या पहिल्या खंडाची दुसरी व काहीशी स्वस्त आवृत्ती काढण्यात गुंतला होता. त्याच वर्षी त्याची प्रकृती एकदम खालावली. त्यातच पुढील दोन वर्षे तो कॅपिटलच्या पहिल्या खंडाची फ्रेंच आवृत्ती तयार करण्यात गुंतला होता. त्याच्या जर्मन व रशियन प्रकाशकां-कडून कॅपिटलचा दुसरा खंड लवकर देण्याकरता लकडा चालूच होता. १८७६ साली तो आता थोड्याच दिवसांत तयार होईल असे आश्वासन एंगेल्सने दिले. परंतु आणखी दोन वर्षे उलटली तरी दुसरा खंड तयार होईना. तो बहुधा १८७९ अखेर तयार होईल असे मार्क्सने सांगितले. परंतु एप्रिल १८७९ मध्ये त्याने विलंबाचे कारण सांगितले. त्यात इतर कारणांत एक असे की गेली पाचसहा वर्षे इंग्लंडमध्ये भांडवलशाही ज्या अरिष्टातून जात होती ते अरिष्ट काहीसे वेगळ्या प्रकारचे, त्याला नीटसे न उमगलेले असे होते आणि त्याचा तात्त्विक शोध घेण्याची आवश्यकता त्याला भासत होती. तात्पर्य, साठी ओलांडल्यानंतरही आणि शरीर दुर्बल झाले असताही नवीन घटनांच्या, अनुभवांचा तात्त्विक शोध घेऊन त्यातून वस्तुनिष्ठ बोध घेऊन जुन्या सिद्धांतांचा पुनर्विचार करण्याचा मार्क्सचा आग्रह कायम होता. दुर्दैवाने ते होऊ शकले नाही.

परंतु यापैकी काही झाले नाही. १८९५ साली मंदी संपली आणि भांडवलशाहीस पुन्हा भरभराटीचे दिवस आले. त्याच वर्षी एंगेल्स वारला. आर्थिक मंदीत कामगारक्रांती होऊन भांडवलशाही कोलमडून पडेल ही त्याची आशा आता पार मावळली होती. १८९५ च्या मार्चमध्ये, मृत्यूपूर्वी थोडेच महिने, त्याने फ्रान्समधील वर्गसंघर्ष या मार्क्सच्या १८५० साली लिहिलेल्या ग्रंथाचे पुनर्मुद्रण केले. त्याच्या प्रस्तावनेत तो म्हणतो : मार्क्स व मी आणि आम्हा दोघांशी सहमत असणाऱ्या सर्वांना इतिहासाने खोटे ठरविले आहे. १८४८ साली भांडवलशाहीचा विनाश फार दूर होता हेच खरे. त्यानंतर अवघ्या युरोपचे झालेले आर्थिक परिवर्तन आणि जर्मनीत झालेली औद्योगिक प्रगती यांनी हे सिद्ध झाले आहे.

एंगेल्स पुढे म्हणतो : इतिहासाने आणखीही केले आहे. ज्या परिस्थितीत आणि ज्या परिस्थितीशी कामगारांना संघर्ष करावयाचा आहे ती परिस्थिती काळाने पार बदलून टाकली आहे. १८४८ सालच्या संघर्षाचा प्रकार आता कालबाह्य झाला आहे याची आज दखल घेणे जरुरीचे आहे. काळाचा महिमाच असा की त्याने सारे उलटेपालटे केले आहे. प्रस्थापितांना उलथून टाकण्याकरिता क्रांतीचा मार्ग आम्ही अंगीकारला. परंतु आज अवैध मार्गापेक्षा वैध मार्गानेच आमचे सामर्थ्य वाढत आहे. उलटपक्षी, कायदाकानूनचा आधार उभारून जे प्रस्थापित झाले त्यांचे आसन मात्र त्याच कायदाकानूनी आज डळमळीत होत आहे.

संदर्भ होता जर्मनीतील समाजवादी लोकशाही पक्षाचा. युरोपमध्ये त्याकाळी हा सर्वात मोठा, संघटित आणि समर्थ कम्युनिस्ट पक्ष होता. नव्यानेच प्राप्त झालेल्या मतदानाच्या हक्काचा उपयोग करून, निवडणुका जिंकून या पक्षाने जर्मन लोकसभेत आपले प्रभुत्व प्रस्थापित केले होते, आणि त्याच्या जोरावर कामगारहक्कांचे संरक्षण आणि त्यांच्या परिस्थितीत सुधारणा घडवून आणण्यास सुरुवात केली होती. परिणामी, मार्क्सला अभिप्रेत असलेल्या कामगार-क्रांतीची शक्यता आणि त्याहीपेक्षा अशा क्रांतीची आवश्यकता याविषयी एंगेल्सप्रमाणेच जर्मन समाजवादी लोकशाही पक्षाच्या अनेक तरुण कार्यकर्त्यांमध्ये साशंकता निर्माण झाली होती. त्यामध्ये बर्नस्टाइन हा एक प्रमुख नेता होता. एंगेल्स हयात असेपर्यंत या शंका मुग्ध राहिल्या. एंगेल्सच्या मृत्यूनंतर बर्नस्टाइनने त्या प्रगट करण्यास सुरुवात केली. गेल्या पंचवीस वर्षांतील भांडवलशाहीचा विकास, कामगार संघटनांची प्रगती, आणि राज्यसत्ता, भांडवलशाही व कामगार यांचे परस्परसंबंध हे सारे मार्क्सच्या सिद्धांतानुसार घडलेले नाही. मार्क्सचे याविषयीचे भाकित खोटे ठरले आहे. सबब मार्क्सला अपेक्षित नसलेल्या या नव्या परिस्थितीत मार्क्सच्या सिद्धांतांचा आणि कामगार संघटनांच्या ध्येयधोरणाचा पुनर्विचार करणे अगत्याचे आहे. विशेषत: सद्य:स्थितीत, भांडवलशाहीच्या विकासातून तिचा विनाश होईल या अपेक्षेने कामगार क्रांतीचे मनोरथ करण्यापेक्षा लोकशाही प्रक्रियेतून एक एक पाऊल कामगारांची प्रगती साधून समाजवादी उत्क्रांतीकरता कामगारसंघटनांनी प्रयत्नशील व्हावे असे त्याचे म्हणणे होते. सहाजिकच पक्षात त्याला प्रखर विरोध झाला. पाखंडी म्हणून त्याला काहीसे वाळीतही टाकले गेले. परंतु प्रत्यक्ष व्यवहारात त्याने पुरस्कारलेले धोरणच स्वीकारण्यात आले. त्यावेळी युरोपमधील बहुतेक सर्व देशांतील कामगार चळवळीत जर्मन समाजवादी लोकशाही पक्षाचे नेतृत्व मान्य होते. त्यामुळे, रशिया सोडून युरोपातील इतर बहुतेक सर्व देशांत, कामगार चळवळी व संघटना यांनीही हेच धोरण अनुसरले.

भांडवलशाही विकसित होईल तशी तिच्यातील अंतर्विरोधामुळे अगतिकपणे विनाशास लागण्याऐवजी परिस्थितीनुरूप ती स्वत:स आवश्यक ती मुरड घालून, अंतर्विरोध कमी करून, नवे स्वरूप धारण करील, आणि नव्या जोमाने फोफावेल ही शक्यता मार्क्सने फारशी विचारात घेतली नाही. १८७३ ते १८९५ च्या मंदीच्या अरिष्टातून ती सहीसलामत बाहेर आली ती अनिर्बंध स्पर्धात्मक अर्थव्यवस्थेऐवजी मक्तेदारी आणि साम्राज्यशाही असे नवे रूप धारण करून आली हे वर सांगितलेच आहे. यानंतर पुनश्च १९३० साली भांडवलशाही जागतिक मंदीच्या अरिष्टात सापडली. भांडवलशाहीतील आर्थिक तेजीमंदीची पुष्कळ कारणमीमांसा मार्क्सने केली. या विषयीचे मार्क्सचे विवेचन पुष्कळ उद्बोधक असले तरी सहाजिकच ते अपूर्ण होते. १९३० सालच्या मंदीच्या संदर्भात केन्सने आर्थिक मंदीची मौलिक मीमांसा केली. तिचा आशय असा की भांडवलशाही अर्थव्यवस्थेत आर्थिक बचत करणारा वर्ग एक आणि भांडवली गुंतवणूक करणारा वर्ग दुसरा असल्याने बचत आणि गुंतवणूक यांचे समीकरण जमतेच असे नाही आणि बचतीपेक्षा

गुंतवणूक कमी पडली तर मंदी येते. अशा प्रसंगी शासनाने पुढाकार घेऊन सार्वजनिक गुंतवणूक वा खर्च वाढविला तर मंदी आटोक्यात आणता येईल. सबब शासनाने असा पुढाकार घ्यावा. अर्थव्यवस्थेत शासनाने कमीत कमी हस्तक्षेप करावा ही भांडवलशाहीची तोवरची भूमिका. तिला केन्सच्या सिद्धांताने धक्का बसला. परंतु आपत्धर्म म्हणून भांडवली अर्थशास्त्राने असा हस्तक्षेप मान्य केला, नव्हे आत्मसात केला. दुसऱ्या महायुद्धानंतर गेल्या तीस-पस्तीस वर्षांत झालेली भांडवलशाहीची जागतिक भरभराट बहुतांशी या सिद्धांतावरच आधारित आहे.

याचा अर्थ असा नव्हे की, केन्सच्या सिद्धांतामुळे भांडवलशाहीच्या सर्व समस्या सुटल्या आहेत. किंबहुना गेली दोन वर्षे जागतिक भांडवलशाही एका नवीन प्रकारच्या मंदीतून जात आहे. आजवर पडत्या किमती, घटते उत्पादन आणि वाढती बेकारी ही मंदीची लक्षणे असत. आज घटते उत्पादन व वाढती बेकारी आहे परंतु किमती मात्र न पडता चढतच आहेत. या मंदीची कारणमीमांसा आज चालू आहे. केन्सने पुरस्कारलेल्या धोरणाचा अतिरेक हेच आजच्या मंदीचे प्रमुख कारण आहे असा एक पक्ष आहे. या चर्चेतून जो शास्त्रार्थ निघेल तो निघो, परंतु चालू मंदीची कारणमीमांसा मार्क्सच्या शंभर वर्षांपूर्वीच्या लिखाणात शोधणे आणि त्या आधारे मार्क्सप्रणीत भांडवल-शाहीच्या विनाशाची अपेक्षा धरणे मात्र वेडगळपणाचे ठरेल.

भांडवलशाहीच्या विकासातील काही महत्त्वाच्या तपशिलाबाबतही मार्क्सचे अंदाज बरोबर ठरले नाहीत. भांडवलशाहीच्या विकासाबरोबर उत्पादन साधनांच्या मालकीचे अधिकाधिक केंद्रीकरण होईल आणि साऱ्या उत्पादन साधनांची मालकी अगदी मूठभर भांडवलदारांच्या हाती येईल अशी मार्क्सची अपेक्षा होती, ती सर्वस्वी खरी ठरली नाही. एक तर उत्पादनाचे केंद्रीकरण सर्व क्षेत्रांत झाले नाही. पोलादासारख्या जड उद्योगात झाले परंतु शेती व इतर पुष्कळ उद्योगव्यवसायात झाले नाही. तेथे लहान-मोठे उत्पादक व व्यावसायिक तग धरून राहिले आणि स्थिर झाले. दुसरे असे की, काही क्षेत्रात उत्पादनाचे केंद्रीकरण झाले तरी उत्पादनसाधनांच्या मालकीचे केंद्रीकरण झाले नाही. भागरूपाने भांडवल गोळा करण्याची पद्धती सुरू झाली आणि तिच्या योगे भांडवलाची मालकी असंख्य लहान-मोठ्या भागधारकांचे हातात विखुरलेली गेली. पहिल्या महायुद्धानंतर मोठाल्या व्यवसायांच्या उद्योगव्यवस्थापनातही महत्त्वाचे फरक झाले. आणि व्यवस्थापन आणि त्याला आवश्यक ते उत्पादनावरील नियंत्रण अधिकाधिक व्यावसायिक व्यवस्थापकांच्या हाती गेले. हे व्यवस्थापक बहुतांशी पगारी आहेत आणि त्यापैकी काही जण लठ्ठ पगार घेत असले तरी मार्क्सला अभिप्रेत असलेले उत्पादनसाधनांचे मालक या अर्थाने ते भांडवलदार नाहीत.

दुसऱ्या महायुद्धानंतर उत्पादनतंत्रात आणि उत्पादनव्यवस्थेत क्रांतिकारक सुधारणा झाल्या आणि त्यायोगे तंत्रज्ञांचे महत्त्व वाढले. प्रत्यक्ष उत्पादनाखेरीज त्यास आवश्यक ते खरेदीविक्रीचे व्यवहार, आंतरराष्ट्रीय आयात-निर्यात-भांडवलाची उभारणी, बँका व इतर वित्तीय संस्थांशी करावयाचे व्यवहार, शासनाचे कायदेकानून आणि सर्वांत महत्त्वाचे कामगार-संबंध या सर्वच गोष्टी एवढ्या गुंतागुंतीच्या झाल्या आहेत की कोणत्याही मोठ्या उद्योगास ते ते व्यवहार जाणणारे अनेक तज्ज्ञ लागतात. परिणामी भांडवलशाहीचे दैनंदिन व्यवस्थापन आता प्राय: तंत्रज्ञ आणि विविध तज्ज्ञांच्या हाती गेले आहे. हे तंत्रज्ञ, तज्ज्ञ आणि व्यवस्थापक अंतिमत: भांडवलशाहीचेच हस्तक आहेत हे खरे. परंतु भांडवलशाही व्यवस्थापनातील या कारभारी मंडळींच्या प्रेरणा आणि आकांक्षा मार्क्सला अभिप्रेत असलेल्या भांडवलशाही प्रेरणा व आकांक्षांपेक्षा पुष्कळ वेगळ्या आहेत हे मान्य करावयास हवे.

पण या साऱ्यांपेक्षा मार्क्सचा अंदाज सपशेल फसला तो भांडवलशाहीतील कामगारांच्या प्रतिक्रियेविषयी. भांडवल व कामगार ही परस्पर विरोधी तत्त्वे आहेत, आणि त्या दोघांतील क्रांतिमय संघर्षातून एका तत्त्वाचा दुसऱ्या तत्त्वावर संपूर्ण विजय होईल तेव्हाच हा विरोध नष्ट होईल, हा मार्क्सचा सिद्धांत त्याच्या तरुण वयात, तो पंचविशीत असतानाच, त्याच्या मनात दृढ झाला होता. त्या वेळी भांडवलशाही बाल्यावस्थेतच होती आणि युरोपमध्ये तर तिची नुकती सुरुवात होत होती. मार्क्सचा इंग्लंडमधील भांडवलशाहीशी अगदी अल्पपरिचय होता आणि अर्थशास्त्राच्या त्याच्या अध्ययनास सुरुवात व्हायची होती. मार्क्स अजून तत्त्वज्ञानात गढलेला होता आणि त्या काळातील सर्व तरुणां-प्रमाणे तो हेगेलच्या तत्त्वज्ञानाच्या अंमलाखाली होता. मार्क्सच्या मनात दृढ झालेला भांडवल व कामगार यामधील अटी-तटीचा विरोध आणि संघर्ष तत्त्वाधिष्ठित होता. त्याला अर्थशास्त्राचा किंवा अनुभवनिरीक्षणाचा आधार नव्हता.

त्यामुळे भांडवल व कामगार यांचे हितसंबंधांतील विरोध मान्य करूनही त्यांच्यात सामंजस्य, तडजोड, देवाणघेवाण इत्यादींतून उभयतांच्या विकासाची शक्यता त्याने तत्त्वत: नाकारली आणि पुढे चाळीस वर्षे व्यवहार व अनुभव वेगळा दिसत असला तरी एकदा दृढ झालेली ही तात्त्विक भूमिका सोडणे त्याला अवघड झाले. विविध कारणमीमांसेने त्याने केवळ तिचे समर्थन करण्याचा यत्न केला.

१८४८ सालच्या कम्युनिस्ट जाहीरनाम्यात कामगारक्रांती अपरिहार्य का ते सांगताना मार्क्स म्हणतो, की भांडवलशाहीचा विकास होईल तसे कामगारवर्गाचे शोषण वाढत जाऊन कामगार अधिकाधिक दारिद्र्याचे खाईत लोटला जाईल म्हणून तो बंड करून उठेल. तसे होत नाही, भांडवलशाहीच्या विकासाबरोबर कामगारांचीही परिस्थिती सुधारते, विकासाचे लाभ अंशत: कामगारांचेही पदरात पडतात, हे कामगार संघटनांच्या संघटित सामर्थ्यामुळेच होते नाहीतर झाले नसते असे मानले तरी ते होते हे खर, हे लक्षात आल्यावर मार्क्सने अशी भूमिका घेतली की, कामगारांची परिस्थिती सुधारली तरी भांडवलदार आणि कामगार यांचेतील विषमता वाढत जाईल,त्यातून कामगारवर्ग क्रांतीस उद्युक्त होईल. १८४९ पासून मार्क्सचे वास्तव्य लंडनला होते. या काळात ब्रिटिश भांडवलशाहीची भरभराट होत होती. इंग्लंडमधील कामगारवर्गही संघटित होत होता. त्या कामगार-संघटनांची उद्दिष्टे आणि प्रेरणा यांचा मार्क्सने वास्तव दृष्टीने अभ्यास केला असता, तर कामगारवर्ग हा जात्याच क्रांतिकारी आहे आणि क्रांती हेच त्याचे उद्दिष्ट आहे ह्या केवळ तत्त्वाधिष्ठित सिद्धांताचा त्याने पुनर्विचार केला असता.

या काळात इंग्लंडमधील कामगारवर्ग आपल्या संघटित सामर्थ्याने हळूहळू आपले हक्क प्रस्थापित करीत होता आणि भांडवलशाही विकासाचे लाभ अंशत: आपल्या पदरात पाडून घेत होता. लोकशाहीचे महत्त्व जाणून त्याने सार्वत्रिक मतदानाकरिता झगडा केला आणि मतदानाचा हक्क मिळताच त्याचा उपयोग करून तो राष्ट्रीय उत्कर्षात भागीदार झाला. उत्क्रांतीचीही शक्यता जाणून त्याने क्रांतीचा मार्ग टाळला. मार्क्स व एंगेल्स दोघेही इंग्लंडमध्ये असूनही तेथील कामगारवर्ग व कामगारसंघटना बुद्ध्या त्यांचे पासून दूर राहिल्या. याचे वर्म न जाणता इंग्लंडमधील कामगारवर्गाला भांडवलशाहीची बाधा झाली आहे ती गेली म्हणजे तो क्रांतिकारक होईल अशा समजुतीत दोघेही राहिले.

१८६४ साली मार्क्सच्या नेतृत्वाखाली पहिली आंतरराष्ट्रीय कामगारसंघटना स्थापन झाली. तिला इंग्लंडमधील कामगारसंघटनांनी पाठिंबा दिला, परंतु तो आंतरराष्ट्रीय कामगारक्रांतीकरिता नव्हे हे लक्षात घेऊन मार्क्सने या संघटनेत प्रथमपासून फार सौम्य व सामंजस्याचे धोरण स्वीकारले. परंतु १८७१ साली पॅरिस कॉम्यूनचा पाडाव होऊन हिंसाचार झाला. त्या संतापाचे भरात आता यापुढे कामगार व भांडवलदार एका बैठकीवर बसणार नाहीत अशा अर्थाचा ठराव मार्क्सने आंतरराष्ट्रीय संघटनेसमोर ठेवला. ब्रिटिश कामगारसंघटनांनी त्याला प्रसंगोचित अनुमती दिली. परंतु लगोलग आंतरराष्ट्रीय संघटनेतून पाय मागे घेण्यास सुरुवात केली. कारण त्या आधी चारच वर्षे म्हणजे १८६७ साली इंग्लंडमधील कामगारांना मतदानाचा हक्क प्राप्त झाला होता, आणि त्याकरिता कराव्या लागणाऱ्या प्रदीर्घ लढ्यात त्यांना भांडवलदारांतील प्रागतिकांचे सहकार्य होते. लोकशाही प्रक्रियेतून कामगारांची समाजवादी उद्दिष्टे साधण्याची शक्यता पूर्णपणे दृष्टीआड करणे आता मार्क्सला शक्य नव्हते. १८७२ साली ॲम्स्टरडॅममध्ये एका भाषणात मार्क्स अनिच्छेने म्हणतो की अमेरिका, इंग्लंड आणि कदाचित हॉलंडसारख्या देशांत कामगारांना त्यांची उद्दिष्टे शांततामय मार्गाने साध्य करणे शक्य आहे हे मी अमान्य करीत नाहीत. परंतु लगेच पुढे म्हणतो की हे खरे असले तरी युरोपांतील बहुतेक सर्व देशांत कामगारांना आपली सत्ता स्थापन करण्याकरता बळाचाच उपयोग करावा लागेल. पुढे १८७९ मध्ये तो खुलासा करतो, की जोवर प्रस्थापित सत्ता हिंसाचाराने विरोध करीत नाही तोवर इतिहासाचे मार्गक्रमण शांततामय राहील. उदाहरणार्थ, इंग्लंड व अमेरिकेत कामगारवर्गाला ब्रिटिश पार्लमेंट वा अमेरिकी काँग्रेसमध्ये जेव्हा बहुमत प्राप्त होईल तेव्हा त्याच्या मार्गात येणारे प्रस्थापित कायदे व व्यवस्था त्याला वैध मार्गाने बाजूस सारता येतील. एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीस बर्नस्टाइनने समाजवादाच्याच प्रस्थापनेकरता लोकशाही मार्गाचा पुरस्कार केला, त्याचे कारण हीच परिस्थिती आणि शक्यता त्यावेळी जर्मनीतही निर्माण झाली होती.

मार्क्सला अनपेक्षित अशा नव्या प्राप्त परिस्थितीत मार्क्सच्या सिद्धांतांचा पुनर्विचार आवश्यक आहे या बर्नस्टाइनच्या भूमिकेला सहाजिकच सनातनी मार्क्सवाद्यांकडून प्रखर विरोध झाला. त्यात कौट्स्की प्रमुख होता.

एंगेल्सच्या मृत्यूनंतर पहिल्या महायुद्धापर्यंत म्हणजे जवळजवळ पंचवीस वर्षे मार्क्सवादाचे सैद्धान्तिक नेतृत्व कौट्स्कीकडे होते. बर्नस्टाइनच्या पुनर्विचारास विरोध करताना भांडवलशाहीत उत्पादनापेक्षा मागणी कमी राहिल्याने जादा उत्पादन होऊन भांडवलशाही धोक्यात येईल असे त्याने आग्रहाने सांगितले. परंतु पुढे पंचवीस वर्षानंतर भांडवलशाहीच्या विकासास अजून किती वाव आहे याचा अंदाज आपल्याला आला नाही, पन्नास वर्षांपूर्वीपेक्षा भांडवलशाही आज अधिक समृद्ध आहे असे त्याने प्रांजलपणे मान्य केले.

बर्नस्टानला विरोध करणाऱ्यांत दुसरे महत्वाचे नाव म्हणजे रोझा लुक्झेमबर्ग या जहाल क्रांतिकारक बाईचे. त्यावेळी जर्मनी व युरोपमधील इतर देशांत कामगारवर्गाची परिस्थिती सुधारलेली दिसत होती याचे कारण साम्राज्यशाहीकडून वसाहतींची जी पिळवणूक होत होती त्याचे लाभ साम्राज्यवादी राष्ट्रातील कामगारांना मिळत होते हे होय असे बाईचे म्हणणे. परंतु बाई करायला गेल्या एक आणि झाले भलतेच. भांडवलशाहीत होणारा भांडवलसंचय केवळ उत्पादनप्रक्रियेत कामगारांच्या पिळवणूकीतूनच होतो या मार्क्सवादाच्या मूलभूत सिद्धांतालाच बाईंनी धक्का दिला. परिणामी बर्नस्टाइनला झाला नाही एवढा विरोध त्यांना झाला.

बर्नस्टाइनच्या पुनर्विचारास लेनिनेनही प्रखर विरोध केला. भांडवलशाहीतील स्वयंस्फूर्त कामगार चळवळ भांडवलशाहीच्या चौकटीतच केवळ अधिक लाभाकरिता खटपट करील, क्रांतिकारी रहाणार नाही असे लेनिनने बजावून सांगितले. तिला क्रांतीच्या मार्गाने न्यावयाचे तर कामगारसंघटनांची मर्यादित आर्थिक उद्दिष्टे आणि लोकशाहीचे राजकारण यापासून कामगारांना दूर ठेवले पाहिजे हेच कम्युनिस्ट पक्षाचे काम आहे. कामगार चळवळ अथवा कामगार-संघटना यापेक्षा क्रांतीच्या ध्येयाला वाहून घेतलेल्या पक्षाचे प्रभुत्व हा लेनिनवादाचा गाभा आहे. त्याला मार्क्सवादाचा आधार किती हा विवाद्य विषय आहे.

१९१७ च्या रशियन क्रांतीपासूनच्या गेल्या साठपासष्ठ वर्षांत समाजवादी अर्थव्यवस्थेचा पुष्कळ अनुभव जमा झाला आहे. स्वतः मार्क्सने, १८७५ साली गोथा कार्यक्रमावर केलेल्या टीकाटिप्पणीतील थोडासा उल्लेख सोडता त्याला अभिप्रेत असलेल्या समाजरचनेचा अथवा अर्थव्यवस्थेचा तपशील फारसा सांगितला नाही. त्यामुळे समाजवादी देशातील अर्थव्यवस्था मार्क्सवादी म्हटली तरी सर्वत्र सारखी नाही. शिवाय ज्या देशात भांडवलशाही खरी विकसित झाली तेथे समाजवादी क्रांती झाली नाही. परंतु उत्पादनाची पुष्कळ साधने सार्वजनिक मालकीची होऊन एक संमिश्र अर्थव्यवस्था स्थापन झाली आहे. तिच्या व्यवस्थापनेचाही पुष्कळ अनुभव जमेस आहे. उत्पादनाची साधने केवळ सार्वजनिक मालकीची केल्याने कामगार व व्यवस्थापन यांच्या संबंधात फारसा फरक पडत नाही हे लक्षात आले आहे. विविध देशांतीलच नव्हे तर एकाच देशातील विविध उद्योगांतील कामगारांचे हित-संबंध समान नाहीत हे लक्षात आले आहे. प्रत्यक्ष उत्पादनात गुंतलेला कामगार बहुसंख्य न होता आधुनिक अर्थव्यवस्था व शासनयंत्रणा चालविण्यास आवश्यक, परंतु मार्क्सच्या व्याख्येत अनुत्पादक आणि कामगारांच्या शोषणावरच जगणारा पांढरपेशा कर्मचारी वर्गच संख्येने वाढत आहे. या बदललेल्या परिस्थितीत, नव्या अनुभवाचे आधारे, मार्क्सच्या सिद्धांतांचा सैद्धांतिक पुनर्विचार व्हावा हीच मार्क्सची अपेक्षा आहे.

त्याच्या तरुण वयात मार्क्स हेगेलच्या तत्त्वज्ञानाने भारावलेला होता हे वर सांगितलेच आहे. परंतु हेगेलच्या तत्त्वज्ञानात त्याला भासलेल्या उणिवांकडे त्याने दुर्लक्ष केले नाही. वयाच्या अवघ्या तेविसाव्या वर्षी पूर्ण केलेल्या तत्त्वज्ञानविषयक पी.एच. डी. च्या प्रबंधाला जोडलेल्या पुस्तीत तो म्हणतो : तत्त्ववेत्याच्या तत्त्वज्ञानात पुष्कळदा उणिवा व अपूर्णता आढळते. त्याची त्यालाही जाणीव असते. परंतु त्याचे कारण त्याचा मूलभूत सिद्धांत किंवा त्या विषयीच्या त्याच्या आकलनात आहे हे त्याच्या लक्षात येत नाही. अशा मूलभूत सिद्धांतांचा शोध घेऊन त्याचा पूर्णार्थ स्पष्ट करणे हे त्याच्या अनुयायांचे काम आहे. त्यायोगे तत्त्ववेत्त्यांची थोरवी कमी होत नाही तर त्याच्या तत्त्वज्ञानातील मौलिक सिद्धांताला नवा आकार वा अर्थ प्राप्त होऊन ते अधिक प्रगत होते.

■ ■

# केंद्र-राज्य वित्तीय संबंध

सी. पं. खेर

— १ —

भारतीय संविधानाचे हे वैशिष्टच आहे की या संघराज्यात घटक-राज्यांवर केंद्राचा सदैव वरचष्मा राहील. येथे स्वतंत्र राज्ये एकत्र येऊन संघराज्य बनलेले नाही तर या देशासाठी, प्रस्थापित पद्धतीतील दोष वगळून, लोकशाहीच्या चौकटीत संघराज्यपद्धत स्वीकारलेली आहे. धर्म, भाषा, जात, प्रादेशिकता व संस्थाने यांच्या छत्राखाली आधीच फुटू पाहणाऱ्या राज्यांना एकत्र राबविण्यासाठी केंद्राला सामर्थ्यवान राखले आहे. यातील घटक देखील न बदलणारे नाहीत. कारण लोकसभेला नवीन राज्ये प्रस्थापित करता येतात आणि राज्यांच्या सीमा बदलता येतात.

या संघराज्यातील घटक स्वायत्त खरे पण पूर्ण स्वतंत्र नाहीत. प्रत्येक घटकाचे क्षेत्र, विशेषत: कराधानाचे क्षेत्र, व्यवच्छेदक आहे. पण संविधानाच्या सातव्या परिशिष्टातील समावर्ती सूचीत अशीही व्यापक क्षेत्रे आहेत की परस्परांच्या सहकार्याशिवाय ती कार्यवाहीत आणता येत नाहीत. नियोजन, कामगारसंघटना व औद्योगिक कलह, भाव-नियंत्रण, अन्नधान्य व खाद्यतेले यांचे वाटप, कारखाने व उद्योग यांची स्थापना, वीजनिर्मिती इत्यादी अनेक महत्त्वाच्या बाबतीत केंद्राचे निर्देशन चालू असते. नियोजनपद्धतीमुळे आणि किमान गरजा भागविण्याच्या कार्यक्रमामुळे तर राज्यांच्या आधिपत्याखालील शेतकी, आरोग्य, शिक्षण या क्षेत्रांतून केंद्राची अधिसत्ता चालू शकते. केंद्रपुरस्कृत प्रकल्प राज्यावर लादले जाऊ शकतात. सर्व देशभर आर्थिक आणि सामाजिक क्षेत्रातून सुसूत्रता राखण्यासाठी व प्रादेशिक समतोल ढळला जाऊ नये म्हणून हे आवश्यकही आहे.

अशा या केंद्राकर्षी संविधानाचे दुसरे वैशिष्टच असे की लोकशाहीच्या चौकटीत राजकोषीय तोल केंद्राकडे झुकणारा राहिला आहे. महत्त्वाचे, भरभक्कम व लवचिक कर केंद्राच्या अधिपत्याखाली असून केंद्राने राज्यांची महसुली तूट भरून काढण्याची सांविधानिक तरतूदही करण्यात आलेली आहे. ही तूट दोन प्रकारे भरून निघते. केंद्रीय अधिपत्याखालील काही करात राज्यांना हक्काचा वाटा दिला आहे. काहीत तो लोकसभेने ठरविल्यास मिळू शकतो. राज्यासाठी काही कर केंद्र लादू शकते व त्यांचा वसूल राज्यांना मिळतो. तसेच राज्यांना केंद्र अनुदान देते. असे अनुदान कलम २७५ नुसार सांविधानिक तर आहेच पण त्याशिवाय नियोजनाच्या चौकटीत ते ऐच्छिकही आहे.

अशा करांचे वाटप किती व कसे करावयाचे, कोणत्या राज्यांना व किती अनुदान द्यावयाचे हे ठरविण्यासाठी दर पाच वर्षांनी वित्त आयोग नेमावयाची तरतूद संविधानाने केली आहे. हेदेखील भारतीय संविधानाचे वैशिष्टच मानले गेले आहे. वित्त आयोग, योजना आयोग या संस्थांमार्फत केंद्रीय कोषागारातून वित्तीय हस्तांतरण तर होतेच पण अलीकडे या व्यतिरिक्तही अनुदाने व कर्जे दिली जात आहेत.

या उलट येथे हेही ध्यानात घेतले पाहिजे की केंद्राने राज्यांना अनुदान देण्याची जशी तरतूद आहे तशी राष्ट्रीय आपत्तीत, युद्धाच्या परिस्थितीत राज्यांनी केंद्राला अनुदान देण्याची कसलीही तरतूद नाही. म्हणजे संकटकाळात केंद्राला

स्वतःच्याच पायावर उभे राहावे लागणार आहे. अर्थात् परदेशी कर्जे उभारण्याचे व तुटीचा अर्थभरणा करण्याचे अधिकार केवळ केंद्रालाच आहेत. वास्तविक तुटीचा अर्थ भरण्यासंबंधीचा हा दावा तितका खरा नाही. कारण राज्यांनी देखील व्यवहारात तो अंमलात आणलेला आहे. राज्ये रिझर्व्ह बँकेकडून अधिकर्षित रकमांची मोठाली उचल करतात.[१] वसूल आणि विनियोग यातील कालापव्यय भरुन काढण्यापुरती ही सोय आहे. परंतु या सोयीचा राज्यांनी गैरफायदा घेतला असून नियमाबाहेर जाऊन अशी उचल निरंतर चालू राहील अशी व्यवस्था राज्यांनी केली असून परिणामी या मार्गाने राज्ये देखील आता तुटीच्या अर्थभरण्याचे धोरण अवलंबीत आहेत. तेव्हा तुटीच्या अर्थभरण्याची मक्तेदारी केवळ केंद्राची राहिलेली नाही. संकटकाळी केंद्राला घटकराज्यांवर विसंबून राहता येत नाही. त्यामुळे केंद्राची वित्तीय प्रबलता आवश्यक ठरते. या सगळ्या तरतुदी काटेकोर नसून लवचिकता राखण्यास त्यात बराच वाव आहे. प्रामुख्याने वित्ताचे लगाम केंद्राच्या स्वाधीन असले तरी लोकशाहीत चुकणाऱ्या व मागे पडणाऱ्या राज्यांना वळणावर आणण्यास त्यांची निश्चितच गरज आहे.

जाता जाता येथे आणखी एक गोष्ट नमूद करावयास हवी. राज्यांनी आपले कराधनाचे क्षेत्र स्वतःहून एकदा केंद्राच्या स्वाधीन केले– ( जसे कापड, तंबाखू, साखर यावर लादता येणारा राज्यांचा, केंद्रीय जादा उत्पादनशुल्काच्या मोबदल्यात सुपूर्त केलेला, विक्रीकर )– तर ते त्यांना पुनः परत घेता येत नाही.

केंद्र राज्य वित्तीय संबंध असे संविधानाने, कायद्याने आणि परंपरेने निर्माण झालेले आहेत. या तरतुदीत काटेकोरपणा नाही, तुटी नाहीत आणि कोणत्याही परिस्थितीत अडचणी आणणाऱ्या नाहीत अशी ग्वाही प्रशासन–सुधारणा समितीच्या केंद्र-राज्य संबंधांचा अभ्यास करणाऱ्या गटाने ( सप्टेंबर १९६७ ) दिलेली आहे. त्याचा पुनरुच्चार सहाव्या ( १९७३ ) व सातव्या ( १९७८ ) वित्त आयोगांनी केलेला आहे. या संविधानिक तरतुदींची कल्पकता, संयोजकता आणि सयुक्तता काळाने सिद्ध केलेली आहे.[२]

– २ –

असे असले तरी केंद्र-राज्य वित्तीय संबंधाची कचकच दर पाच वर्षांनी उद्भवलेली आहे, उद्भवत आहे. वित्त आयोग नेमल्यानंतर एकीकडे केंद्राचा कोषागार अधिकाधिक लुबाडण्यासाठी राज्यांची तर दुसरीकडे संविधानिक आणि राष्ट्रपतींच्या हुकमाने निर्देशित कलमांच्या चौकटीत बसेल इतके कोषागाराचे वाटप करण्यासाठी आणि वित्तीय तोल सांभाळण्यासाठी वित्त आयोगाची रस्सीखेच चालू असते. केंद्रात आणि राज्यांतून एकाच पक्षाची सरकारे असताना याचे स्वरूप सौम्य होते आणि संविधानच बदलावे अशी टोकाची भूमिका घेण्याचे धाडस कुणी केले नाही. परंतु काही राज्यांतून भिन्न पक्षांची सरकारे आल्यावर प्रकटपणे अशी मागणी केली जाऊ लागली. केंद्रानेही याला थोडा हातभार लावला.

१९५९ साली भारत सरकारने कायदा दुरुस्ती करून आयकरातून कंपन्यांवरील कर (निगम कर) वेगळा केला. हे घटनेला अनुसरून होते हे खरे, परंतु हा निर्णय राज्यांना विश्वासात न घेता एकतर्फी घेतला गेला. त्यामुळे तोवर असणाऱ्या विभाजनयोग्य आयकराची रक्कम एकदम कमी तर झालीच पण एका वाढत्या कराच्या उत्पन्नाच्या वाट्यास राज्ये वंचित झाली.

दुसरे असे की राज्यांच्या अनुमतीने १९५७ साली भारत सरकारने कापड, तंबाखू आणि साखर यांच्यावरील राज्यांच्या विक्रीकराऐवजी केंद्राचे जादा उत्पादनशुल्क लादले व ते विभाजनयोग्य ठरविले. परंतु या वस्तूवरील मूळ उत्पादनशुल्क ज्या प्रमाणाने वाढले त्या प्रमाणात त्यावरील जादा उत्पादनशुल्क वाढले नाही. त्यामुळे एरवी इतर वस्तूंवरील विक्रीकराप्रमाणे या तीन वस्तूंवरील विक्रीकर राज्यांनी वाढविला असता (आणि तो त्यांनी जरूर वाढविला असता) जेवढा महसूल वसूल झाला असता त्याहून कमी रकमेचे वाटप राज्यांना मिळू लागले.

तिसरे असे की संविधानाच्या कलम २६९ खाली केंद्र खालील कर लादू शकते पण त्यांचा सगळा (निव्वळ) वसूल राज्यांना द्यावा लागतो :

१. शेतकी जमिनीव्यतिरिक्त मालमत्तेवरील उत्तराधिकार शुल्क ( succession duty )
२. शेतकी जमिनीव्यतिरिक्त मालमत्तेवरील संपदा शुल्क
३. रेल्वे, सागर किंवा अंतराळ यातून होणाऱ्या मालाच्या किंवा उतारूंच्या वाहतुकीवरील सीमाशुल्क
४. रेल्वेभाडे व मालगाडीचा वाहतूक आकार यावरील कर
५. रोखेबाजार आणि वायदेबाजार यांतील व्यवहारावरील मुद्रांक शुल्काव्यतिरिक्त कर
६. वृत्तपत्रांची खरेदीविक्री व वृत्तपत्रीय जाहिराती यावरील कर
७. वृत्तपत्रे वगळून इतर वस्तूंच्या आंतरराज्यीय व्यापार व्यवहारातील खरेदी-विक्रीवरील कर

हे कर लादण्याचा केंद्राने मनापासून प्रयत्न केला नाही. यातील (१) उत्तराधिकार शुल्क, (३) सीमा शुल्क, (५) रोखे व वायदे-बाजारावरील कर व (६) वृत्तपत्रावरील कर केंद्राने लादले नाहीत. रेल्वेभाड्यावर १९५७ साली कर लादला पण १९६१ मध्ये तो रद्द करून भाड्यात समाविष्ट केला. रेल्वेभाडे वाढले पण या कराचे उत्पन्न, ठराविक मानले गेले. त्यातील लवचिकपणा जाऊन साचेबंदपणा आला यामुळे राज्यांना एका वाढत्या उत्पादनक्षेत्रास मुकावे लागले.

एकूण अनुदानात २७५ कलमाखालील संविधानिक अनुदानापेक्षा योजना आयोगाखालील अनुदानांचे प्रमाण वाढते राहिले. या दोन्ही आयोगांव्यतिरिक्तही अनुदान व कर्जे दिली जाऊ लागली. यामुळे केंद्राच्या ऐच्छिकतेचा भार व भाग वाढला असे राज्यांना वाटू लागून एक नवी पोटदुखी सुरू झाली. योजना आयोग व वित्त आयोग यांची उद्दिष्टे वेगळी आहेत हे सोयीस्करपणे विसरले गेले आणि योजना आयोग वित्त आयोगास गिळंकृत करीत आहे किंवा योजना आयोगाचे व वित्त आयोगाचे अनुदान-वाटपाचे कार्य दोहोंपैकी एका आयोगाकडे सुपूर्त करावे असे प्रतिपादन केले जाऊ लागले.

वित्त आयोग जशी राज्यांच्या राजकोषीय व्यवहारांची सूक्ष्मपणे चिकित्सा करतो तशी केंद्रीय राजकोषीय व्यवहारांची करीत नाही त्यामुळे विभाजनीय वित्तकोषाचा संकोच तुटपुंजा राहतो. अशा तऱ्हेची पंचवार्षिक प्रतिपादने राज्ये वित्तआयोगापुढे मांडीत आली आणि केंद्र-राज्यांच्या वित्तीय तर खरेच, पण एकूण संबंधावर सावट येऊ लागले. यातून प्रथम केंद्राने प्रशासकीय सुधारणा समिती (१९६७) नेमली. पण या समितीच्या शिफारशीमुळे समाधान न झाल्याने तामिळनाडू राज्याने स्वतःची वेगळी अशी समिती (१९७१) (हिला यापुढे या समितीचे अध्यक्ष डॉ. पी. व्ही. राजमन्नार यांच्या नावे म्हणजे राजमन्नार समिती असे संबोधू) नेमली. अगदी अलीकडे (१९७८) पश्चिम बंगाल सरकारनेही या विषयावर एक ज्ञापन प्रसिद्ध केले आहे. वित्त आयोगापुढे आलेल्या प्रतिपादनांचा, राजमन्नार समितीच्या अहवालाचा व पश्चिम बंगाल सरकारच्या ज्ञापनाचा परामर्श केंद्र-राज्य वित्तीय संबंधाचा विचार करताना डावलता येत नाही. परंतु त्यांचा समाचार येथे संक्षिप्तपणे घेणे शक्य आहे.

राजमन्नार समितीच्या अहवालाचा आणि पश्चिम बंगाल सरकारच्या ज्ञापनाचा प्रमुख रोख केंद्रकर्षी संविधानच बदलण्याचा आहे. या संविधानाने राज्ये दुर्बल बनली आहेत असा त्यांचा दावा. तामिळनाडू आणि पश्चिम बंगाल राज्ये स्वतंत्र होऊ इच्छितात हे तिथल्या काही पुढाऱ्यांची वक्तव्ये आठविल्यास स्पष्ट होणारे असून ही पार्श्वभूमी हा अहवाल व ज्ञापन यांची छाननी करताना विसरता येत नाही. तसेच 'संघराज्य'संबंधीचा त्यांचा दृष्टिकोन स्वतंत्र व स्वायत्त बनून टोळीने राहणे असा परंपरागत व अभिजात अर्थाचा आहे हेही ध्यानात ठेवावयास हवे. केंद्रकर्षी आणि घटकर्षी असे हे एकदम विरोधी दृष्टिकोन आहेत. राज्ये स्वायत्त आहेत, पण मनमानी सरंजामदार नाहीत हेच कदाचित त्यांचे दुःख असेल. "राज्ये प्रबल हवीत पण केंद्र दुर्बल असता कामा नये असे भारताचे स्वातंत्र्य व ऐक्य

अबाधित राहण्यासाठी तामिळनाडूस वाटते तर केंद्राच्या धोरणाचा पाठपुरावा केला नाही तर या ना त्या मार्गाने राज्य-मंत्रिमंडळे बरखास्त केली जातील या भीतीपोटी पश्चिम बंगालला राज्ये प्रबळ असावी असे वाटते.[3] त्यांच्या बव्हंशी सूचना राजकीय हेतूने प्रेरित आहेत हे या अहवाल आणि ज्ञापन यांच्या वाचनाने स्वच्छ दिसते.

अशा राजकीय डावपेचांचा अवलंब केंद्रात व राज्यात एकच पक्ष असला तरी केला गेला आहे. पण त्याचे मूळ वित्तीय संबंधात नसून अन्यत्र शोधावयास हवे. आंतरराज्यीय तंटे, संविधानाचा किंवा कायद्याचा आधार न घेता पक्षाच्या छत्राखाली सोडविण्याचा प्रयत्न केला गेला. जिथे मतभेद राहिले तिथे प्रश्न लोंबकळत ठेवला गेला. पुढाऱ्यांच्या दबावाखाली प्रश्न बाजूला सारले गेले. नद्यांचे तंटे, पोलाद कारखान्यांची स्थापना, नैसर्गिक वायूंचे वाटप, पाटबंधाऱ्यांचे प्रकल्प, असे अनेक प्रश्न संविधानाच्या चौकटीच्या बाहेर सोडविण्याचा प्रयत्न झाला. त्यातील उद्रेकाची झळ वित्तसंबंधासही लागली व ते ठुसठुसत राहिले.

केंद्रराज्य वित्तसंबंधाबद्दलचे असमाधान त्या त्या मंत्र्यांच्या संकुचितपणातून किंवा हट्टवादीपणातून निर्माण होत असण्याची अशक्यता नाकारता येणारी नाही. प्रत्येक मंत्र्याची कारभाराची तऱ्हा वेगळी असते आणि विचित्र कारभारामुळे कुरबूर सुरू होऊ शकते.[4] यातील राजकीय तणाव आपल्याला बाजूला सारायला हवेत. वित्तसंबंध प्रस्थापित करण्यास भारतीय संविधानातील तरतुदी कल्पक, लवचिक आणि सयुक्तिक असून त्यासाठी संविधान बदलण्याची मुळीच गरज नाही.[5] जी कुरबुर व कचकच आहे ती राजकीय आणि प्रशासकीय आहे व ती त्या त्या पातळीवर सोडवावयास पाहिजे.

— ३ —

हे एकदा मान्य केल्यानंतर केंद्र राज्य वित्तीय संबंधाचा विचार करताना खालील प्रश्नांची उत्तरे शोधावी लागतात.

१. वित्तीय हस्तांतरणात कितपत लवचिकता आहे ?

२. राज्यांचा वित्तीय तोल सांभाळण्यासाठी वित्तआयोगाने कोणते उपाय योजले ?

३. योजना आयोग आणि वित्त आयोग यांच्यात खरोखरच तेढ येते काय ?

४. राज्यांचा राजकोष तोकडा का पडतो ?

या प्रश्नांच्या अनुषंगाने पुढील चर्चा मर्यादित आहे.

यापुढे जे आकडे नमूद केलेले आहेत हे सहाव्या वित्त आयोगाच्या काळातील म्हणजे १९७४-७५ ते १९७८-७९ या काळातील आणि सातव्या आयोगाच्या काळातील पहिल्या तीन वर्षांचे म्हणजे १९७९–८० ते १९८१–८२ (अंदाज) या काळातील वार्षिक सरासरीचे आहेत. अंदाज आणि प्रत्यक्ष यात नेहमीच तफावत पडते हे खरे असले तरी प्रत्यक्षाचे आकडे उपलब्ध नसल्याने १९८०–८१ व १९८१–८२ या सालासाठी सुधारित अंदाजाच्या आणि संकलित अंदाजाच्या आकड्यांवरून सरासरी काढावी लागली आहे. या सरासरीचा हेतू केवळ कल कुणीकडे झुकत आहे हे पाहण्यासाठी असल्याने त्या दृष्टीने मोठासा फरक पडू नये.

केंद्र सरकारच्या महसुलातून (विभाजनीय करांचा राज्यांचा वाटा वगळता व केंद्राचा संरक्षण, प्रशासन यांवरील व विकासार्थ महसुली खर्च वगळता) केंद्राकडे अनुक्रमे १५७३.५ कोटी रुपये व १०१०.७ कोटी रुपये सालीना उरले. तसेच भांडवली खात्यावरील वसुलीतून संरक्षण व इतर भांडवली खर्च वगळता केंद्राकडे अनुक्रमे (–) १७०.२० कोटी रुपये व (+) ९५९.८ कोटी रुपये राहिले. यातून केंद्राने राज्यांना १०३६.५ कोटी रुपये व २१४१.७ कोटी रुपये अनुदान व १०९३.५ कोटी रुपये व १८११.२ कोटी रुपये कर्जे दिली. (अधिक तपशिला-साठी निबंधाच्या शेवटी तक्ता क्र. ४ पाहा.)

## तक्ता क्र. १

**केंद्रीय महसूल व भांडवली वसूल व राज्यांना अनुदाने व कर्जे**
**वार्षिक सरासरी (कोटी रुपये)**

| | सहावा वित्त-आयोग काल | सातवा वित्त-आयोग काल |
|---|---|---|
| महसुली जमा | १५७३.५ | १०१०.७ |
| भांडवली वसूल (शिल्लक) | (–) १७२.० | (+)९५९.८ |
| | १४०१.५ | १९७०.५ |
| राज्यांना अनुदान | १०३६.५ | २१४१.७ |
| राज्यांना कर्जे | १०९३.५ | १८११.२ |
| | २१३०.० | ३९५२.९ |
| केंद्राला उरलेली रक्कम | (–)७२८.५ | (–)१९८२.४ |

यावरून असे दिसते की उपलब्ध महसुलाच्या व भांडवली वसुलाच्या १५२ टक्क्यांवरून २०१ टक्क्यांपर्यंत केंद्राने राज्यांना अनुदाने व कर्जे दिली/देऊ केली. केंद्राची तूट वाढली. पण ती राज्यांना अनुदाने व कर्जे दिली म्हणून वाढली असे सरसकट विधान करता यावयाचे नाही. केंद्राचा संरक्षणावरील, विकासाव्यतिरिक्त महसुली व भांडवली खर्च वाढला आणि विकासार्थ विनियोग वाढला म्हणूनही ही तूट वाढली असण्याची शक्यता आहे. केंद्राचे हे खर्च जेवढे दिले आहेत तेवढे सगळे घेतलेले असून ते गृहीत धरलेले आहेत. त्यांची अधिक चिकित्सा केलेली नाही.

केंद्राने विकासार्थ उपलब्ध महसुलाच्या अनुक्रमे २९.२ टक्के व ४७.३ टक्के म्हणजे वाढत्या प्रमाणात राज्यांना अनुदाने दिली. तसेच विकासार्थ उपलब्ध भांडवली वसुलाच्या अनुक्रमे ७०.५ टक्के व ४६.६ टक्के कर्जे दिली. राज्यांना देऊ केलेल्या कर्जाचे प्रमाण घटले आहे. केंद्राकडे विकासार्थ उपलब्ध महसूल व भांडवली वसूल यातून राज्यांना केंद्राने दिलेली अनुदाने व कर्जे दोन्ही मिळून ४१ टक्क्यांवरून ४७ टक्क्यांपर्यंत वाढ झालेली दिसते. (पाहा तक्ता क्र. ५).

केवळ विभाजनीय करांचा विचार केल्यास विभाजनीय करांच्या महसुलाच्या अनुक्रमे ३१.० टक्के व ४७.७ टक्के इतका म्हणजे वाढता वाटा राज्यांना उपलब्ध झाला आहे. यात उत्पादनशुल्कावर अधिक भर असल्याचे आढळते. (पाहा तक्ता क्र. ६).

कर, अनुदाने व कर्जे तसेच वित्त आयोग व योजना आयोग यांच्या एकूण वित्तीय हस्तांतरणाचा विचार करता असे आढळते की सुरुवातीस म्हणजे १९५१–५५ या काळात योजना आयोगाचे महत्त्व जास्त होते तरी ते १९८१–८२ (अंदाज) साली कमी झालेले आहे. तसेच अनुदानापेक्षा करांच्या वाटपावर वाढता भर आहे.

## तक्ता क्र. २

### एकूण हस्तांतरित रकमेचे प्रमाण (टक्के)

| | १९५१–५५ | १९७४–७९ | १९८१–८२ (अंदाज) |
|---|---|---|---|
| एकूण विभाजनीय कर | २४.० | ३३.० | ४०.४ |
| वित्तआयोगाची अनुदाने | ७.२ | ११.२ | ३.२ |
| योजनाआयोगाची अनुदाने आणि कर्जे | ६१.५ | ४०.९ | ४०.३ |
| इतर अनुदाने व कर्जे | ७.३ | १४.९ | १६.१ |
| एकूण | १००.० | १००.० | १००.० |

**टीप :** (अधिक तपशिलासाठी तक्ता क्र. ७ पाहा)

यावरून हे स्पष्ट होते की केंद्राकडून राज्यांना होणाऱ्या एकूण हस्तांतरणात साचेबंदपणा नाही. लवचिकपणा जरूर आहे.

एकूण हस्तांतरणात कर, अनुदान व कर्जे यांचा विचार केल्यास असे दिसते :

## तक्ता क्र. ३

### हस्तांतरणाचे मार्ग (टक्के)

| | १९७४–७९ | १९८१–८२ अंदाज |
|---|---|---|
| विभाजनीय कर | ३३.० | ४०.४ |
| अनुदाने | ३२.२ | २७.१ |
| कर्जे | ३४.८ | ३२.५ |
| | १००.० | १००.० |

**टीप** : (अधिक तपशिलासाठी तक्ता क्रमांक ७ पाहा)

विभागीय करात थोडी वाढ झाली हे खरे. पण कर्जावरील भर म्हणावा तसा बदललेला नाही. याचा एक परिणाम असा दिसतो की राज्यांच्या विकासाव्यतिरिक्त महसुली खर्चाच्या जवळजवळ १९ टक्के इतकी रक्कम व्याजाच्या रूपाने राज्यांना केंद्राला द्यावी लागते. कर आणि अनुदान यामध्ये अनुदानावरील भर कमी झाला आहे हेही दृष्टोत्पत्तीस येते.

वित्तीय हस्तांतरणात साचेबंदपणा किंवा काटेकोरपणा नाही हें नमूद करीत असतानाच जो लवचिकपणा आहे तो कितपत आहे, तो कसा वाढविणे शक्य आहे याचा विचार आवश्यक ठरतो. पण तत्पूर्वी केंद्राच्या महसुलाचा व विनियोगाचा विचार करून केंद्राला राज्यांना किती देणे शक्य आहे हे देखील पाहावे लागते.

– ४ –

केंद्रीय करात महत्त्वाचे कर म्हणजे जकात व निगमकर तर विभाजनीय करात केंद्र उत्पादनशुल्क व प्राप्तिकर यांचा प्रामुख्याने समावेश आहे. या सर्व करात वाढ झालेली आहे. एकूण करवाढीत केंद्र उत्पादनशुल्क, जकात, प्राप्तिकर आणि निगमकर यांचे एकून प्रमाण अधिक आहे. केंद्र उत्पादनशुल्कात एकूण वाढीच्या ३५.१ टक्क्याने वाढ झाली तर जादा उत्पादनशुल्कातील वाढीचे प्रमाण फक्त २.२ टक्के होते. जादा उत्पादनशुल्कातील वाढीची राज्यांच्या

विक्रीकरातील वाढीशी तुलना करता असे आढळते की विक्रीकरातील वाढ एकूण महसुलातील वाढीच्या ४४.३ टक्के ठरते. त्यामानाने जादा उत्पादनशुल्कात वाढ झालेली नाही हेही इथे जाताजाता ध्यानात ठेवावयास हवे.

केंद्राच्या एकूण महसुलात सरासरीने केंद्रीय अखत्यारीतील कर व इतर उत्पन्न मिळून १९७४–७९ मध्ये ४९.४ टक्के प्रमाण होते, व विभाजनीय करांच्या उत्पन्नाचे प्रमाण ५०.६ टक्के होते. १९७९–८२ (अंदाज) या त्रैवार्षिक सरासरीत हे प्रमाण अनुक्रमे ५२.३ व ४७.७ टक्के असल्याचे दिसते. म्हणजे आपले उत्पन्न वाढविण्यासाठी केंद्राला विभाजनीय (स्थूल) कर -- उत्पन्नापेक्षा अधिकतर जकात, निगमकर, व्याजवसूल यावरच भर द्यावा लागला आहे. (पाहा तक्ता क्र. ८)

राज्यांना विभागून उरलेल्या महसुलाच्या सरासरीने अनुक्रमे ८२ टक्के व ९२ टक्के केंद्राचा संरक्षण, बिगरविकास महसुली खर्च आणि विकासार्थ खर्च आहे. उरलेला महसूल विकासार्थ अनुदान देण्यात खर्ची पडलेला आहे. किंबहुना १९७९–८२ (अंदाज) या कालाच्या वार्षिक सरासरीवरून असे दिसते की महसुलापेक्षा अधिकच (म्हणजेतुटीचा अर्थभरणा करून) केंद्राने विकासार्थ अनुदान दिले आहे.

तुटीचा अर्थभरणा किती असावा याचे काही प्रमाण ठरविता येत नाही. ते एकंदर नैसर्गिक आणि आर्थिक स्थितीवर व भाववाढीचे प्रमाण समाज किती सोसू शकतो किंवा इच्छितो यावर अवलंबून राहील. यामुळे तुटीचा अर्थभरणा करण्याचा मक्ता केवळ केंद्राचा आहे व म्हणून तसा तो करून केंद्राने करातून अधिक उत्पन्न राज्यांना विभागून द्यावे असा जो काही राज्यांचा सूर आहे तो चुकीचा आहे. त्यावर फारसे विसंबून राहता येत नाही.

केंद्राच्या जकातीच्या उत्पन्नात आपल्याला वाटा मिळावा असाही काही राज्यांनी दावा मांडलेला आहे.[३] या महसुलाचे उत्पन्न वाढते व लवचिक आहे. एकूण उत्पन्नाच्या २०.२ टक्के त्याचे उत्पन्न आहे.[७] हे या महसुलाचा वाटा मागण्यामागील कारण आहे. याहीपुढे जाऊन पश्चिम बंगाल सरकारने तर केंद्राच्या एकूण महसुलाच्या पाऊणपट रक्कम राज्यांना वाटावी अशी मागणी केलेली आहे.[८] केंद्राला दुर्बळ करण्याचा हा घाट आहे. त्याला मान्यता देता येणार नाही.

केंद्रीय करात प्राप्तिकर, प्राप्तिकरावरील अधिभार आणि निगमकर यांचा एकत्रित विचार केला पाहिजे. प्राप्तीवरील करातून कंपन्यांच्या नफ्यावरील कर कायद्याने वेगळा करून तो निगमकरात समाविष्ट केला गेल्याने राज्ये रुष्ट झालेली आहेत. निगमकर हा केवळ केंद्राच्या अखत्यारीतील कर आहे. तसेच केंद्रशासन प्राप्तिकरावर आवश्यक तेव्हा अधिभार लादू शकते व त्याचे उत्पन्न केवळ केंद्रालाच उपलब्ध होते. काही विशिष्ट कारणासाठी व विशिष्ट सालासाठी असा अधिभार लावण्याची सामान्य पद्धत असते. पण तो जर अव्याहतपणे लावला जाऊ लागला तर त्याला वाढीव मूळ प्राप्तिकराचेच स्वरूप येते. केंद्राच्या प्राप्तीवरील अधिभाराला आता हे असे स्वरूप आलेले आहे व त्यामुळे अधिभारातही राज्यांनी वाटा मागितल्यास तो तर्कास धरून आहे. तसेच कंपन्यांना उद्योग स्थापन करण्यासाठी लागणाऱ्या सुविधा राज्यांना द्याव्या लागतात व त्यासाठी खर्च करावा लागतो. राज्यांच्या सहभागाशिवाय उद्योग स्थापन करता येत नाही. त्यामुळे निर्माण होणाऱ्या नफ्यावरील करात म्हणजे निगमकरात राज्यांनी वाटा मागितला तर तो देखील योग्य वाटतो. भारतीय संविधानाच्या तरतुदीप्रमाणे हे कर केवळ केंद्राचे असले तरी त्यात संविधानिक बदल करून ते विभाजनीय करात समाविष्ट करावयास हरकत नसावी. सातव्या वित्त-आयोगाने केंद्राला असे सौम्यपणे सूचित केलेले आहे.[९]

केंद्राच्या उत्पादनशुल्कावरही राज्यांचा डोळा आहे. हा करही वाढता व लवचिक आहे. राज्याचे विक्रीकर आणि केंद्राचे उत्पादनशुल्क वस्तूंचे उत्पादन, किमती आणि मागणी यावर परिणाम करणारे म्हणून परस्परांवर मर्यादा घालणारे आहेत. राज्यांचा विक्रीकर काढून टाकावा आणि त्याऐवजी केंद्रीय उत्पादनशुल्क लादावे अशी समस्त उत्पादक आणि व्यापाऱ्यांची मागणी आहे. उलट उत्पादनशुल्क आणि विक्रीकर या

दोन्हीऐवजी पर्यायी मूल्यवाढकर असावा अशीही मागणी केली जाते. मूल्यवाढकराची चर्चा येथे प्रस्तुत नाही. पण एवढे लक्षात ठेवले पाहिजे की मूल्यवाढकराचा दर चढ असतो आणि तो गोळा करण्याचा प्रशासनीय खर्चही कमी असत नाही.[१०] तेव्हा एव्हाना रुळलेल्या अशा राज्यांच्या विक्रीकराऐवजी मूल्यवाढकराचा पर्याय फारसा आकर्षक दिसत नाही. उलट त्यामुळे गोंधळात अधिक भर पडण्याचाच संभव आहे.

आता राज्यांचा विक्रीकर काढून घ्यावा व केंद्राने त्याऐवजी उत्पादनशुल्क लादावे अशीही मागणी केली गेली आहे. राज्यांची जी आर्थिक स्वायत्तता आहे ती बव्हंशी विक्रीकरामुळेच आहे. राज्यांच्या एकूण कर आणि बिगरकर महसुलाच्या ४० टक्के महसूल विक्रीकरापासुन जमा झाला व महसुलातील वाढीच्या ४४.३ टक्के वाढ विक्रीकरामुळे झाली. एवढे मोठे व लवचिक साधन सोडून देण्यास राज्ये तयार होणार नाहीत, होत नाहीत. एकदा सुपूर्त केलेला कराधानाचा अधिकार परत घेता येत नाही. यामुळे सगळ्या वस्तूंवरील विक्रीकर तर नाहीच परंतु काही वस्तूंवरील विक्रीकरदेखील केंद्राला सुपूर्त करायला राज्ये तयार होणार नाहीत. शिवाय सुपूर्त केलेल्या चार वस्तूंवरील विक्रीकराऐवजीच्या जादा उत्पादनशुल्कात म्हणावी तशी वाढ केंद्राने केलेली नाही हा राज्यांनी केंद्रावर ठेवलेला ठपका लक्षात घेता काही वस्तूंवरील विक्रीकरदेखील सुपूर्त करण्याला राज्यांचा असलेला विरोध समजण्याजोगा आहे.

विक्रीकर व उत्पादनशुल्कही परस्परांना मर्यादा घालतात. त्यांचे भाववाढ व उत्पादन यावरील परिणाम लक्षात घेता हे दोन्ही कर एकदम वाढविता येत नाहीत. तेव्हा राज्यांचा विक्रीकराचा दर व महसूल वाढवावयाचा असेल तर केंद्राने स्वतःहून उत्पादनशुल्काच्या दरातील वाढीवर मर्यादा घालून घ्यावी. विक्रीकराबाबतची प्रमुख तक्रार त्याच्या प्रशासनातील अडवणुकी व अडचणीबद्दल आहेत. ती प्रशासन सुधारून व हिशेबतपासणीच्या पद्धती सोप्या करून सोडविता येऊ शकतील असे वाटते व त्या दृष्टीने प्रयत्न व्हावा. विक्रीकराऐवजी जादा उत्पादनशुल्क लादण्याने प्रश्न सुटण्याऐवजी केंद्र-राज्य वित्तीय संबंधात अधिक तेढ निर्माण होणारी आहे हे विसरता येत नाही.

राज्यांना मिळावयाच्या वित्तीय हस्तांतरणात उत्पादनशुल्कावर भर आहे. उत्पादनशुल्कातील किती भाग राज्यांना वाटावयाचा हे केंद्रीय राज्यकोषाची परिस्थिती पाहून ठरवावयास हवे. वित्त आयोगाची कसरत प्रामुख्याने ह्या कराभोवतीच घोटाळते. या करातील राज्यांचा वाटा त्यांनी वाढताच ठेवलेला आहे. १९७४–७९ या सहाव्या वित्त आयोगाच्या काळातील हा (स्थूल) वाटा २३.३ टक्क्यावरून सातव्या वित्त आयोगाच्या काळात तो ४३.१ टक्क्यापर्यंत वाढला.[११] (पाहा तक्ता क्र. ६).

येथे एका मुद्याचा उल्लेख करावासा वाटतो. केंद्राच्या उत्पादनशुल्कात राज्ये वाढता वाटा मागतात. पण स्थानिक स्वराज्यसंस्था -- कॉर्पोरेशन, म्युनिसिपालट्या आणि पंचायती--जेव्हा विक्रीकरातील वाटा मागू पाहतात तेव्हा तो राज्ये नाकारतात हा राज्यांच्या वागणुकीतील विरोधाभास विसरता येत नाही.

राज्यांना विक्रीकर अधिक लवचिक करावयास मुभा द्यावयाची झाल्यास केंद्राने उत्पादनशुल्कावर मर्यादा घालावयास हवी. या दोन्हींचा तोल सांभाळण्यासाठी कायमची अशी एक समितीच नेमावयास पाहिजे. यामुळे केंद्राचे उत्पादनशुल्काचे उत्पन्न व यातील राज्यांचा वाटा आजच्यापेक्षा कमी होण्याचा संभव आहे. परंतु तो वाढीव विक्रीकरातून राज्ये भरून काढू शकतील. विक्रीकराचा अधिकार केंद्राला सुपूर्त न करण्याने राज्ये आपली वित्तीय स्वायत्तता अधिक राखू शकतील.

संविधानाच्या कलम २६९ मध्ये नमूद केलेल्या करांचे केंद्राने समुपयोजन केलेले नाही अशी राज्यांची तक्रार आहे. या करांचे उत्पन्न, प्रशासनीय खर्च व त्यांचा बोजा यांचा केंद्राला विचार करावयास हवा. त्या दृष्टीने सगळेच कर लादता येतील असे नव्हे. रेल्वे प्रवासी भाड्यावरील कर केंद्राने १९५७ मध्ये भाड्यात विलीन केला. पण त्याऐवजी राज्यांना तेवढ्या उत्पन्नाचे अनुदान देऊ केले पण हे अनुदान १६.२५ कोटी

रुपयावरच अवरोधून ठेवले गेले. हा कर जर चालू ठेवला असता तर त्याचे १९७६–७९ या तीन वर्षांत सरासरी उत्पन्न वर्षाला ६०.२० कोटी रुपये आले असते. करात केवढी वाढ झाली असती याचा असा काल्पनिक अंदाज न करता प्रवासी वाहतुकीत किती वाढ झाली एवढे जरी पाहिले तरी राज्यांना मिळावयाच्या अनुदानाची रक्कम सालिना २३ कोटी रुपये होईल असे सातव्या वित्तआयोगाने नमूद केलेले आहे.[१२] रेल्वेचा वाढता खर्च, नवीन रेल्वेमार्ग चालू करण्याची राज्यांची मागणी आणि वाढत्या रेल्वेउतारूंना त्यांच्या स्थळी पोचविण्यासाठी राज्यांना करावी लागणारी व्यवस्था या सर्वांचा विचार करून ही अनुदानाची रक्कम ठरवावी व त्यासाठी हा प्रश्न रेल्वे कन्व्हेन्शन कमिटीकडे सोपवावा असे सातव्या वित्त आयोगाने सूचित केले आहे. संविधानाच्या कलम २६९ खालील या करात राज्यांना वाढता वाटा मिळावयास हवा व केंद्राने तो देऊ करणे अगत्याचे आहे.

वित्तीय हस्तांतरणात हक्काने मिळावयाच्या करावर विशेष भर असावा, व ऐच्छिक अनुदानावरील भर कमी केला जावा अशी राज्यांची मागणी आहे. हाच दृष्टिकोन सगळ्या वित्त आयोगांनी बाळगलेला आहे. संविधानाच्या कलम २७५ खाली करांचा वाटा देऊन काही खास कारणामुळे किंवा त्यांच्या मागासलेपणामुळे राज्यांना महसुली तूट येत असेल तर ती केंद्रीय अनुदानाने भरून काढावी लागते. यासाठी वित्त आयोगांना राज्यांचा राजकोषीय जमाखर्च तपासावा लागतो. राज्यांना आपले पुढील पाच वर्षांचे जमाखर्चाचे अंदाज वित्त आयोगास सादर करावे लागतात. हे अंदाज प्राप्तीच्या बाजूला दाबले गेलेले तर खर्चाच्या बाजूला फुगवलेले असतात असे आढळले आहे. कांही वेळा काही खर्चाच्या बाबी राज्यांच्या नजरेतून चुकून सुटलेल्या आढळतात. हे ध्यानात घेऊन काही गृहीतकावर आधारून वित्त आयोग ते एका पातळीवर आणते. उदाहरण द्यावयाचे तर सिंचन–दराचे देता येईल. सिंचनावर सर्वच राज्यांनी बारेमाप गुंतवणूक केलेली आहे. परंतु मतदार शेतकऱ्यांना दुखवू नये म्हणून राजकीय कारणासाठी पाटाचे पाणी वापरण्यासाठी त्यांच्याकडून फारशी किंमत घेतली जात नाही. सिंचनाच्या पाणीपुरवठ्यावरही खर्च करावा लागतो. अशा खर्चाची भरपायी व्हावी व वर एकूण गुंतवणुकीवर निदान एक टक्का नफा मिळेल असे राज्यांचे उत्पन्न असावे असे सातव्या आयोगाने गृहीत धरले आहे. वीजपुरवठा व परिवहन याहीबाबतीत आयोगाने काही प्रमाणात नफा गृहीत धरला आहे. सातव्या वित्त आयोगाच्या काळात राज्यांनी ३४१०४.५३ कोटी रुपयांची महसुली तूट दाखविली होती. वित्तआयोगाने विविध गृहितकांवर आधारून (ज्यांची चर्चा इथे प्रस्तुत नाही) ती ६८२३.८० कोटी रुपयांवर आणली. व यावर आधारून कोणत्या राज्यांना किती अनुदान द्यावयाचे हे ठरविले. हे अनुदान सरसकट सगळ्या राज्यांना नसून विभाजनीय करांच्या महसुलाचा वाटा दिल्यावर कोणत्या राज्यांना किती तूट येते हे तपासून दिलेले आहे. (तक्ता क्र. ९ पाहा).

राज्यांचे राजकोषीय व्यवहाराचे अंदाज तपासण्याचे वित्त आयोगास कोणते अधिकार आहेत असा काही राज्यांनी प्रश्न उपस्थित केलेला आहे. पण करांचे उत्पन्न व अनुदान अधिकाधिक मिळविण्यासाठी वित्त आयोगास अंदाज देताना राज्ये स्वतःचा महसूल दाबून ठेवतात व खर्च फुगवून दाखवितात. या उलट वाढत्या योजना पदरात पाडून घेण्यासाठी आपण महसूल वाढवू शकू असा आभास योजना आयोगापुढे निर्माण करतात. राज्यांचा हा दुहेरी खेळ पाहिल्यास वित्त आयोग राज्यांचा राजकोषीय व्यवहार तपासते व ते सगळे एका स्तरावर आणते यात काही चुकीचे आहे असे वाटत नाही. राज्यावर केंद्राचा अविश्वास आहे असे नाही. वित्त आयोगाचा विश्वास बसावा असे राजकोषीय अंदाज राज्यांनी देखील मांडलेले नाहीत.

राज्यांच्या या प्रश्नामागची भूमिका अशी की वित्त आयोग अशाच तऱ्हेने केंद्राचेही संकल्प तपासीत नाही. तसे ते तपासले जात नव्हते हे खरे. परंतु सातव्या वित्त आयोगाने (१९७८) केंद्राच्या महसुली अंदाजाचाही प्रथमच विचार केलेला आहे व राज्यांच्या या तक्रारीतील आता हवाच काढून घेतलेली आहे.

वित्त आयोग आणि योजना आयोग यांच्या वित्तीय हस्तांतरणात योजना आयोगाने वित्त आयोगावर कुरघोडी केली आहे अशी राज्यांची तक्रार आहे. परंतु पहिल्या पंचवार्षिक योजना–काळाच्या तुलनेने योजना आयोगाचे

– ५ –

हस्तांतरण एकूण हस्तांतरणाच्या ६१.५ टक्क्यावरुन १९८१–८२ (अंदाज) या सालात ४०.३ टक्क्यावर येऊन ठेपले आहे. याउलट वित्तआयोगाचे हस्तांतरण ३१.२ टक्क्यावरुन ४३.६ टक्क्यावर येऊन वाढलेले आहे. म्हणजे राज्यांच्या या तक्रारीत आता फारसा अर्थ राहिलेला दिसत नाही.

वित्त आयोग आणि योजनाआयोग हे एकमेकांचे स्पर्धक आहेत अशी समजूत करून घेणे चुकीचे आहे. वित्त आयोग राज्यांच्या चालू व्यवस्थेवरील महसुली खर्चाचा विचार करते तर योजना आयोग राज्यांचा विकास कशा रीतीने व्हावा, विकासातील असमतोल कसा घालवावा व त्यासाठी महसुली व भांडवली खर्च किती भरावा लागेल याचा म्हणजे विकासाच्या दृष्टीने राज्यांच्या वित्तव्यवहारास कोणते वळण द्यावे याचा भविष्यकालीन वेध घेत असते. या दोन्ही आयोगांची उद्दिष्टे व कार्ये यांच्यात मूलभूत फरक आहे हे ध्यानात ठेवावयास हवे. योजना आयोगाने मान्य केलेल्या प्रकल्पावर तो योजना-काल संपल्यावर नेहमीसाठी राज्यांना चालू खर्च करावा लागतो. असा बांधील खर्च वित्त आयोग विचारात घेते. सातव्या वित्त आयोगाने तसा तो घेतलेला आहे.

योजना आयोग आणि वित्त आयोग यांच्या कार्यात विचारसुसूत्रता यावी म्हणून राजमन्नार समितीने वित्त आयोगावर योजना आयोगाचा एक सभासद राहावा अशी सूचना केलेली होती. ही सूचना केंद्राने मानलेली दिसते. सहाव्या व सातव्या वित्त आयोगावर योजना आयोगाचा एक सभासद म्हणून नेमलेला होता.

– ६ –

केंद्र–राज्य वित्तीय संबंधांचा विचार करताना केंद्राने राज्यांना दिलेल्या कर्जांचाही विचार आवश्यक ठरतो. १९७८–७९ अखेर या कर्जांची रक्कम १३४६२.८४ कोटी रुपये भरली व ती राज्यांच्या एकूण कर्जांच्या रकमेच्या ७१.२ टक्के होती. यात पुढे सालिना १८११.२ कोटी रुपयांची भर पडली. या कर्जात योजनेसाठी व बिगर योजनेसाठी अशी दोन प्रकारची कर्जे असून बिगर योजनेसाठी असलेल्या कर्जाचा विचार प्रथमच सहाव्या वित्त आयोगाने व नंतर सातव्या वित्त आयोगाने केला. कर्जाची मुदत, त्यावरील व्याजाचा दर व काही कर्जांचे निर्लेखीकरण अशा मुद्द्यांचा विचार यात अभिप्रेत होता. काही राज्यांनी शेतकऱ्यांची कर्जे जशी माफ केली तशीच केंद्रानेही आपल्या कर्जाच्या जवळजवळ निम्म्याने ही कर्जे माफ करावीत अशी मागणी केलेली आहे.

कर्जमाफी लेखणीच्या एका फटकाऱ्याने होऊ शकते. पण त्याचा आर्थिक आणि मानसिक परिणाम भयानक आहे. कर्जमाफीचा बोजा शेवटी करदात्यावरच पडणार. कर्जे माफ होतात असे दिसले की बुडवण्यासाठीच कर्जे घेण्याची प्रवृत्ती वाढते. आपला राजकोषीय व्यवहार संतुलित न राखता प्रथम रिझर्व बँकेकडून अधिकर्षित उचल करून नंतर त्यासाठी कर्ज देण्यास केंद्रावर दडपण आणण्याकडे प्रवृत्ती वाढते. आर्थिक बेशिस्तीकडे नेणारी ही प्रवृत्ती आहे.

आर्थिक बेशिस्तीचे आणखी एक उदाहरण येथे नमूद करावयास हवे. काही राज्ये शेतसारा सरसकट काढून टाकण्याचा किंवा ५ ते १० एकरांपर्यंतचा शेतसारा काढून टाकण्याचा निर्णय घेतात. परंतु त्याऐवजी शेतीउत्पन्नावर प्राप्तिकर बसवीत नाहीत. शेतसारा हा आता शेतजमिनीवरील कर असा राहिलेला नाही तर ते शेत-नोंदणीशुल्क राहिलेले आहे, व नोंदणी चोख राहण्यास ते आवश्यक आहे. पण तेवढेही शुल्क लादण्यास राज्ये असमान करू लागली आहेत. यात केवळ राजकीय हेतू आहे. पण त्यामुळे काही कोटींचा महसूल राज्यांनी गमावलेला आहे.

एकीकडे केंद्र आपल्या मनास येईल तेव्हा संविधानाच्या कलम २६९ खाली कर लादते (उ. रेल्वेप्रवासी भाड्यावरील कर) व काढून टाकते, व त्याआधी आपल्याला सूचनाही देत नाही अशी राज्ये तक्रार करीत असतात तर दुसरीकडे केंद्राला विश्वासात न घेता राज्येही शेतसारा एकतर्फी काढून टाकण्याकडे प्रवृत्त असतात. हा

विरोधाभासही लक्षात ठेवण्याजोगा आहे. असे कर कमी करण्याने राज्यांना केंद्राच्या अधिक अनुदानावर किंवा कर्जावर अवलंबून राहावे लागते हे राज्यांनी लक्षात ठेवावयास हवे.

सातव्या वित्त आयोगाने बिगर योजना कर्जाची स्थूलपणे उत्पादक, निमउत्पादक व अनुत्पादक अशी वर्गवारी केली आणि अनुत्पादक कर्जाचे निर्लेखीकरण केले जावे अशी शिफारस केली. यात प्रामुख्याने आसाम-नागालँड अशा सीमेवरील व मागास राज्यांचाच समावेश आहे. या शिफारशीनुसार ९३८.३ कोटी रुपये कर्जाचे निर्लेखीकरण केले गेले आहे.

— ७ —

केंद्र-राज्य वित्तीय संबंध चांगले राहण्यासाठी आपापले राजकोष मजबूत राखण्याकडे केंद्राने व राज्यांनी सतत प्रयत्नशील राहिले पाहिजे. या बाबतीत एक गोष्ट लक्षात येते ती अशी की दोघांनीही सार्वजनिक गुंतवणुकी-पासून नफा तर राहोच पण निदान नुकसान होणार नाही याकडे दुर्लक्ष केलेले आहे. नुकसानीचा बोजा वाढतच आहे. व्यवस्थापकीय ढिलेपणा, पैशाची उधळपट्टी, प्रकल्पातील विलंब, अशा अनेक गोष्टींमुळे हे नुकसान वाढते आहे. सार्वजनिक बांधकामे व प्रकल्प यावरील खर्च तर मूळ अंदाजाच्या कितीतरी पट वाढलेला दिसतो. हे खर्च वाढण्याची कारणे अशी :

**अ. धोरणात बदल–**

१. प्रकल्पाच्या जागेत बदल
२. प्रकल्प सुरू झाल्यावर मूळ संकल्पनात बदल
३. आराखड्याची आणि प्राक्कलनांची तज्ज्ञांकडून तपासणी करून न घेताच कामाची सुरुवात
४. अनियोजित विनियोग
५. वास्तविक लक्ष्यापेक्षा वित्तीय लक्ष्य गाठण्यावर म्हणजे अंदाजित रक्कम खर्च करण्यावरच तेवढा भर

**ब. कार्यपद्धतीत बदल–**

६. प्रकल्पाच्या सर्वांगीण अन्वेषणाचा अभाव; उपलब्धतेचा विचार करून कामाच्या पद्धतशीर आखणीचा अभाव
७. निविदेत बदल
८. कामावर अपुर्ण देखरेख

**क. कार्यपद्धतीत विलंब–**

९. तांत्रिक संमतीस विलंब
१०. निविदे पक्की ठरविण्यात विलंब; मुळातच सदोष निविदे स्वीकारून नंतर घोळ घालीत बसणे
११. मंजुरी देण्यास व रक्कम सुपूर्त करण्यास विलंब
१२. जमीन व यंत्रसामग्री मिळविण्यास विलंब
१३. विविध संबंधित खात्यातून सुसूत्रता नसणे

हे बदल व विलंब टाळण्यासाठी सार्वजनिक बांधकामखात्याच्या संहितेत सुधारणा करणे जरुरीचे आहे. पैशाचा सुयोग्य वापर करण्याची केंद्र आणि राज्ये दोघांचीही जबाबदारी आहे.

राज्यांनी व केंद्राने एकतर्फी निर्णय घेण्याचे टाळले पाहिजे. शेतसारा काढून टाकणे, कर्जमुक्ती जाहीर करणे, सिंचन-कर न लादणे, परिवहन व वीजपुरवठा यांच्या दरातून निदान नुकसान होणार नाही असे दर न ठरविणे, करवसुलीची बाकी वाढत ठेवणे, ते वेळेवर व योग्य तऱ्हेने वसूल न करणे, काटकसर न करणे, आणि पैशाचा सुयोग्य उपयोग न करणे असे अनेक आर्थिक गैरशिस्तीचे प्रकार आढळतात. तुटीचा अर्थभरणा करण्याचा मार्ग केंद्र-मुखीच राहिला पाहिजे. वित्तीय हस्तांतरण जमा धरून राज्यांनी आपले अर्थसंकल्प संतुलित राखले पाहिजेत.

भारताच्या आर्थिक विकासाच्या उद्योगात केंद्र व राज्ये भागीदार आहेत. ही भागीदारीची जबाबदारी दोघांनीही ध्यानात बाळगावयास हवी. तरच सांविधानिक वित्तीय हस्तांतरणाची तरतूद योग्य प्रकारे अंमलात येईल. केंद्र-राज्य वित्तीय संबंधात जे घर्षण दिसते ते सदोष अंमलबजावणीमुळे येते. त्यासाठी प्रशासनीय तर खरेच पण राजकीय देखील तारतम्य, विवेक व तोल सांभाळावयास हवा.

**तक्ता क्र. ४**

**केंद्र सरकारचा राजकोषीय वार्षिक सरासरी व्यवहार (कोटी रुपयांत)**

| | | १९७४–७९ या काळातील | १९७९–८२ या काळातील |
|---|---|---|---|
| १ | केवळ केंद्राचे कर व महसूल | ५२०७.२ | ८७०९.६ |
| २ | विभजनीय करापासूनचा विभागून उरलेला महसूल (निव्वळ) | ३६७६.२ | ४१४३.८१[1] |
| ३ | एकूण | ८८८३.४ | १२८५३.४ |
| | **वजा** | | |
| ४ | संरक्षण व इतर बिगरविकास महसुली खर्च | ५२९९.३ | ८३२८.९ |
| ५ | विकासार्थ उपलब्ध महसूल | ३५८४.१ | ४५२४.५ |
| ६ | विकासार्थ अनुदान | १०३६.५ | २१४१.७ |
| ७ | विकासार्थ महसुली खर्च | २०१०.६ | ३५१३.८ |
| ८ | महसूल खात्यावरील जमा/तूट | (+) ५३७.० | (–) ११३१.० |
| ९ | भांडवल खात्यावरील वसूल | ४४८९.१ | ७३३०.६ |
| १० | संरक्षण व इतर बिगरविकास भांडवली विनियोग | ३५९.७ | ५२६.९ |
| ११ | इतर भांडवली विनियोग | २५७९.० | २९२६.५ |
| १२ | विकासार्थ विनियोग | १७२२.४ | २९१७.४ |
| १३ | राज्य सरकारांना कर्जे (निव्वळ) | १०९३.५ | १८११.२ |
| १४ | एकूण भांडवली विनियोग | ५७५४.६ | ८१८२.० |
| १५ | भांडवल खात्यावरील तूट | (–) १२६५.५ | (–) ८५१.४ |
| १६ | महसुली व भांडवल खात्यावरील एकूण तूट | (–) ७२८.५ | (–) १९८२.४ |

१. यात सरासरी ३१२.८ कोटी रुपये (एकूण ९३८.३ कोटी रुपये) कर्जाचे निर्लेखीकरण केले गेले आहे.

आधार : रिझर्व बँक बुलेटिन्सचा.

## तक्ता क्र. ५

### केंद्रा राज्यांना अनुदाने व कर्जे यांचे प्रमाण

| | वार्षिक सरासरी (कोटी रुपये) सहावा | सातवा |
|---|---|---|
| | वित्त आयोग काळ | |
| १ विकासार्थ उपलब्ध महसूल | ३५८४.१ | ४५२४.५ |
| २ राज्यांना अनुदान | १०३६.५ | २१४१.७ |
| ३ टक्के | २९.२ | ४७.३ |
| ४ विकासार्थ उपलब्ध भांडवली वसूल | १५५०.४ | ३८७७.२ |
| ५ राज्यांना कर्जे (निव्वळ) | १०९३.५ | १८११.२ |
| ६ टक्के | ७०.५ | ४६.६ |
| ७ (३ + ६) मिळून टक्के | ४१.० | ४७.० |

## तक्ता क्र. ६

### विभाजनीय करांचा महसूल व राज्यांचा स्थूल[1] वाटा.

| | १९७४–७९ | | | १९७९–८२ (अंदाज) | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | महसूल (कोटी रुपये) | वाटा | टक्के | महसूल (कोटी रुपये) | वाटा | टक्के |
| २ प्राप्तिकर | १०९५.५ | ६५६.१ | ६०.० | १४०४.७ | ९६५.४ | ६८.७ |
| २ संपदा शुल्क | १२.० | ९.६ | ८०.० | १४.५ | १२.० | ८२.८ |
| ३ उत्पादन शुल्क | ४२२२.३ | ९८७.९ | २३.३ | ६४९७.१ | २७९७.३ | ४३.१ |
| ४ हॉटेल-कर | — | — | — | ३.७ | १.५ | ४०.६ |
| ५ एकूण | ५३२९.८ | १६५३.६ | ३१.० | ७९२०.० | ३७७६.२ | ४७.७ |

१ वसुलीचा खर्च न वगळता

## तक्ता क्र. ७

### केंद्र-राज्य एकूण हस्तांतरण

| | | पहिल्या पंचवार्षिक योजनेचा काळ (कोटी रुपये) | टक्के | १९८१–८२ (अंदाज) (कोटी रुपये) | टक्के |
|---|---|---|---|---|---|
| I वित्त आयोग | | | | | |
| १ प्राप्तिकर | | २७८ | १९.४ | १०२९ | १०.० |
| २ उत्पादन शुल्क | मूळ | ६४ | ४.५ | २६३५ | २५.८ |
| | जादा | — | — | १३ | ०.२ |
| ३ संपदा शुल्क | | २ | ०.१ | ४ | — |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ४ | इतर | — | — | — | — |
| ५ | एकूण | ३४४ | २४.० | ४१३१ | ४०.४ |
| ६ | अनुदाने | | | | |
| | कलम २७५ | २७ | १.९ | २३६ | २.३ |
| | इतर | ७६ | ५.३ | ९० | ०.९ |
| | एकूण अनुदाने | १०३ | ७.२ | ३२६ | ३.२ |
| | एकूण वित्त आयोग | ४४७ | ३१.२ | ४४५७ | ४३.६ |
| II | योजना आयोग | | | | |
| | अनुदाने | | | २१२० | २०.७ |
| | कर्जे | | | १९९९ | १९.६ |
| | एकूण योजना आयोग | ८८० | ६१.५ | ४११९ | ४० ३ |
| III | इतर | | | | |
| | अनुदाने | | | ३२२ | ३.२ |
| | कर्जे | | | १३२० | १२.९ |
| | एकूण इतर | १०४ | ७.३ | १६४२ | १६.१ |
| | एकूण हस्तांतरण | १४३१ | १००.० | १०२१८ | १००.० |

## तक्ता क्र. ८

### केंद्राच्या अखत्यारीतील महसूल व त्यातील वाढ

| | | (कोटी रुपये) १९७४–७९ वार्षिक सरासरी | १९७९–८२ | | केवळ वाढ | टक्केवारी (ओळ १३ मधील आकड्यांशी प्रमाण) स्थंभ २ | स्तंभ ३ | स्तंभ ४ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | १ | २ | ३ | | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | निगम कर | १००२.५ | १५४४.० | (+) | ५४१.५ | ९.५ | ९.३ | ८.९ |
| २ | जकात | १७१०.७ | ३३६९.० | (+) | १६५८.३ | १६.२ | २०.२ | २७.२ |
| ३ | व्याज वसूल | ११३६.४ | १८०८.९ | (+) | ६७२.५ | १०.८ | १०.९ | ११.० |
| ४ | लाभांश | २३६.४ | ३०५.० | (+) | ६८.५ | २.३ | १.८ | १.१ |
| ५ | परदेशी अनुदाने | १३१.६ | ३३८.८ | (+) | २०७.२ | १.२ | २.० | ३.४ |
| ६ | इतर कर व करा-व्यतिरिक्त इतर उत्पन्न | ९८९.५ | १३४३.९ | (+) | ३५४.४ | ९.४ | ८.१ | ५.८ |
| ७ | एकूण | ५२०७.२ | ८७०९.६ | (+) | ३५०२.४ | ४९.४ | ५२.३ | ५७.४ |

विभाजनीय स्थूल कर उत्पन्न

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ८ | प्राप्ति-कर | १०९५.५ | १४०४.७ | (+) | ३०९.२ | १०.४ | ८.५ | ५.१ |
| ९ | संपदा शुल्क | १२.० | १४.५ | (+) | २.५ | ०.१ | ०.१ | ०.१ |
| १० | केंद्र उत्पादनशुल्क | ४२२२.३ | ६४९७.१ | (+) | २२७४.८ | ४०.१ | ३९.१ | ३७.३ |
| ११ | हॉटेल-कर | — | ३.७ | (+) | ३.७ | — | — | ०.१ |
| १२ | एकूण (८+११) | ५३२९.८ | ७९२०.० | (+) | २५९०.२ | ५०.६ | ४७.७ | ४२.६ |
| १३ | (एकूण ७+१२) | १०५३७.० | १६६२९.६ | (+) | ६०९२.६ | १००.० | १००.० | १००.० |

## तक्ता क्र. ९

### महसुली-तुटीसाठी वित्त आयोगाने शिफारस केलेले अनुदान

(कोटी रुपये)

| | | पाचवा १९६९ | सहावा १९७३ | सातवा १९७८ |
|---|---|---|---|---|
| | राज्ये | | | |
| १ | आंध्र प्रदेश | ६५.११ | २०५.९३ | — |
| २ | आसाम | १०१.९७ | २५४.५३ | — |
| ३ | जम्मू आणि काश्मीर | ७३.६८ | १७३.४९ | १९९.५६ |
| ४ | केरळ | ४९.६५ | २०८.९३ | — |
| ५ | म्हैसूर/कर्नाटक | १७·९९ | — | — |
| ६ | नागालँड | ७७.९५ | १२८.८४ | २१८.३५ |
| ७ | ओरिसा | १०४.६७ | ३०४.७३ | १३६.९२ |
| ८ | राजस्थान | ५१.४९ | २३०.५३ | — |
| ९ | तामीळनाडू | २२.८२ | — | — |
| १० | पश्चिम बंगाल | ७२.६२ | २३४.८६ | — |
| ११ | बिहार | — | १०६.२८ | — |
| १२ | मणिपूर | — | ११४.५३ | १४६.३२ |
| १३ | मेघालय | — | ७४.६७ | ९२.६१ |
| १४ | त्रिपुरा | — | ११२.५० | १३६.५७ |
| १५ | उत्तर प्रदेश | — | १९८.८३ | — |
| १६ | हिमाचल प्रदेश | — | १६०.९६ | २०७.०७ |
| १७ | सिक्कीम | — | — | ३५.७२ |
| | एकूण | ६३७.८५ | २५०९.६१ | ११७३.१२ |

नैसर्गिक आपत्ती–निवारणार्थ राज्यांना प्रतिवर्षी अनुदान

| | | | |
|---|---|---|---|
| ( कोटी रुपये ) | — | ५०.७१ | १००.५५ |

### तक्ता १०

**राज्यांचा विनियोग, वसूल व वसुलाचे विनियोगाशी प्रमाण**

| | | १९७४–७९ वार्षिक सरासरी (कोटी रुपये) | एकूण (अ) शी प्रमाण (टक्के) | १९७९–८२ वार्षिक सरासरी (कोटी रुपये) | एकूण (अ) शी प्रमाण (टक्के) |
|---|---|---|---|---|---|
| १ | विकासार्थ राज्यांचा विनियोग | ७२८६.१ | | १५२८५.९ | |
| २ | भांडवल खात्यावरील विनियोग | १२५.४ | | — | |
| | एकूण (अ) | ७४११.५ | १००.० | १५२८५.९ | १००.० |
| | राज्याचा स्वतःचा महसूल | ३२५९.५ | ४३.९ | ५०९९.३ | ३३.४ |
| | विभाजनीय करांचा वाटा | १६५३.२ | २२.३ | ३६९६.६ | २४.२ |
| | केंद्राकडून अनुदान | १६११.२ | २१.७ | २४१४.८ | १५.८ |
| | केंद्राकडून कर्ज | १०६२.३ | १४.३ | २०२५.७ | १३.२ |
| | भांडवल खात्यावरील जमा | — | — | १७१२.३ | ११.२ |
| | एकूण (ब) | ७५८६.२ | १०२.२ | १४९४८.७ | ९७.८ |
| | एकूण (ब) आणि एकूण (अ) यातील फरक | (+) १७४.७ | (+)२.२ | (–) ३३७.२ | (–) २.२ |

## संदर्भ टीपा

१. ही रक्कम ३१ मार्च १९८२ अखेर १७४३.४६ कोटी होती. या अधिकर्षित रकमेचे मुदतीच्या कर्जात केंद्र सरकारने रूपांतर केले आहे. अलिकडच्या काळात हे दुसऱ्यांदा रूपांतर होय. राज्य सरकारांना ही चटकच लागलेली दिसते.

२. Report of the Finance Commission, Government of India, 1973, P. 5. व 1978, P. 58, ( यापुढे यांचा उल्लेख अनुक्रमे सहावा अहवाल आणि सातवा अहवाल असा केला आहे. )

३. पाहा राजमन्नार अहवाल, पृ. १९, पश्चिम बंगाल सरकारचे ज्ञापन पृ. २.

४. सहावा अहवाल, पृ. ९.

५. संविधान राबविताना जे दोष नजरेस आले ते घालविण्यास एकंदरीने संविधान बदलण्याची जरुरी नाही. योग्य तो कायदा करून किंवा प्रशासकीय कारभार सुधारून किंवा योग्य तो पायंडा घालून देऊन हे दोष घालविता येतात. असे संविधानतज्ज्ञ श्री. एच. एम. सिरवई यांनी प्रतिपादिले आहे.

६. पाहा राजमन्नार समितीचा अहवाल पृ. ६७–६८.

७. पाहा तक्ता क्र. ८.

८. पश्चिम बंगाल सरकारचे ज्ञापन पृ. ४.

९. सातवा अहवाल पृ. ६६.

१०. इकॉनॉमिक जर्नल, लंडन, डिसेंबर १९८१, पृ. १०५८.

११. सहाव्या वित्त आयोगाने दिलेल्या सगळ्या वस्तूंवरील उत्पादनशुल्काच्या निव्वळ उत्पन्नाच्या २० टक्क्यांवरून सातव्या वित्तआयोगानेही रक्कम निव्वळ उत्पन्नाच्या ४० टक्क्यांवर आणून ठेवली.

१२. सातवा अहवाल, पृ. ५५.

■ ■

# भारताच्या परकीय चलन-संचयाचे प्रश्न

यशवंत रारावीकर
शा. धों. कुळकर्णी

## पूर्वपीठिका

मध्यंतरीच्या तीन-चार वर्षांच्या सुधारलेल्या परिस्थितीनंतर भारताच्या परकीय चलनसंचयाची परिस्थिती गेल्या दोन-तीन वर्षांपासून पुन्हा पूर्वीसारखीच चिंताजनक होऊ लागली आहे. या संचयाच्या गळतीला आणि घसर-गुंडीला सुरुवात झाली असून गेल्या सतरा महिन्यांत आपला परकीय चलनाचा साठा (सोने आणि एस. डी. आर.-वगळता) ११६६ कोटी रुपयांनी घसरला आहे – १ एप्रिल १९८१ रोजी जो साठा ४८०० कोटी रुपयांचा होता, तो ३१ ऑगस्ट १९८२ रोजी ३६३४ कोटी रुपयांवर घसरला. आंतरराष्ट्रीय नाणेनिधीकडून घेतलेली १५७५ कोटी रुपयांची उचल (५ बिलीयन एस्. डी. आर. च्या खास सवलती अन्वये) विचारात' घेतली तर ही घसरण २७४१ कोटी रुपयांची झाली असे म्हणावे लागेल. ही घसरगुंडी अशीच चालू राहिली आणि परिस्थिती वेळीच सावरली गेली नाही तर परकीय चलन-संचयाची समस्या भारताच्या आर्थिक विकासाच्या मार्गातील प्रचंड धोंड ठरल्याशिवाय राहणार नाही.

प्रस्तुत निबंधात या समस्येचे विश्लेषण करून तीवर मात करण्यासाठी काय उपाययोजना करता येईल याचा विचार मांडला आहे. निबंधाच्या पूर्वार्धात भारताच्या परकीय चलनसंचयाचा पूर्वेतिहास, या संचयाची वेळोवेळी बदलत गेलेली प्रवृत्ती ( trends ) यांची मीमांसा केली असून उत्तरार्धात ही समस्या सोडविण्यासाठी कोणकोणत्या मार्गांचा अवलंब केला पाहिजे याचा विचार मांडला आहे.

## ( १ ) पूर्वार्ध

### परकीय चलन संचयाचा पूर्वेतिहास आणि प्रवृत्ती

१९४७ साली भारताला स्वातंत्र्य मिळाले त्यावेळी आपली परकीय गंगाजळीची परिस्थिती अत्यंत समाधान-कारक होती. इंग्लंडमध्ये भारत सरकारच्या खात्यात १७३३ कोटी रुपयांची पौंडी गंगाजळी जमा होती. दुसऱ्या महायुद्धाच्या काळात भारताचा व्यवहारतोल अनुकूल होता. त्या युद्धकाळात ब्रिटिश सरकारने भारतात वेळोवेळी केलेल्या खरेदीचे पैसे पौंडात लंडनमधील भारत सरकारच्या खात्यात जमा केल्यामुळे ही पौंडी गंगाजळी उभारली गेली. या गंगाजळीच्या जोरावरच आपल्याला स्वातंत्र्योत्तर काळातील प्रतिकूल व्यवहारतोलाला तोंड देता आले आणि पहिल्या पंचवार्षिक योजनेच्या आयातीचा खर्च भागवता आला. पहिल्या योजनेच्या अखेरीस आणि दुसऱ्या योजनेच्या सुरुवातीच्या वर्षातच हा साठा संपुष्टात आला. परकीय चलन-संचयात ८८० कोटी रुपयांवरून (१९५१–५२) ८२४ कोटी रुपयांपर्यंत (१९५५–५६) घट झाली. परंतु पहिल्या योजनेच्या काळात परकीय चलनाची गंभीर अशी समस्या निर्माण झाली नाही.

अत्यंत महत्त्वाकांक्षी म्हणून गवगवा झालेल्या आणि औद्योगीकरणावर प्रचंड भर देणाऱ्या दुसऱ्या पंचवार्षिक योजनेपासून मात्र परकीय चलनाच्या समस्येने गंभीर स्वरूप धारण केले. यंत्रसामग्री, औद्योगिक कच्चा माल इत्यादी औद्योगीकरणासाठी आवश्यक असलेल्या वस्तूंची आयात मोठ्या प्रमाणावर वाढली. तशात अवर्षण आणि अतिवृष्टी यामुळे अन्नधान्य समस्याही निर्माण झाली व अन्नधान्याची आयातही वाढली. देशाच्या निर्यातीत मात्र म्हणावी तशी वाढ झाली नाही. त्यामुळे भारताचा व्यवहारतोल प्रतिकूल झाला आणि त्यातून परकीय चलनाची समस्या निर्माण झाली. तिसऱ्या योजनेच्या काळात, त्यानंतरच्या १९६६ ते १९६९ या तीन वार्षिक योजनांच्या काळात आणि चवथ्या योजनेच्या जवळजवळ संपूर्ण काळात भारताचा व्यवहारतोल कमीअधिक प्रमाणात परंतु सतत प्रतिकूलच राहिला. यंत्रे आणि यंत्रसामग्री या सारखी विकासोपयोगी आयात, कच्चा माल व अर्ध कच्चा माल यासारखी विकास-साहाय्यक आणि विकास टिकवून ठेवणारी आयात, भारताच्या पाचवीला पुजलेल्या अन्नधान्य समस्येला तोंड देण्यासाठी अन्नधान्याची आयात, १९६५ च्या चिनी व पाकिस्तानी आक्रमणामुळे संरक्षण सिद्ध राहण्याचा जो धडा आपल्याला मिळाला त्यामुळे त्यासाठी युद्धसाहित्य व शस्त्रसामग्री यांची आयात आणि इतर आवश्यक वस्तूंची आयात यामुळे भारताची आयात, काही अपवादात्मक वर्षे सोडली तर, सतत वाढतच गेली; निर्यातीत लगोलग फारशी वाढ न झाल्यामुळे व्यवहारतोलाची परिस्थिती बिघडत गेली आणि विदेशी चलन-संचयाबाबत अडचणीची परिस्थिती निर्माण झाली. अशा रीतीने १९५० आणि १९६० च्या दशकांमध्ये परकीय चलन-संचयाची समस्या आपल्यासमोर ठाण मांडून बसली होती. तिच्या तीव्रतेत दरवर्षी चढउतार होत असत. कधी परकीय चलनाची तीव्र टंचाई तर कधी कमी टंचाई पण टंचाईची समस्या कायमच होती. परकीय चलन-संचयाची ही परिस्थिती पुढील तक्ता क्र. १ वरून स्पष्ट होईल.

**तक्ता क्र. १**

**भारताच्या परकीय चलन-संचयातील बदल** (सोने व एस. डी. आर. वगळून)

| | योजना व कालावधी | परकीय चलन-संचय (कोटी रु.) |
|---|---|---|
| १ | पहिली योजना १९५१–५६ | ८२४.० |
| २ | दुसरी योजना १९५६–६१ | ३०३.६ |
| ३ | तिसरी योजना १९६१–६६ | २९८.० |
| ४ | तीन वार्षिक योजना १९६६–६९ | ५३१.२ |
| ५ | चवथी योजना १९६९–७४ | ६१८.७ |

## परकीय चलन-संचयाचा पूर

स्वातंत्र्योत्तर काळातील वीस-पंचवीस वर्षे अत्यंत बिकट परिस्थितीतून वाटचाल करणाऱ्या आपल्या परकीय चलन-संचयाच्या परिस्थितीत चवथ्या योजनेच्या मध्यापासून सुधारणा व्हायला सुरुवात झाली आणि पाचव्या योजनेत तर कलाटणी मिळून या संचयाला जणू पूरच आला असे म्हटले तर ते अतिशयोक्तीचे होणार नाही. १९७०–७१ मध्ये ४३८ कोटी रुपये किंमतीचा असलेला हा साठा चवथ्या योजनेच्या अखेरच्या वर्षात म्हणजे १९७३–७४ मध्ये ५८१ कोटी रुपये झाला. पाचव्या योजनेच्या दुसऱ्या वर्षात म्हणजे १९७५–७६ मध्ये त्याने १४२९ कोटी रुपयांपर्यंत मजल मारली. इथून त्याची चढती कमान जी सुरू झाली ती थेट १९७८–७९ पर्यंत. त्या वर्षी तर आपल्या परकीय चलन-संचयात ५२२० कोटी रुपये किंमतीची रास साठली. तक्ता क्र. २ वरून ही बदलेली परिस्थिती स्पष्टपणे दिसून येते.

तक्ता क्र. २

**भारताच्या परकीय चलन संचयातील वृद्धी** (सोने व एस. डी. आर. सोडून)

| वर्ष (मार्च अखेर) | परकीय चलन संचय (कोटी रुपयांत) | शेकडा वाढ |
|---|---|---|
| १९७०–७१ | ४३८.० | — |
| १९७१–७२ | ४८०.० | ९.५० |
| १९७२–७३ | ४७९.० | –०.२१ |
| १९७३–७४ | ५८०.८ | २१.३० |
| १९७४–७५ | ६१०.५ | ५.१० |
| १९७५–७६ | १४९१.७ | १४४.३० |
| १९७६–७७ | २८६३.० | ९१.९० |
| १९७७–७८ | ४४९९.६ | ५७.१० |
| १९७८–७९ | ५२१९.९ | १६.० |

विदेशी चलनसंचयातील वृद्धीची तीन कारणे सांगता येतील. सगळ्यात महत्वाचे कारण म्हणजे विदेशातील विशेषत: अरब किंवा आखाती देशातील–भारतीयांनी पाठविलेले विदेशी चलन हे होय. १९७३ ऑक्टोबरपासून तेलाच्या किमती वाढू लागल्या. अरब देशांची कमाई भरपूर वाढली. त्यामुळे त्या देशात गुंतवणूक आणि बांधकामांना जोर आला. या बांधकामावर असंख्य भारतीयांना रोजगार मिळाला. त्यांनी आपली कमाई भारतात पाठवायला सुरुवात केली. त्यामुळे आपल्या विदेशी चलनसाठ्यात भरघोस वाढ झाली. याशिवाय आपल्या निर्यातीतील वाढ आणि अन्नधान्य परिस्थितीत सुधारणा झाल्याने अन्नधान्याच्या आयातीत झालेली कपात यामुळे देखील आपल्या विदेशी चलन साठ्यात वाढ झाली ही खरोखर आनंदाची गोष्ट झाली.

## परकीय चलनसंचयाला ओहोटी

परकीय चलन आघाडीवरील लढाई आपण जिंकली अशी एक प्रकारे आत्मसंतुष्टतेची भावना आपल्या मनात निर्माण झाली. परंतु ती फार अल्पजीवी ठरली. कारण १९७९ पासून परिस्थिती बिघडायला सुरुवात झाली. आपल्या विदेशी चलनसंचयाला ओहोटी लागली. ती आजतागायत चालू आहे. ती अशीच चालू राहिली तर लवकरच ही गंगाजळी पूर्ण आटून सहाव्या योजनेतील अनेक विकास-प्रकल्प थप्प होतील यात शंका नाही. १९७८–७९ च्या ५२२० कोटी रुपये या उच्चांकावरुन १९७९–८० हा साठा ५१६४ कोटींवर घसरला. १९८०–८१ आणि १९८१–८२ या आर्थिक वर्षांमध्ये हा साठा दरमहा खालावत जाऊन आज आपल्याजवळचा साठा जेमतेम तीन महिन्यांचे आयात बिल भागवू शकेल इतका कमी झाला आहे. परकीय चलन आघाडीवरची ही बिघडत चाललेली परिस्थिती तक्ता क्र. ३ मध्ये दाखविली आहे.

चलनसंचयातील ही घट आपल्या तुटीच्या परराष्ट्र व्यापाराची निदर्शक आहे. गेल्या तीन वर्षांत ही तूट वाढतच आहे. आयातीत भरमसाठ वाढ आणि निर्यात वाढीची तुलनेने मंद गती यामुळे या दोहोंतील तफावत वाढत असून परकीय चलन संचयाला गळती लागली आहे. तक्ता क्र. ४ मध्ये आपल्या आयात-निर्यातीचा जो आढावा घेतला आहे त्यावरून आपल्या विदेशी व्यापारातील वाढती तूट लक्षात येईल.

तक्ता क्र. ३

भारताचा खालावत चाललेला परकीय चलन संचन

| वर्ष/महिना | परकीय चलन (कोटी रुपये) | शेकडा वाढ (+) किंवा घट (–) |
|---|---|---|
| १९७८–७९ | ५२१९.९० | + १६.०० |
| १९७९–८० | ५१६३.७० | – १.०७ |
| १९८०–८१ | ४८२२.१२ | – ७.०९ |
| ऑगस्ट १९८० ते ऑगस्ट १९८१ | ३७६३.०० | – ३९.४१ |
| २० नोव्हेंबर १९८१ | ३४४२.४६ | – ९.३० |
| १९८१–८२ (अंदाज) | ३३००.०० | – ०.०४ |

तक्ता क्र. ४

भारताची आयात-निर्यात (कोटी रु.)

| वर्ष | आयात | निर्यात | समतोल आधिक्य (+) अथवा तूट (–) |
|---|---|---|---|
| १९७८–७९ | ६८१४ | ५७२६ | – १०८८ |
| १९७९–८० | ८९०८ | ६४५९ | – २४४९ |
| १९८०–८१ | १२३३० | ६७०४ | – ५६२६ |
| १९८१–८२ (अंदाज) | १४४४० | ८४४० | – ६००० |

आपले आयात बिल वाढवणारा सगळ्यात महत्त्वाचा घटक म्हणजे पेट्रोल, क्रूड ऑईल, पेट्रोलियम पदार्थ होय. शिवाय खते, सिमेंट, खाद्य तेल इत्यादी पदार्थांच्या युनिटमूल्यातील होणारी वाढ ही हे बिल फुगवायला मोठ्या प्रमाणावर हातभार लावत आहे. दुर्दैवाने या वाढत्या आयातीच्या जोडीला आपली निर्यात वाढ मोठ्या प्रमाणावर होत नाही. याला जसे आपले निर्यात वाढीचे अपुरे प्रयत्न आणि देशातील भाववाढ जबाबदार आहेत तद्वतच बड्या देशांतील मंदीचे वातावरण, त्या देशांनी उभारलेल्या संरक्षक भिंती हे घटकही जबाबदार आहेत परिणामी जागतिक निर्यातीतील भारताचा वाटा जो १९७९ त ०.५२ टक्के होता तो १९८० त ०.४४ टक्क्यांवर घसरला आहे.

## भावी शक्यता

परकीय चलन-संचयाच्या या परिस्थितीत नजिकच्या भविष्यकाळात काही सुधारणा होईल अशी शक्यता कमीच दिसते. सरकारने योग्य वेळीच आवश्यक त्या उपायांचा अवलंब केल्याशिवाय या परिस्थितीत सुधारणा घडून

येणार नाही. विदेशी भारतीयांकडून विशेषतः आखाती देशातील भारतीयांकडून येणारा विदेशी चलनाचा ओघ आता ओसरत चालला आहे. आंतरराष्ट्रीय तेलाच्या किमती उतरंडीवर असल्या तरी देशाची तेलाची गरज भागविण्यासाठी तेल आयात करणे अपरिहार्य आहे. अलीकडे शिथिल केलेल्या आयात धोरणामुळे देशाची एकूण आयात मोठ्या प्रमाणावर वाढल्याशिवाय राहणार नाही. शिवाय दुष्काळाच्या छायेमुळे अन्नधान्य आयात देखील अपरिहार्य आहे. काही काळापूर्वी सरकारने अमेरिकेकडून गहू आयातीचा घेतलेला निर्णय हा या दृष्टीने सूचक आहे. आंतरराष्ट्रीय परिस्थिती पाहता बड्या देशातील मंदीची परिस्थिती आणि नियंत्रण यामुळे आपली निर्यातवाढ उत्साहवर्धक होईल असे वाटत नाही त्यामुळे विदेशी चलनसंचयाला लागलेली गळती जाणीवपूर्वक प्रयत्न केल्याशिवाय थांबणे कठीण आहे. आहे तो साठा काटसरीने वापरून जतन करणे आणि त्यात दिवसेंदिवस भर टाकणे या दृष्टीनेच भावी धोरणांची आखणी करून योग्य ते धोरणात्मक उपाय सरकारने योजले पाहिजे.

## ( २ ) उत्तरार्ध

### दुहेरी उपाययोजना आवश्यक

### ( १ ) आयात कपातीची निकड

परकीय चलन-संचयाच्या समस्येला तोंड देण्यासाठी आयात आणि निर्यात या दोनही आघाड्यांवर प्रभावी उपाययोजना करणे आवश्यक आहे. आयात कमी करून निर्यातवाढीचे शर्तीचे प्रयत्न झाले पाहिजे. आयात कपातीच्या बाबतीत अग्रक्रम तेलाच्या आयात कपातीस दिला पाहिजे. वर म्हटल्याप्रमाणे तेलाची आयात आपल्या आयात बिलातील ४५ टक्के भाग व्यापून आहे. ही आयात कमी करण्यासाठी दोन उपाय योजले पाहिजेत. एक म्हणजे बॉम्बे हायमधून तेलाचे उत्पादन वाढविले पाहिजे. तसेच कावेरीचे खोरे आणि देशाच्या अन्य भागांतून तेल मिळू शकेल काय याबाबतची शक्यता पडताळून पाहिली पाहिजे आणि आयात तेलावरचे आपले अवलंबन कमी केले पाहिजे. प्रसाद कमिटीच्या अंदाजानुसार इ. स. २००० साली भारताची तेलाची गरज ६९ दशलक्ष टन इतकी असेल. सध्या देशातील तेलाचे उत्पादन १० . ९ दशलक्ष टनांवरून २००० साली ३० दशलक्ष टनांवर जाईल असे मानले तरी त्यासाठी मागणी-पुरवठ्यातील तफावत भरून काढण्यासाठी तेलाचा भाव एका बॅरलला १०० डॉलर गृहीत धरून २५००० कोटी रुपये तेल आयातीवर खर्च करावे लागतील. म्हणजे आजच्या आपल्या निर्यातीच्या चौपट हा खर्च असेल. या आकडेवारीवरून या समस्येचे गांभीर्य लक्षात यावे. दुसरा उपाय म्हणजे पर्यायी इंधनसाधनांचा विकास करणे. अशा इंधनसाधनांच्या शोधावर आपण लक्ष केंद्रित करून आयात तेलाचा वापर दिवसेंदिवस कमी कसा करता येईल याचा विचार करणे आवश्यक आहे.

याशिवाय, उत्पादनवाढीसाठी अगदी निकडीच्या अशा आयात वस्तू वगळता इतर वस्तूंची आयात आपण कटाक्षाने कमी केली पाहिजे. त्यासाठी आयात पर्यायी वस्तूंच्या उत्पादनाला प्रेरणा दिली पाहिजे. अर्थात असे उत्पादन वाढवायला वेळ लागेल हे मात्र खरे. त्यामुळेच काटकसर करून आयात वस्तूंचा वापर कमी करणे व आयात कपात करणे निकडीचे आहे.

### ( २ ) शेतमाल निर्यातीवर भर हवा

परदेशी चलन वाचविण्यासाठी जशी आयात कपातीची आवश्यकता आहे तशीच ते मिळविण्यासाठी निर्यात वाढीची निकड आहे. यात औद्योगिक मालाच्या निर्यातीइतकाच शेतमाल निर्यातीवर आपण भर दिला पाहिजे. भारताचा शेतमाल आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत अधिक पसंत केला जातो हे स्पष्ट झाले आहे. कारण गेल्या दशकात आपल्या शेतमालाची निर्यात ५ पटीने वाढली आहे. १९७०–७१ त ती सुमारे २३० कोटी रुपयांची होती ती १९८०–८१ त १०५० कोटी रुपये इतकी झाली. शेतमालाच्या निर्यातीत दोन प्रकारच्या शेतमालाची निर्यात आपण वाढवू शकतो. एक, औद्योगिक कच्चा माल म्हणून वापरला जाणारा शेतमाल, आणि दोन, खाद्य वस्तू म्हणून वापरला जाणारा शेतमाल.

औद्योगिक मालाच्या निर्यात वाढीसाठी आज सरकार विविध मार्गांनी साहाय्य करत आहे. उदाहरणार्थ, रोख मदत देणे, भरलेली उत्पादक जकात परत करणे, कच्चा माल मिळविण्यास साहाय्य करणे, इत्यादी. अशाच किंबहुना याहीपेक्षा अधिक आकर्षक सवलती आणि साहाय्य शेतमाल निर्यात वाढीसाठी देणे जरूर आहे.

शेतमाल निर्यातवाढीबाबत आणखी एक मुद्दा लक्षात घ्यायला हवा. भारताच्या एकूण सर्वच निर्यातीचा पाया व्यापक बनला पाहिजे. औद्योगिक माल निर्यातीबाबत, आपण बिगर-पारंपरिक निर्यातीचे प्रमाण आणि वस्तू वाढवून हे पुष्कळसे साध्य करतो आहोत. पण तसे शेतमाल निर्यातीबाबत म्हणता येयचे नाही. शेतमाल निर्यातीबाबत आजही आपली 'चहा, कॉफी, काजू, ताग निर्यात करणारा देश' अशीच संकुचित प्रतिमा आहे. ती बदलायला हवी. त्यासाठी या मालाबरोबरच केळी, लोणी, फळफळावळे, फुले, फळांचे रस, फुलांपासून बनविलेली अत्तरे, मासे, मांस इत्यादी अनेकविध वस्तूंची निर्यात आपण वाढविली पाहिजे. या दृष्टीने परदेशातील भारताच्या व्यापार वकिलाती व प्रतिनिधींनी अधिक कार्यप्रवण झाले पाहिजे.

शेतमाल निर्यातीपैकी खाद्य वस्तूंच्या निर्यातीसाठी आपल्याला मध्यपूर्वेतील तेल निर्यातदार राष्ट्रांची बाजारपेठ काबीज करता येईल. त्या राष्ट्रांमध्ये खाद्य वस्तूंचे उत्पादन अत्यल्प असून आज त्यांना या वस्तूंचा पुरवठा अमेरिका आणि ऑस्ट्रेलिया यांसारख्या दूरच्या देशांकडून होत आहे. आपण या वस्तू या आखाती राष्ट्रांना पुरवू शकलो तर त्या त्यांचे स्वागतच करतील. यामुळे अशा खाद्य शेतमालाचे देशातील उत्पादन वाढविण्यासाठी उत्पादकांना अनेक सोयी व सुविधा उपलब्ध करून दिल्या पाहिजे.

शेतमाल निर्यात आणि औद्योगिक माल निर्यात वाढीबरोबरच व्यवहारतोलातील अदृश्य बाबी ( invisible items) वाढवून देखील आपल्याला परकीय चलन भरपूर मिळविता येईल. या दृष्टीने पर्यटन विकास, परदेशातील भारतीय बँका व विमा कंपन्या, जहाज कंपन्या यांच्या सेवांचा विकास केला तर परकीय चलन मोठ्या प्रमाणावर मिळविता येईल.

सर्व प्रकारची निर्यातवाढ करावयाची तर त्यासाठी देशातील उत्पादन वाढविले पाहिजे. त्यासाठी उत्पादकांना सर्व सोयी, सुविधा उपलब्ध करून दिल्या पाहिजे. सिंगापूरचे उदाहरण या बाबतीत आपण गिरवण्यासारखे आहे. सिंगापूरमध्ये 'इकॉनॉमिक डेव्हलपमेंट बोर्ड' असून, त्यामार्फत उत्पादकांना पायाभूत सेवा, विक्री, कायदेशीर बाबी, कर सवलती, कर्ज या सर्वांबाबत मार्गदर्शन केले जाते. भारतातही अशा सोयी एकाच ठिकाणी एकत्ररीत्या उपलब्ध करून देण्याच्या सोयी निर्माण व्हायला हव्यात.

निर्यातीबाबतीत आपण तैवान, कोरिया यांचीही उदाहरणे समोर ठेवली पाहिजेत आणि त्यांच्या निर्यातवाढीच्या प्रयत्नांचा अभ्यास करून त्यापासून धडे घेतले पाहिजेत. या देशांनी प्रतिवर्षी २५०० कोटी अमेरिकन डॉलर्स किमतीची निर्यात करण्याइतकी प्रगती केली आहे. त्यांनी वापरलेले अद्ययावत तंत्रज्ञान आपल्याला वापरणे शक्य नसले तरी सुयोग्य असे आधुनिक तंत्रज्ञान वापरून आपल्याला आपली निर्यातवाढ घडवून आणता येईल.

## नव्या सरकारी धोरणाची गरज.

परकीय चलनाची समस्या सोडविण्यासाठी सरकारने आपले परराष्ट्र व्यापाराबाबतचे धोरण पुन्हा नव्याने आखणे आवश्यक आहे. या संबंधात 'इकॉनॉमिक टाईम्स' चे संपादक डॉ. हॅनन इझिकेल यांनी एका चर्चासत्रात केलेली सूचना अत्यंत महत्त्वाची आहे; ती सरकारने लक्षात घेतली पाहिजे. डॉ. इझिकेल सांगतात की परराष्ट्र व्यापाराबाबतचे धोरण हे देशाच्या एकूण आर्थिक धोरणाचेच एक प्रमुख अंग असले पाहिजे. त्याचा वेगळा बांडगुळासारखा विचार करता कामा नये. ही सूचना लक्षात घेऊन सरकारने आपल्या विदेशी व्यापाराबाबतच्या धोरणात आमूलाग्र बदल केला पाहिजे.

## उपसंहार

सारांश, भारताच्या परकीय चलन-संचयाच्या समस्येने पुन्हा डोके वर काढले आहे. या संचयाला लागलेली

घसरण वर सांगितलेल्या दुहेरी उपाययोजनेने थांबविली नाही आणि या संचयाची वृद्धी केली नाही तर आवश्यक अशी आयातही आपल्याला करता येणार नाही. परिणामी आपल्या आर्थिक विकासाला खीळ पडल्याशिवाय राहणार नाही. विदेशी मदतीचे घटते प्रमाण लक्षात घेतले तर हा संचय वाढविण्यासाठी स्वप्रयत्नांवर भर देण्याचे महत्त्व अधिक लक्षात येईल. आंतरराष्ट्रीय नाणेनिधीचे कर्ज हे शेवटी कर्जच आहे, ती काही कमाई नव्हे ! तेव्हा त्यावर भिस्त ठेवून निसूर राहणे केव्हाही शहाणपणाचे ठरणार नाही. विदेशी व्यापाराबाबतचे व्यापक आणि वास्तव धोरण आणि निर्यातवाढीसाठी निकराचे प्रयत्न हेच या समस्येतून आपली सुटका करू शकतील.

■ ■

---

## मराठी अर्थशास्त्र परिषद

# सातवे वार्षिक अधिवेशन

परिषदेचे सातवे वार्षिक अधिवेशन १९८३ च्या ऑक्टोबर/नोव्हेंबरमध्ये होईल. **डॉ. स. ह. देशपांडे** प्राध्यापक, मुम्बई विद्यापीठ हे अध्यक्षस्थान भूषवितील. अधिवेशनातील चर्चासत्रांसाठी खालील विषय निवडण्यात आले आहेत.

१) कार्ल मार्क्स यांचे अर्थशास्त्र

२) भारतातील औद्योगिक संरचना

३) सहकाराचे तत्त्वज्ञान आणि महाराष्ट्रातील सहकारी चळवळ

चौथा विषय तत्कालीन आर्थिक परिस्थितीशी संबंधित असा असेल व तो परिषदेचे अध्यक्ष यथाकाल जाहीर करतील.

निबंधलेखकांनी जास्तीत जास्त २००० शब्दांत विषय मांडावयाचा असून सोबत १०० शब्दात त्याचा गोषवारा सादर करणे अत्यावश्यक आहे.

३१ ऑगस्ट १९८४ ही निबंध स्वीकारण्याची अखेरची तारीख असून निबंध लेखकांनी आपले निबंध डॉ. स. ह. देशपांडे, अध्यक्ष, मराठी अर्थशास्त्र परिषद, यांजकडे कृष्णकुन्ज, १९-बी/ए महंत रोड (विस्तारित), विलेपार्ले (पूर्व), मुम्बई ४०००५७ या पत्त्यावर पाठवावयाचे आहेत.

**रवीन्द्र स. सबनीस**
**कार्यवाह-खजिनदार**

## टिपणे आणि चर्चा

# शेतमालाच्या किमतींचा प्रश्न

## श्री. चा. अ. दाभोलकर यांना उत्तर

नी. वि. सोवनी

### प्रास्ताविक

**अर्थसंवाद**च्या जुलै–सप्टेंबर १९८२ च्या अंकात श्री. चा. अ. दाभोलकर यांनी एक विस्तृत लेख लिहून त्या विषयावर ऑक्टोबर–डिसेंबर १९८१ च्या अंकात प्रसिद्ध झालेल्या माझ्या उपर्युक्त लेखावर आक्षेप घेतले आहेत. इतर कोणास त्यांच्याप्रमाणेच आक्षेप घ्यावयाचे असल्यास भरपूर अवसर मिळावा असे संपादकांच्या सल्ल्याने ठरवून आतापर्यंत वाट पाहिली. परंतु श्री. दाभोलकरांच्याशिवाय दुसऱ्या कोणीच संपादकांच्याकडे या संबंधात काही लिहून पाठविलेले नाही. त्यामुळे श्री. दाभोलकरांना आता उत्तर देत आहे.

अर्थसंवादसारख्या विद्यानिष्ठ नियतकालिकात श्री. दाभोलकरांच्या ऐसपैस व वकिली थाटाच्या एकांगी युक्तिवादास उत्तर देण्याची वास्तविक गरज नाही. परंतु श्री. दाभोलकरांनी त्यांच्या लेखात वस्तुनिष्ठता व शास्त्रीयता यांचा आभास निर्माण केल्यामुळे पुष्कळांची दिशाभूल होण्याचा संभव आहे, हे लक्षात घेऊन शास्त्रापुरतेच येथे उत्तर देत आहे. शास्त्रीयदृष्टीने श्री. दाभोलकरांच्या युक्तिवादात दोन प्रकारचे दोष आहेत. एक तर हिंदुस्थानातील सद्यःकालीन शेतीतील व इतर परिस्थितीबद्दल त्यांचे प्रामाणिक पण चुकीचे समज आहेत. दुसरे, प्रचलित अर्थशास्त्राच्या सिद्धांताविषयी त्यांच्या बऱ्याच गैरसमजुती आहेत. या दोन दोषांसंबंधीच फक्त लिहीत आहे.

श्री. दाभोलकरांचा एकूण युक्तिवाद प्रथम संक्षेपाने संदर्भासाठी मांडला पाहिजे. त्यांच्या एकूण युक्तिवादाचा पुढील आशय देताना त्यातील निरनिराळ्या कलमांना मी पुढील उत्तराच्या सोईसाठी क्रमांक दिले आहेत. एकूण सात कलमांपैकी (१), (२) (३) व (६) हे पहिल्या दोषाने – म्हणजे परिस्थितीसंबंधीच्या गैरसमजाने युक्त आहेत व बाकीचे दुसऱ्या – म्हणजे अर्थशास्त्रीय सिद्धांतासंबंधीच्या गैरसमजाने दूषित आहेत असे स्थूलमानाने म्हणता येईल.

### श्री. दाभोलकरांचा युक्तिवाद

हरितक्रांतीमुळे हिंदुस्थानातील शेतकीच्या अर्थरचनेत मूलभूत बदल झालेले आहेत, ते लक्षात न घेता प्रा. सोवनी (व इतर अर्थशास्त्रज्ञ) अर्थशास्त्राचे सिद्धांत त्या बदलापूर्वीची परिस्थिती गृहीत धरून तिला लावत असल्यामुळे शेतीमालास त्याच्या उत्पादनपरिव्ययाइतका आधारभाव ठरवून देण्याच्या मागणीची त्यांची मीमांसा चुकीची होते. हिंदुस्थानातील शेतकीच्या परिस्थितीत झालेला आणखी एक मूलभूत फरक म्हणजे (१) दुसऱ्या महायुद्धाच्या काळापासून आतापर्यंत जवळजवळ अर्धशतक शासकीय हस्तक्षेपामुळे मागणी-पुरवठ्याचा सिद्धांत शेतकी मालाच्या किमती ठरविण्यास असमर्थ झालेला आहे. (२) हरितक्रांतीमुळे गहू (तांदूळ) ही महत्त्वाची – इतर अन्नधान्येही–खाऊ पिके आता विकाऊ वा व्यापारी पिके झाली आहेत. त्यामुळे शेतकी हे भारतातील बहुसंख्य शेतकऱ्यांचे निर्वाहाचे साधन (subsistence farming) राहिले नसून तो त्यांचा व्यवसाय (commercial farming) झाला आहे. घरच्या गरजा भागवून थोडेफार बाजारपेठेसाठी उत्पादन करणारा शेतकरी उत्पादक हरितक्रांतीनंतर पैशाच्या

आधारावर पैसा मिळविण्यासाठीच शेतकीउत्पादन करू लागला आहे. (३) त्यामुळे शेतकीउत्पादनात होत असलेल्या रूपांतरणाची दिशा कमीत कमी उत्पादन परिव्ययात जास्तीत जास्त उत्पादन काढण्याची आहे. शेतमालाला त्याच्या उत्पादनपरिव्ययाइतक्या आधार किमती शासनाने जाहीर केल्या तर हे रूपांतरण ४–५ वर्षांत वेगाने सर्वत्र होईल. त्यामुळे देशाच्या ज्या भागांत ज्या पिकास उत्पादनाची सर्वांत अनुकूल परिस्थिती असेल तेथे त्या पिकाचे उत्पादन केंद्रित होईल – गहू पंजाबात, ऊस महाराष्ट्रात, वगैरे. त्याचा परिणाम आतापेक्षा सतत कमी होणाऱ्या उत्पादनपरिव्ययात आतापेक्षा पुष्कळ विपुल उत्पादन होईल. (४) मग पुरवठा वैपुल्याने व घटणाऱ्या उत्पादनपरिव्ययामुळे शेतीमालाच्या किमती प्रा. सोवनी यांना वाटते तशा वाढणार नाहीतच पण खाली येतील. (५) उत्पादन–परिव्यय सारखे नसतात हे खरे आहे. त्यावर व्यवहार्य उपाय म्हणजे शेवटच्या उत्पादकाला येणाऱ्या उत्पादनपरिव्ययाइतका – म्हणजे त्या पिकाच्या उत्पादकांपैकी ज्याचा उत्पादनपरिव्यय देशात सर्वांत जास्त असेल त्याच्या परिव्ययाइतका – आधारभाव ठरविणे हा होय. (६) हरितक्रांतीमुळे झालेल्या रूपांतरणामुळे नागरी व ग्रामीण भागातील जीवनमानामधील पूर्वीची तफावत कमी झाली आहे. पंजाब–हरियाणातील गहू उत्पादनक्षेत्रात व महाराष्ट्राच्या साखर उत्पादनक्षेत्रात आजच ग्रामीण जनता नागरी जनतेच्या जीवनमानाच्या जवळ आली आहे. त्यांच्या जीवनमानाचे गुणोत्तर एकाच्या आसपास येऊ लागलेले आहे. (७) शेतीमालाच्या व बिगरशेती उत्पादनाच्या किमतींची मूल्यतुल्यता तपासताना १९६०–६१ हे आधारवर्ष म्हणून घेणे योग्य नाही.

श्री. दाभोलकरांच्या या युक्तिवादाचा आता कलमवार विचार करू.

(१) "'पुरवठा – मागणीचा नियम शेतीमालाच्या किमती ठरविण्यास असमर्थ कसा होईल असे धोरण शासनाने अंमलात आणावे अशी ही मागणी आहे.' नवसनातन अर्थशास्त्राच्या नियमाप्रमाणे बिनचूक असलेले प्रा. सोवनी यांचे हे विवेचन प्रत्यक्ष वस्तुस्थितीशी पूर्णतः विसंगत आहे. दुसऱ्या महायुद्धकाळापासून आता जवळ जवळ गेले अर्धशतक शासकीय हस्तक्षेपामुळे मागणी व पुरवठ्याचा नियम शेतमालाच्या किमती ठरविण्यास असमर्थच झालेला आहे.....मागणी-पुरवठ्याचा नियम शेतमालाच्या किमती याप्रमाणे ठरविण्यास असमर्थ व्हावा यासाठी गेल्या अर्धशतकापासून शेतमालाच्या बाजारात शासनाकडून सतत मोठ्या प्रमाणावर हस्तक्षेप केला जात आहे." (पृ. ५९).[१]

श्री. दाभोलकरांचे हे मत शेतकरी संघटनेच्या काही प्रवक्त्यांच्या मतापेक्षा निराळे आहे. त्या प्रवक्त्यांच्या मते शेतीमालाच्या किमती पुरवठा-मागणी या अर्थशास्त्राच्या नियमाप्रमाणे ठरतात व बिगर शेतीमालाच्या तशा ठरत नाहीत. याचाच उल्लेख मी माझ्या विवेचनात केला होता. परंतु श्री. दाभोलकरांचा मतप्रवाह याहून निराळा दिसतो एवढे नोंदून आता त्यांची समीक्षा करू.

श्री. दाभोलकरांचे हे मत सर्वस्वी अवास्तव आहे. उपलब्ध पुरावा त्याच्या विरुद्ध आहे. तो सर्व येथे देण्यास अवकाश नाही. तथापि सहज प्रत्ययास येणाऱ्या घडामोडींवरूनही पुरवठा-मागणीचा सिद्धांत शेतमालाच्या संदर्भात गेल्या अर्धशतकातही कार्यशील आहे हे लक्षात येते. पिकांच्या हंगामाच्या वेळी नेमाने त्या पिकांचे बाजारभाव दरवर्षी कमी होतात व नंतर वाढतात ही अनुभवाची गोष्ट आहे. ती आकड्यांनीही सिद्ध करता येईल. पाऊसपाणी कमी होऊन दुष्काळ पडल्यास शेतमालाची पैदास कमी होते व त्याची किंमत बाजारात वाढते हेही सर्वत्र आढळते. औद्योगिक मालाच्या किमती व शेतमालाच्या किमती यांचे तुलनात्मक निर्देशांक वर जातात व खाली येतात हे त्या-संबंधीच्या आकडेवार माहितीवरून दाखविता येते. (या तुलनात्मक बदलात आधारवर्षाचा संबंध असला तरी त्याच्या विशिष्टत्वामुळे त्या दोन्ही मालांच्या किमतीतील वैयक्तिक चढउतारांना काही बाध येत नाही हे श्री. दाभोलकरांनी तो मुद्दा उपस्थित केला आहे म्हणून येथे जाता जाता सांगणे आवश्यक आहे. श्री दाभोलकरांच्या त्या मुद्द्याचा पुढे स्वतंत्र प्रपंच केला आहेच.) अमेरिकेतून पी. एल. ४८० चा गहू मोठ्या प्रमाणात आयात होऊन पुरवठा वाढल्यामुळे हिंदुस्थानातील गव्हाच्या किमती त्या मुदतीत बऱ्याच खालच्या पातळीवर वावरल्या हेही सर्वांस विदित आहे. आता-सुद्धा मुंबईतील कापड गिरण्यांतील प्रदीर्घ संपामुळे कापसाला नेहमीप्रमाणे मागणी नाही व त्यामुळे कापसाच्या किमती कमी झाल्या आहेत अशी ओरड ऐकू येते. शेतकी मालाचे वायदेबाजार या काळात नियंत्रणाखाली का होईना पण चालू आहेत. पुरवठा-मागणीच्या सिद्धांताच्या कार्यशीलतेची ही काही चिन्हे सुद्धा श्री. दाभोलकरांचा दावा अयथार्थ आहे हे दाखविण्यात समर्थ आहेत.

श्री. दाभोलकरांचे मत किती हास्यास्पद आहे हे आणखी निराळ्या रीतीने थोडक्यात दाखविता येईल. भारतीय शासनाच्या अकार्यक्षमतेचा डंका सर्वत्र वाजत असता व त्यासंबंधीचा अनेक वर्षांचा अनुभव जमेस धरता त्या शासनाच्या हस्तक्षेपामुळे पुरवठा-मागणीचा प्रमाथी सिद्धांत अकार्यशील झाला आहे हा श्री. दाभोलकरांचा शोध इतर राष्ट्रांतील अनुभवांच्या तुलनेनेही अपूर्वच म्हटला पाहिजे. भारतापेक्षा अधिक काळ व भारताहून कितीतरी सर्वंकष व कराल अशी नियंत्रणे निवृणपणे सतत कार्यवाहीत आणणाऱ्या साम्यवादी रशियातही मागणीपुरवठा नियमावर अद्याप विजय मिळालेला नाही असा त्यासंबंधी विशेष बारकाईने अभ्यास करणाऱ्यांचा एकमुखी निष्कर्ष आहे. पूर्व युरोपातील साम्यवादी राष्ट्रांचा अनुभवही याहून निराळा नाही. या सर्व साम्यवादी राष्ट्रांनाही असाध्य ठरलेली गोष्ट भारत सरकारने कित्येक वर्षे साध्य करून दाखविली आहे असे श्री. दाभोलकर सांगतात. हा त्यांना झालेला साक्षात्कारच म्हटला पाहिजे ! 'वद सिंहो मया हतः' याचाच हा प्रकार दिसतो ! ज्या माझ्यासारख्या करंट्यांना हा साक्षात्कार झालेला नाही व होत नाही ते श्री. दाभोलकरांचे हे वैयक्तिक पण भ्रांत मत आहे असे मानून त्याकडे दुर्लक्ष करण्यापलीकडे काय करणार ?

(२) "दुर्दैवाने 'हरितक्रांतीने' भारतीय शेतीअर्थरचनेत झालेल्या मूलभूत बदलाकडेच आमच्या अर्थशास्त्रज्ञांचे अद्याप लक्ष गेलेले नाही... हरितक्रांतीपूर्वी घरच्याच साधनसामग्रीवर व घरच्या व भाऊबंदांच्या मनुष्यबळावर घरच्या गरजा भागवून थोडेफार बाजारपेठेसाठी उत्पादन करणारा शेतकीउत्पादक हरितक्रांतीनंतर पैशाच्या आधारावर पैसा मिळविण्यासाठीच शेतकी उत्पादन घेऊ (करू ?) लागला आहे. म्हणजेच शेतकी हे त्याच्या निर्वाहाचे साधन (subsistence farming) राहिले नसून त्याचा व्यवसाय (commercial farming) झाला आहे. अर्थशास्त्रीय भाषेत आपल्या शेतीव्यवसायाचे हरितक्रांतीनंतर व्यापारीकरण होत आहे ही वस्तुस्थिती ध्यानात येईल." (पृ. ६६). हे कशामुळे झाले आहे याचेही चित्र श्री. दाभोलकरांच्या मते स्पष्ट आहे. गव्हाचे पीक पंजाबात व हरियाणा इत्यादी राज्यांत पैशाचे पीक झाले आहे. भाताचा त्यांनी उल्लेख केलेला नाही पण या राज्यातून भाताचे पीकही पैशाचेच पीक झाले आहे या विधानाशी श्री. दाभोलकर सहमत होतील असे मला वाटते ! हरितक्रांतीमुळे शेती व्यवसायाचे व्यापारीकरण होत आहे व या व्यापारीकरणाचा अर्थ अन्नधान्यादी पूर्वीची खाऊ पिके आता विकाऊ पिके होत आहेत. एवढेच नव्हे तर "पैशाच्या आधारावर पैसा मिळविण्यासाठीच" नफ्यातोट्याचा विचार करून पूर्ण आर्थिक दृष्टीने शेतकरी उत्पादक शेती व्यवसाय करू लागला आहे. पिके विकाऊ झाल्यामुळे आर्थिक दृष्टीने उत्पादन होऊ लागले आहे असा त्यांचा अभिप्रायही स्पष्ट आहे.

अडचण येवढीच आहे की या दोन निरनिराळ्या प्रक्रिया आहेत आणि त्या नेहमीच संलग्न किंवा कार्यकारणभावाने निगडित असतातच असे इतिहासात आढळत नाही. थोड्या निराळ्या रीतीने हेच असे सांगता येईल की एखाद्या पिकाचे विकाऊ पीक होणे हे त्या पिकाचे उत्पादन पूर्ण आर्थिक दृष्टीने होण्यासाठी आवश्यक कारण आहे परंतु पुरेसे (पर्याप्त) कारण नाही. पहिले झाले तरी दुसरे होईलच असे नाही. भारतात कापूस व ताग ही आज १०० वर्षांहून अधिक काळ "व्यापारी" (विकाऊ) पिके म्हणूनच पिकविली जात आहेत. परंतु त्यामुळे त्या पिकांचे बहुसंख्य उत्पादक-शेतकरी आजही पूर्ण आर्थिकदृष्टीने त्या पिकांचे उत्पादन करतात असे त्यांच्यासंबंधीच्या उपलब्ध माहितीवरून दिसत नाही.

खाऊ पिकाबाबत या संबंधात थोडी अधिक गुंतागुंत आहे. खाऊ पिकांचे व्यापारीकरण किंवा ती विकाऊ पिके होणे हे त्या पिकांच्या शेतकऱ्यांचे उत्पादन त्यांच्या खावटीच्या गरजा भागविण्याहून जास्त असल्यासच शक्य होते. (ज्यांचे उत्पादन स्वतःची खावटीची गरज भागविण्याइतके नसते ते शेतकरीही इतर गरजा भागविण्यासाठी लागणारा पैसा उभारण्यासाठी हंगामाच्या वेळी आपल्या तुटपुंज्या उत्पादनाचा काही भाग विकतात व पुढे जेव्हा त्यांच्या जवळचे धान्य संपते तेव्हा बाजारातून खावटीसाठी धान्य विकत घेतात ( कर्जाच्या आधारे) हेही नोंदणे आवश्यक आहे. परंतु त्यांच्या बाबतीत व्यापारीकरण झाले आहे असे म्हणणे यथार्थ ठरणार नाही).

असे जादा उत्पादन करणारे शेतकरी हे बहुधा ज्यांच्याजवळ पुष्कळ वा पुरेशी शेतजमीन असते असे असतात. असे खाऊपीक विकाऊ पीक म्हणून काढणारे शेतकरी नेहमीच भारतात होते. हरितक्रांतीमुळे असे करणे मोठ्यां-बरोबर मध्यम शेतकऱ्यांनाही अधिक प्रमाणात शक्य झाले व त्यामुळे त्यांची संख्या वाढली हेही निर्विवाद आहे. प्रश्न

एवढाच आहे की एखाद्या पिकाचे–उदाहरणार्थ गव्हाचे – एकूण उत्पादकांपैकी किती उत्पादकांचे असे रूपांतरण (tranformation) झाले आहे, वा हरितक्रांतीमुळे होण्याचा संभव आहे? भारतातील बहुसंख्य शेतकरी उत्पादकांचे असे रूपांतरण झाले असेल वा होण्याचा नजिकच्या काळात संभव असेल तर श्री. दाभोलकरांचे म्हणणे बरोबर ठरेल. परंतु दुर्दैवाने तसे नाही असाच विपुल पुरावा उपलब्ध आहे.

याचा खुलासा करण्यासाठी प्रथम हरितक्रांतीचे नक्की स्वरूप लक्षात घेतले पाहिजे कारण तीच या सर्व रूपांतरण प्रक्रियेची प्रेरणा आहे असे श्री. दाभोलकरांचे म्हणणे आहे. हरितक्रांतीत होणाऱ्या उत्पादनवाढीचे तीन मुख्य कारक आहेत. सुधारित बी-बियाणे, रासायनिक खतांचा वाढता वापर व पाण्याच्या पुरवठ्याची विपुलता व सुरक्षितता. पाणीपुरवठा निश्चित व भरपूर असेल तर रासायनिक खते वापरता येतात आणि ती तशी वापरली तर नवीन बी-बियाणे फार मोठ्या प्रमाणावर उत्पादनाची वाढ करू शकतात असा हरितक्रांतीचा तांत्रिक आशय आहे. तो लक्षात घेता हरितक्रांतीचा फायदा कोणाला घेता येतो हे अजमावता येते. वर उल्लेखिलेल्या तीन कारकात पाण्याचा भरपूर व निश्चित पुरवठा हा सर्वांत महत्त्वाचा आहे. आजतागायत हरितक्रांती ही पाटस्थळ व मोटस्थळ जेथे आहे त्या प्रदेशातच पसरली आहे हे सर्वांस विदित आहे. पंजाब-हरियाणातील शेती ही बहुतेक पाटस्थळ व मोटस्थळाची व सिंचित क्षेत्रावरील असल्यामुळे तेथे हरितक्रांतीचा प्रादुर्भाव लवकर व विस्तारित क्षेत्रावर झाला हा इतिहास आहे. कोरडवाहू वा पावसावर सर्वस्वी अवलंबून असणाऱ्या शेतीत तो झालेला नाही. अशी शेती भारतातील लागवडीखालील शेतजमिनीपैकी ७० टक्क्यांहून अधिक आहे. पिकाखालील एकूण जमिनीपैकी जास्तीत जास्त ५५ टक्के जमीन पाटस्थळाखाली वा सिंचित शेतीखाली आणता येईल असा तांत्रिक अंदाज आहे. प्रत्यक्षात त्याहून कमी २८ टक्के जमिनीवरच सध्या सिंचित पिके काढण्याची व्यवस्था व शक्यता आहे. उरलेल्या शेतजमिनीवर हरितक्रांतीत अनुस्यूत असलेले सुधारित उत्पादनतंत्र वापरता येणे फारसे शक्य नाही. हरितक्रांतीच्या विस्तारावरील ही पहिली मर्यादा आहे व ती कडक आहे हे सांगावयास नको.

हरितक्रान्तीची दुसरी दोन कारके सुधारित बी-बियाणे व रासायनिक खते. यांचा अंगीकार सिंचित क्षेत्रातील बहुसंख्य शेतकऱ्यांनी करण्यात थोड्या निराळ्या अडचणी उद्‌भवतात असा अनुभव आहे. ही बी-बियाणी व रासायनिक खते शेतकऱ्याला उत्पादिता येत नाहीत. ती त्याला बाहेरून विकत घ्यावी लागतात. येथे पैशाचा (व पतपैशाचा) प्रश्न येतो. श्री. दाभोलकरांनी "पैशाच्या जोरावर पैसा मिळवण्यासाठीच" शेती उत्पादन असे ज्याचे वर्णन केले आहे त्यातल्या "पैशाच्या जोराचाच" येथे संदर्भ आहे. हरितक्रान्तीत अनुस्यूत असलेले उत्पादनतंत्र हे भांडवलघन आहे व त्यात दर एकरी उत्पादनाचा खर्च पूर्वीपेक्षा वाढतो परंतु अधिक उत्पादनामुळे दरमणी खर्च कमी होतो असे आढळते. दर एकरी वाढणारा उत्पादनपरिव्यय हा मुख्यतः दत्त परिव्यय (paid-out costs) वाढल्यामुळे म्हणजे बी-बियाणी व रासायनिक खते ही बाहेरून विकत घ्यावी लागतात म्हणून वाढतो. हा खर्च करावयास शेतकऱ्याजवळ स्वतःचे अगर कर्जाऊ नगदी पैसे असावे लागतात. मोठ्या व मध्यम आकाराची धारणक्षेत्रे असणाऱ्या मोठ्या व मध्यम शेतकऱ्यांना असे पैसे कासौयांनि उपलब्ध होतात. परंतु लहान क्षेत्रधारकांना होत नाहीत व म्हणून त्यांना त्या नवीन उत्पादनतंत्राचा अंगीकार करणे अतिशय अवघड जाते. पंजाब-हरियाणातही लहान शेतकऱ्यांमध्ये या तंत्राचा अवलंब कमी प्रमाणात झाला आहे असेच आढळले. हरितक्रांतीमुळे मोठ्या व मध्यम शेतकऱ्यांची उत्पन्ने लहान शेतकऱ्यांच्या मानाने फार मोठ्या प्रमाणात वाढल्याने त्यांच्या उत्पन्नातील विषमतेचे प्रमाण पूर्वीपेक्षा बरेच वाढले आहे असेच तेथे झालेल्या पाहण्यात उपलब्ध झालेल्या माहितीवरून दिसून येते. एकॉनॉमिक अँड पोलिटिकल विकलीच्या १९७४–७७ या वर्षांच्या अंकांतून अशा कितीतरी पाहण्यांचे अहवाल छापलेले आहेत. त्यात जिज्ञासूंना यासंबंधी अधिक माहिती मिळू शकेल.

लहान क्षेत्रधारक शेतकरी हेच भारतात बहुसंख्य आहेत. १९७०–७१ च्या शेतकी जनगणनेच्या अहवालाप्रमाणे ज्यांचे धारणक्षेत्र प्रत्येकी २ हेक्टर वा त्याहून कमी आहे असे शेतकरी एकूण भारतातील शेतकऱ्यांत ७० टक्के आहेत. ८० टक्के तीन हेक्टर अगर त्याहून कमी जमिनीची मशागत करणारे आहेत. त्यांना हरितक्रान्तीतील तंत्राचा अंगीकार करणे अशक्य नसले तरी फार अवघड आहे हे यावरून सहज लक्षात येईल.

या संबंधात आणखी एक गोष्ट ध्यानात घेणे आवश्यक आहे. हरितक्रान्तीत अनुस्यूत असलेली बी-बियाण्यांतील सुधारणा ही गहू व भात या दोन पिकांबाबत विशेष पूर्णत्वाने झाली आहे. इतर पिकांच्या बाबतीत ही सुधारणा तितक्या

प्रमाणात झालेली नाही. तेव्हा त्या पिकांवर हरितक्रान्तीचा परिणामही फारसा झालेला नाही. भविष्यकाळी होईल अशी आशा आहे.

सिंचन क्षेत्राच्या वाढीची मर्यादा, लहान शेतकऱ्यांचे आर्थिक दुर्बलत्व व गहू, तांदूळ या दोन पिकांतच आतापर्यंत मर्यादित असलेला हरितक्रांतीचा परिणाम हे सर्व लक्षात घेता हरितक्रांन्तीचा स्पर्श भारतातील एकूण शेतकऱ्यांपैकी फारथोड्या शेतकऱ्यांना झाला आहे व तिचा विस्तार जास्तीत जास्त झाला तरी देशातील बहुसंख्य शेतकरी त्यात सामील होऊ शकणार नाहीत हे स्पष्ट आहे. त्यामुळे हरितक्रान्तीद्वारा सर्व देशातील शेतीत झालेल्या व त्वरेने होणाऱ्या रचनात्मक बदलाचे श्री. दाभोलकरांनी रेखाटलेले रम्य चित्र हे वास्तवातील नसून त्यांच्या स्वप्नसृष्टीतले आहे असे म्हणणे भाग आहे. दुर्दैवाने त्यांना त्यांचे स्वप्न वास्तव आहे असे वाटते व म्हणून त्यांच्या स्वप्नाने न पछाडलेल्या अर्थशास्त्रज्ञांवर अवास्तवतेचा आरोप ते करतात !

(३) भारतातील शेतीचे व्यापारीकरण सुरू झाले आहे व ते लवकरच सर्व देशातील शेतकऱ्यांना व्यापेल आणि त्याचे शेतीउत्पादनावर होणारे परिणाम श्री. दाभोलकरांच्या मते असे असतील :

"पैशाच्या पिकाच्या निर्मितीत बाजारभावाप्रमाणे निर्मितीचा खर्च कमीजास्त करून उत्पादनात फेरफार केल्याशिवाय गत्यंतरच नसते. ज्या उत्पादकांना त्या शेतीमालाच्या उत्पादनात पुरेसा नफा सुटणार नाही ते उत्पादक दुसऱ्या प्रकारच्या शेतीमालाचे उत्पादन घेतील (करतील?) . . . म्हणजेच ज्या ठिकाणी ज्या शेतीमालाचे उत्पादन कमीत कमी खर्चात जास्तीत जास्त घेणे शक्य असेल त्याच ठिकाणी त्या शेतीमालाचे मोठ्या प्रमाणावर उत्पादन घेतले (केले ?) जाईल" (पृ. ६६–६७) उदाहरणार्थ, पंजाबात गहू, प. महाराष्ट्रात ऊस वगैरे. "परिणामी गहू व साखर या दोहोंचाही उत्पादनपरिव्यय कमी होईल. एवढेच नव्हे तर अशा प्रकारे नैसर्गिक परिस्थितीमुळे ज्या भागात जे शेतकी उत्पादन कमी खर्चात किंवा समान खर्चात जास्त चांगले येते त्या त्या भागात त्या त्या शेतकी उत्पादनाचे केंद्रीकरण झाल्यामुळे विशेषीकरणाचे सर्व अर्थशास्त्रीय फायदे त्या उत्पादनाला मिळू लागतील त्यामुळे उत्पादन-परिव्यय कमी होऊ लागेल" (पृ. ६७)..."शेतकी व्यवसायाच्या व्यापारीकरणाची हरितक्रांतीपासून सुरू झालेली प्रक्रिया पूर्ण होण्यासाठी लागणारा काळ संपला की (नीट नियोजनपूर्वक आखणी केली तर यासाठी चारपाच वर्षांचा काळ पुरा आहे) एकूण भाव पातळी न वाढताही मागणीइतक्या शेतीउत्पादनाचा पुरवठा होऊ लागेल." (पृ. ६७)

हरितक्रान्तीचा स्पर्श भारतातील बहुसंख्य शेतकऱ्यांना झालेला नाही व तो होण्यात कोणत्या दुर्लंघ्य अडचणी आहेत याचा विचार आधीच्या कलमाच्या चर्चेत पूर्वी केला आहे. त्या पार्श्वभूमीवर त्या प्रक्रियेसंबंधीचे श्री. दाभोलकरांनी वर रेखाटलेले रम्य चित्र भारतातील शेतीव्यवसायाच्या वास्तव ज्ञानावर उभारलेले नसून सीमान्त संकल्पनेवर आधारलेल्या नवसनातन अर्थशास्त्राच्या सिद्धान्तांना अंगभूत असणाऱ्या काल्पनिक प्रतिमानावर आधारलेले आहे हे सहज लक्षात येईल. श्री. दाभोलकरांना त्याची कल्पना आहे की नाही हे मला माहीत नाही, परंतु ते जे चित्र रंगवीत आहेत ते नवसनातन अर्थशास्त्राच्या सिद्धान्तानुसार त्यांनी वर्णिलेल्या प्रक्रियेतून शेवटी निर्माण होणाऱ्या आर्थिक व्यवहारांच्या समतोलाचे चित्र आहे. नवसनातन अर्थशास्त्राच्या स्थितिशील प्रतिमानावर ते उभारलेले असल्यामुळे त्यात सतत वाहणाऱ्या काळाचा संदर्भ नसून वाहावयास थांबलेल्या काळाचा (स्थितिशील) संदर्भ आहे. त्या अनुसार ही समतोलात परिणत होणारी आर्थिक प्रक्रिया तत्काळ–म्हणजे एका क्षणात–होणारीच अभिप्रेत असते. श्री. दाभोलकरांना अभिप्रेत असलेला ४–५ वर्षांचा या प्रक्रियेच्या संक्रमणाचा काल या प्रतिमानात व त्यावर आधारलेल्या सिद्धान्तात बसत नाही; त्याच्याशी तो सुसंगत नाही.

पण त्याहीपेक्षा महत्त्वाची गोष्ट म्हणजे त्या प्रतिमानातील गृहीतकृत्ये पूर्णपणे अंमलात असल्याखेरीज ती प्रक्रिया सुरू होत नाही व पुरीही होत नाही ही आहे, आणि ही गृहीतकृत्ये इतकी अवास्तव आहेत की ती भारतातच काय पण जगातील कोणत्याही देशात, कोणत्याही काळी पुरी झालेली नाहीत व पुढे पुरी होण्याचा संभवही नाही. ही गृहीतकृत्ये अनेक आहेत व त्यांचा विस्ताराने विचार करण्याचे हे स्थळ नव्हे. मी त्यांची चर्चा अन्यत्र केली आहे.[२] वानगीदाखल काही येथे सांगतो. ती भारताच्या सद्यःपरिस्थितीत किती वास्तव आहेत हे वाचकांनीच ठरवावे.

(१) पूर्णस्पर्धेची परिस्थिती. सर्व शेती-उत्पादकांना सारख्या आकाराची नसली तरी सारख्या सौकर्याने साधनसंपत्ती व सुविधा उपलब्ध असणे.

(२) उत्पादकघटक-जमीन, कामगार, भांडवल (औजारे, वगैरे)--एकजिनसी, अमर्यादपणे विभाजनीय, पूर्णपणे चलिष्णू, तत्काळ इष्टरूपदेय असणे.

(३) भविष्यकाळासंबंधी कोणतीही अनिश्चितता नसलेली परिस्थिती.

(४) वायदेबाजार, पतपैसा यांचा अभाव असलेली, ... वगैरे वगैरे.

ही गृहीतकृत्ये पुऱ्या करणाऱ्या काल्पनिक अर्थव्यवस्था अर्थशास्त्राच्या पाठ्यपुस्तकातच सापडतात. वास्तवात सापडणे सुतराम अशक्य. माझ्या मूळच्या विवेचनात मी ही गोष्ट स्पष्टपणे नोंदून त्यासंबंधी इशारा दिलेला असताना मला वास्तवाचे भान नाही असे श्री. दाभोलकर म्हणतात व आपण स्वतःच्या वर वर्णिलेल्या अवास्तव सिद्धान्तानुसार केलेल्या विवेचनास वास्तव समजतात याला गैरसमज म्हणावा की अभिनिवेशाने येणारे आंधळेपण म्हणावे ?

हे त्यांचे अनुमान त्यांच्या स्वतःच्याच युक्तिवादाने चूक आहे हे दाखविता येईल. वरील प्रक्रिया होण्यासाठी एकच रामबाण उपाय आहे व तो म्हणजे उत्पादनपरिव्ययाइतक्या शेतमालाच्या किमती ठरवून बाजारात येईल तेवढ्या शेतमालाची शासनाने खरेदी केली पाहिजे असे श्री. दाभोलकरांनी आग्रहाने मांडले आहे. पण कोणत्याही पिकाचा उत्पादनपरिव्यय सर्व देशभर अगर ते पीक लावणाऱ्या सर्व प्रकारच्या शेतकऱ्यांचा सारखा नसतो. त्यात फार विषमता असते असे आढळते. त्यामुळे या विषम परिव्ययांपैकी कोणता परिव्यय अशा किमती ठरविण्यास शासनाने प्रमाण मानावयाचा असा प्रश्न उपस्थित होतो. या प्रश्नाच्या संदर्भात श्री. दाभोलकर लिहितात :

"या संदर्भात प्रा. सोवनी यांनी एकाच पिकाचा उत्पादनपरिव्यय देशाच्या भिन्न भागात, तसेच एकाच प्रांताच्या भिन्न जिल्ह्यातसुद्धा कसा वेगळा येतो हे आकडेवारीनिशी दाखवून दिले आहे". . . "पंजाबातील विविध जिल्ह्यांतील गव्हाच्या (सिंचित) उत्पादनपरिव्यय तक्त्याप्रमाणे १९५५–५६ मध्ये हा उत्पादनपरिव्यय मणाला किमान ५ रुपये व कमाल २५ रुपये या मर्यादेत ठिकठिकाणी वेगवेगळा होतो असे आढळून येते. या आकडेवारीनंतर '१९५५–५६ मध्ये पंजाबमधील गव्हाची सरासरी किंमत दर मणी रु. १२·८० होती. गव्हाच्या उत्पादनापैकी साधारण ६० टक्क्यांहून कमी भागाचा उत्पादनपरिव्यय या किमतीत भागू शकत होता. उरलेल्या ४० टक्क्यांहून जास्त उत्पादनाचा उत्पादनपरिव्यय बाजारातील या किमतीपेक्षा जास्त होता' असे दाखवून प्रा. सोवनी यांनी प्रश्न उपस्थित केला आहे की या परिस्थितीत सर्व देशाला सरसकट लागू होणारी व फायद्याची ठरणारी किंमत कोणत्या प्रदेशातील सरासरी[३] उत्पादनपरिव्यय प्रमाण धरून ठरवावयाची ? शेतमालाच्या किमतीच्या प्रश्नाच्या गाभ्यालाच या मुद्द्याने हात घातला आहे."

"या मुद्द्याला व्यवहार्य असे एकच उत्तर आहे की त्या शेतमालाची सर्व गरज देशान्तर्गत उत्पादनातून भागेल इतके उत्पादन होण्यासाठी, म्हणजेच मागणी इतका पुरवठा होऊ शकेल इतक्या शेतीमालाचे देशात उत्पादन होण्यासाठी, शेवटच्या उत्पादकाला येणाऱ्या परिव्ययाइतका आधारभाव त्या शेतमालास पुढच्या वर्षी शेतीचा हंगाम सुरू होण्यापूर्वी जाहीर करावयाचा. १९५६–५७ मध्ये देशात अन्नधान्याची टंचाई होती. पुरवठा मागणीपेक्षा कमी होता. त्यामुळे शेवटच्या उत्पादकतेला उत्तेजन मिळेल इतका आधारभाव १९५७–५८ ची गव्हाची पेरणी होण्यापूर्वी जाहीर करावयाचा. वर दिलेल्या आकडेवारीप्रमाणे १९५६–५७ मध्ये नाशिक जिल्ह्यात असिंचित गव्हाचा उत्पादनपरिव्यय सर्वात जास्त म्हणजे मणाला रु. २३.९० आहे. त्यामुळे १९५७–५८ च्या गव्हाचा आधारभाव २५ रुपये मण जाहीर करावयाचा." (पृष्ठे ६२–६३).

शेतमालाच्या किमतींच्या या गाभ्याच्या प्रश्नाची ही "बालिश"* सोडवणूक श्री. दाभोलकरांनी इतकी निरागसपणे केली आहे की ती त्यांच्याच युक्तिवादाच्या अंगाशी येते हे त्यांना उमगलेले दिसत नाही. ज्या शेवटच्या उत्पादकाला उत्तेजन मिळेल असा भाव जाहीर करावयाचा तो 'शेवटचा उत्पादक' कोणता? 'ज्याचा उत्पादन-परिव्यय दरमणी सर्वात जास्त आहे तो' असा अर्थ श्री. दाभोलकरांना अभिप्रेत आहे हे उघड आहे. पण सरासरी परिव्ययाने हे साधत नाही. सिंचित गव्हाच्या संदर्भात त्यांनी नाशिक जिल्ह्यातील दरमणी रु. २२·९० हा दर असणारा असिंचित गव्हाचा उत्पादक शेवटचा मानला आहे. पण नाशिक जिल्ह्यातील असिंचित गव्हाचा तो सरासरी उत्पादन-परिव्यय आहे व ६० टक्क्यांहून कमी उत्पादकांचा परिव्यय त्याहून कमी आहे. उरलेल्यांचा जास्ती आहे. तेव्हा नाशिकमधील शेवटच्या गहू उत्पादकांतही श्री. दाभोलकर यांच्या म्हणण्याप्रमाणे गव्हाचे उत्पादन फायद्यात करता यावे यासाठी पंजाबच्या आकड्यांवरून त्यांनी सुचविलेली दरमणी रु. २५ ही आधार किंमत अपुरी आहे. ती किती असावी लागेल हे दाखविण्यासाठी नाशिक जिल्ह्यातील त्या सालाचे सिंचित गव्हाच्या उत्पादनपरिव्ययाचे पंजाबसारखेच आकडे येथे देतो. (मी माझ्या उपन्यासात ते दिले नव्हते. पण माझ्याजवळ ते लिहिलेले होते व ते मी मला प्रश्न विचारणाऱ्या विद्यार्थ्यांना दाखविले होते.) सिंचित गव्हाचा उत्पादनपरिव्यय दरमणी असिंचित गव्हापेक्षा कमी असतो हे सांगावयास नको.

**तक्ता**

**नाशिक जिल्ह्यातील सिंचित गव्हाच्या पिकाचे विगतवारी उत्पादन परिव्यय**

| उत्पादन-परिव्यय दरमणी रु. | शेतीचे क्षेत्रफळ | उत्पादन | धारण क्षेत्र |
|---|---|---|---|
| | | (संचयी टक्केवारी) | |
| ०–५ | २.२ | ७.४ | ६.३ |
| ५–१० | ४.५ | ७.८ | ७.० |
| १०–१५ | २६.२ | ३२.८ | २४.२ |
| १५–२० | ४०.० | ४६.७ | ४०.० |
| २०.२५ | ५९.९ | ७०.१ | ६०.० |
| २५–३० | ७५.० | ८४.३ | ७५.६ |
| ३०–५० | ८३.२ | ९१.८ | ९०.५ |
| ५०+ | १०० | १०० | १०० |

संदर्भ : Studies in The Economics of Farm Management in Bombay, Combined Report for 1954–55 to 1956–57, Ministry of Food and Agriculture, Directorate of Statistics, 1958, p. 183.

* मी 'बालिश' हा शब्द येथे मुद्दाम वापरला आहे कारण त्याच्या मागे थोडा इतिहास आहे. मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या कोल्हापूरच्या अधिवेशनात मी या विषयाचा उपन्यास केल्यावर झालेल्या चर्चेत वरील प्रकारची सूचना पुढे आली नाही. परंतु चर्चा संपवून मी सभागृहाबाहेर पडल्यावर पदवीपरीक्षेचा अभ्यास करणाऱ्या दोनतीन विद्यार्थ्यांनी मला गाठले व श्री. दाभोलकरांनी सुचविलेला पर्यायच सुचवून तो मला कसा वाटतो असे विचारले. मी त्यांना जे उत्तर दिले तेच वर देत आहे. पण ते देण्यापूर्वी मी त्यांना म्हटले "तुम्ही नुकतेच अर्थशास्त्र शिकायला लागलेले दिसता कारण तसे नसते तर तुम्ही असा 'बालिश' प्रश्न मला विचारला नसता. तथापि तुम्ही शंका विचारलीत याचा मला आनंद आहे व मी तुमचे शंकानिरसन करतो." वरील वाक्यातील 'बालिश' शब्दाचा संदर्भ हा आहे.

या आकड्यांवरून नाशिक जिल्ह्यातील सिंचित गव्हाचा कमाल उत्पादनपरिव्यय दरमणी रु. ५० च्या, वर होता. श्री. दाभोलकरांच्या सोडवणुकीप्रमाणे गव्हाचा आधारभाव दरमणी रु. ५० पेक्षा जास्त ठरविला पाहिजे. त्यावर्षी गव्हाची बाजारातील सरासरी किंमत दरमणी रु. १८.४० होती. ती या निकषाप्रमाणे पुढच्या वर्षी रु. ५० च्यावर म्हणजेच जवळजवळ तिप्पट ठरवावी लागली असती. श्री. दाभोलकरांनी दरमणी रु. १८.४० ही बाजारातील किंमत दरमणी रु. २५ करण्याचे सुचविले. म्हणजे किंमत फक्त ३५ टक्क्यांनी वाढवावी असे सुचविले. पण त्यांच्याच निकषाप्रमाणे ती जवळजवळ ३०० टक्क्यांनी वाढवावी लागेल असे कळून येते. मी माझ्या मूळ विवेचनात ती तिप्पट वाढवावी लागेल व म्हणून माझ्या पुढच्या विवेचनास तिप्पट भाव वाढीचा संदर्भ आहे, असे म्हटले होते (पृ. १४४) ही माझी भीती निराधार आहे असे आश्वासन श्री. दाभोलकर स्वतःच्या निकषांना हरताळ फासूनच देतात हे उघड आहे.

आता अशा धोरणाचे परिणाम पाहू. देशात सर्वात शेवटच्या उत्पादकाला उत्तेजन मिळेल अशा किंमती ठरविणे म्हणजे जो शेतकरी उत्पादकतेच्या दृष्टीने सर्व देशात अकार्यदक्ष त्याला संरक्षण देऊन त्यांच्या अकार्यदक्षतेस उत्तेजन देणेच होय. असे शेतकरी आज व गेले (कित्येक वर्षे) तोट्यात शेती करूनही आपले पीक बदलीत नाहीत वा ते पीक उत्पादकता वाढवून फायदेशीर शेती करण्याचा प्रयत्न करीत नाहीत. त्यांना आहे त्या स्थितीतच त्यांच अकार्यदक्ष उत्पादनपरिव्यय भागवणारी आधार-किंमत दिल्यास ते इष्ट दिशेने प्रयत्न करतील अशी भाबडी अपेक्षा श्री. दाभोलकर कशाच्या आधारावर बाळगतात हे कळत नाही. याच मुद्द्याचा दूरान्वयाने उल्लेख करण्यासाठी मी माझ्या मूळ विवेचनात स्वित्झर्लंडमधील लोण्याच्या उत्पादनाचे उदाहरण दिले होते.

याहूनही महत्त्वाचा प्रश्न श्री. दाभोलकरांच्या या सोडवणुकीच्या व्यवहार्यतेचा आहे. गव्हासारख्या एका महत्त्वाच्या धान्याची किंमत (व अर्थातच इतर धान्यांची वगैरे किंमत) एकदम तिप्पटीने वाढवून ते भाव बाजारात प्रस्थापित करू शकणारे शासन या भूतलावर असेल असे वाटत नाही. अन्नपदार्थांच्या किंमती ५० टक्के वाढल्याबरोबर पोलंडसारख्या साम्यवादी देशात शासन उलथले गेले व लष्करी अंमल पुकारावा लागला हे सर्वांना माहीत आहे. श्री. दाभोलकरांची या भाव्याच्या प्रश्नाची सोडवणूक अत्यंत अव्यवहार्य आहे.

हा अव्यवहार्यतेचा मुद्दा बाजूस ठेवला तरी श्री. दाभोलकरांनी सुचविलेल्या धोरणाप्रमाणे आधारकिंमती शेतीमालाच्या परिव्ययावरून ठरविल्यास शेतीमालाच्या परिव्ययवाढीस चालना मिळून श्री. दाभोलकरांना वाटते त्याप्रमाणे संक्रमणावस्थेनंतर शेतीमालाच्या किंमती उत्पादनाच्या वैपुल्याने खाली न येता सतत वर जातील हे थोडा विचार केला तरी लक्षात यावे. "शेतमालाला उत्पादनखर्चाधारित भाव दिला तर किंमतवाढीच्या चक्रालाच फक्त गती मिळेल, प्रत्यक्ष फायदा कुणालाच मिळणार नाही, ही प्रा. सोवनी यांनी व्यक्त केलेली भीती वस्तुस्थितीला सोडून आहे" (पृ. ६७), हा श्री. दाभोळकरांचा निष्कर्षही सर्वस्वी अवास्तव आहे हेही ओघानेच येते.

आतापर्यंत शेतमालाच्या उत्पादनपरिव्ययावर आधारित किंमती शासनाने ठरविलेल्या नाहीत. त्या या अगर पुढच्या वर्षी द्यावयाच्या असे ठरविल्यास वर सांगितल्याप्रमाणे त्या श्री. दाभोळकरांच्या निकषाप्रमाणेच आताच्या दुप्पट-तिप्पट एकदम वाढवाव्या लागतील. त्या तशा वाढविल्यावर शेतमजुराची मजुरीही वाढवावी लागेल नाहीतर त्याच्यावर उपासमारीची वेळ येईल. यामुळे शेतीमालाचे उत्पादनपरिव्यय आतापेक्षा वाढतील. त्याचप्रमाणे शेतीत उत्पन्न होणाऱ्या कच्च्या मालाचे भाव वाढल्याने त्यापासून होणाऱ्या औद्योगिक मालाचे भाव वाढतील. कापूस वाढल्याने कापडाचे, ऊस वाढल्याने साखरेचे, वगैरे. अन्नधान्याच्या भावातील लक्षणीय वाढीने औद्योगिक कामगारांची वेतने वाढतील, वाढवावीच लागतील. त्यामुळे जो औद्योगिक माल निविष्टी म्हणून– उदाहरणार्थ रासायनिक खते, औजारे–शेतीउत्पादनात लागतो त्याचेही भाव आतापेक्षा वाढतील व त्याच्या अनुषंगाने शेतमालाचे उत्पादनपरिव्ययही वाढतील, म्हणजे पुढच्या वर्षी शेतीमालाच्या उत्पादनपरिव्ययावर आधारलेल्या आधार किंमतीही शासनाला वाढवाव्या लागतील, आणि मग भाववाढीचे हे चक्र फिरू लागेल. श्री. दाभोळकरांना अभिप्रेत असलेल्या ४–५ वर्षांच्या संक्रमणकालातही हे घडेल व त्याचा त्या संक्रमणावरही परिणाम होईल. (भाववाढीचे हे चक्र सुरू होणार नाही असे आश्वासन श्री. दाभोळकर देतात ते नवसनातन अर्थशास्त्रातील 'इतर सर्व स्थिरत्वे' या गृहीतकृत्याच्या आधारे देत

असावेत असा संशय येतो. एखाद्या वस्तूची किंमत कशी ठरते, याचे विवेचन इतर सर्व गोष्टींच्या किमती मिळकतींची उत्पन्ने, वगैरे स्थिर आहेत, असे गृहीत धरून अर्थशास्त्रात केले जाते. पण हे गृहीतकृत्य वास्तवात खरे नसते हे सर्वच कबूल करतात.) भाववाढीचे चक्र आणि प्रक्रिया इतकी अनुभवाची व सहज निदर्शनास येणारी आहे की ती अस्तित्वातच नाही असे मानून वरीलप्रमाणे शेतीमालाच्या किमती त्याच्या कमाल परिव्यया-इतक्या वाढल्या तरी भाववाढीचे चक्र सुरू होणार नाही असे आश्वासन देणे हा बुद्धीचा वेड पांघरण्याचा किंवा दृष्टिभ्रमाचा प्रकारच म्हणावा लागेल.

(५) "शेतकी उत्पादनाला उत्पादनपरिव्ययावर आधारित भाव दिला तर शहरी आणि ग्रामीण भागांतील विसंवाद दूर होऊन शहरी व ग्रामीण क्षेत्रांचा विकास जोडीने कसा होईल याची जाण अर्थशास्त्रज्ञांना अजून आलेली नाही. प्रा. सोवनी यांनी 'ग्रामीण भागातील जनतेचे जीवनमान हे नागरी जनतेच्या मानाने पुष्कळच कमी असावे, त्यांच्यामधील गुणोत्तर मोठे असावे हे समाज-अर्थ-राजकारणाने गृहीत धरले आहे. ते गृहीतकृत्य सोडून देण्याचा सवाल शरद जोशी यांच्या मागणीमागे आहे', या शब्दांत हाच विचार स्पष्टपणे मांडला आहे. पण पंजाब हरियाणातील गहू उत्पादनक्षेत्रात व महाराष्ट्राच्या साखर उत्पादनक्षेत्रात आजच ग्रामीण जनता नागरी जनतेच्या जीवनमानाच्या आसपास आलेली आहे. त्यांचे गुणोत्तर एकाच्या जवळपास येऊ लागले आहे. ही वस्तुस्थिती हे गृहीतकृत्य आता इतिहासजमा होऊ लागले आहे असे स्पष्टपणे दर्शवीत आहे. कुठल्याही उत्पादनक्षेत्रात होणाऱ्या उत्पादनवाढीचा लाभ प्रथम त्या प्रक्रियेत सहभागी होणाऱ्यांना होतो हा साधा अर्थशास्त्रीय नियम या वस्तुस्थितीच्या मागे आहे आणि अर्थशास्त्रज्ञांनी आपली नवसनातन गृहीतकृत्ये सोडून दिली नाहीत तरी अर्थव्यवहाराच्या नियमांच्या रेट्यांनी ती हळूहळू पण निश्चितपणे इतिहास-जमा होऊ लागली आहे." (पृष्ठ ६८)

वरील अवतरणातील श्री. दाभोलकरांच्या युक्तिवादाचा रोख काय आहे हे समजणे जरा अवघड आहे, कारण त्यांचे या विषयासंबंधात मी केलेल्या चर्चेसंबंधी बरेच गैरसमज झालेले असावेत. 'नागरी व ग्रामीण जनतेच्या जीवनमानात पुष्कळ तफावत असावी व तशी असणे इष्ट आहे असे समाज-अर्थ-राजकारणाने गृहीत धरले आहे' असे माझे मूळचे शब्द आहेत. त्यांचा अर्थ समाजकारण, राजकारण व अर्थकारण यांनी असे मानले आहे असा आहे. समाज-शास्त्र, अर्थशास्त्र व राज्यशास्त्र यांनी तसे मानले आहे असे मी म्हटलेले नाही. ही शास्त्रे तसे असावे वा असणे इष्ट आहे असे मुळीच गृहीत धरीत नाहीत. तशी तफावत असते ही वस्तुस्थिती लक्षात घेऊन ती तशी का असते याचा उलगडा करावयाचा ती शास्त्रे प्रयत्न करतात. ही तफावत कमी करावी या असावी असेच ती शास्त्रे म्हणतात. तेव्हा श्री. दाभोलकरांनी 'कारण' व 'शास्त्र' या संज्ञांच्या अर्थाचा घोटाळा करून हा दोष त्या शास्त्रांच्या माथी मारला आहे. अर्थातच ते चूक आहे. मुळात मी श्री. शरद जोशी यांच्या मागणीचा अंतिम उद्देश स्पष्ट करीत होतो. ही तफावत कमी करावी वा असावी हा श्री. शरद जोशी यांच्या मागणीला माझा मुळीच विरोध नाही व कोणा इतर अर्थशास्त्रज्ञांचा असेल असे वाटत नाही. परंतु हे साधावयाचा एकमेव मार्ग शेतीमालाला कमाल उत्पादनपरिव्ययाइतक्या आधार-किमती देणे हा आहे या युक्तिवादाबाबत माझा मतभेद आहे आणि तसे धोरण अंगीकारल्यास कोणत्या प्रक्रिया संभाव्य आहेत याचे मी तपशीलवार वर्णन केले आहे. तेव्हा येथे श्री. दाभोलकर म्हणतात त्याप्रमाणे मी किंवा इतर अर्थशास्त्रज्ञांनी नवसनातन गृहीतकृत्ये सोडून देण्याचा प्रश्न मुळीच उद्‌भवत नाही.

'पंजाब-हरियाणात व महाराष्ट्रातील साखर उत्पादनक्षेत्रात ही तफावत जवळजवळ नाहीशी होत आली आहे,' हे श्री. दाभोलकरांचे विधान आश्चर्यकारक आहे. प्रथमतः श्री. दाभोलकरांचे हे विधान वास्तव असल्यास ते उत्पादनपरिव्ययावर आधारित भाव न देताही निर्माण झालेल्या परिस्थितीबाबतच आहे हे उघड आहे. तेव्हा असे भाव देणे हे या क्रांतिकारक बदलाचे कारण होऊ शकत नाही. परिणामी ही तफावत दूर करण्यासाठी असे धोरण अंगीकारणे आवश्यक आहे असे श्री. दाभोलकरांना म्हणता येणार नाही.

अधिक महत्त्वाचा प्रश्न ते जी वस्तुस्थिती आहे असे म्हणतात ते कितपत बरोबर आहे हा आहे. या दोन प्रदेशात ही तफावत आता इतिहास-जमा होण्याच्या मार्गावर आहे हे त्यासंबंधीच्या कोणत्या उपलब्ध माहितीच्या आधारे श्री. दाभोलकर ठोकून देतात ? जी आकडेवार माहिती ग्रामीण व नागरी जीवनमानांबद्दल, भारताबद्दल

व त्यातील प्रांतांबद्दल (पंजाब, हरियाणा, महाराष्ट्र धरून) उपलब्ध आहे त्यावरून त्यामधील तफावत कमी होते आहे वा आता मुळीच नाही असे काहीही दिसत नाही. तेव्हा श्री. दाभोलकरांच्याजवळ यासंबंधीची काही खास माहिती असली पाहिजे! ती त्यांनी प्रसिद्ध केली तर फार उपकार होतील व त्यासंबंधी अधिक वास्तव समजूत होण्यास मदत होईल. अशी माहिती त्यांच्याकडे नसेल तर आहे या माहितीवरून ते अवास्तव विधान करीत आहेत असेच म्हणावे लागेल व त्यांचे त्यासंबंधीचे भाष्यही बारगळेल. अशी माहिती ते प्रसिद्ध करीपर्यंत माझ्यासारख्यांना उपलब्ध माहितीवरच आपली मते आधारणे क्रमप्राप्त आहे.

(६) मूल्यतुल्यतेच्या सूचकांकांच्या आधारवर्षासंबंधीचे श्री. दाभोलकरांच्या शंकांचे समाधान करण्याचे वास्तविक काहीच प्रयोजन नाही. पण ज्या अर्थशास्त्रांच्या नियमांचा ते वारंवार हवाला देतात त्यातील सूचकांकांसारख्या ज्ञापकांबद्दलच्या त्यांच्या शंका किती प्राथमिक पातळीवरच्या आहेत एवढे दाखविण्यासाठीच व त्यामुळे त्यांच्या अर्थशास्त्राच्या समजावर जो प्रकाश पडतो त्यासाठीच येथे त्याचा प्रपंच केला आहे.

वास्तविक पाहता ज्या मूल्यतुल्यतेची मी आनुषंगिक चर्चा केली त्या मूल्यतुल्यतेचा व परिव्यय-आधारित भाव देण्याचा युक्तिवादाचा फारसा संबंध नाही. परिव्यय-आधारित भावांच्या प्रश्नांची चर्चा करताना या प्रकारच्या मूल्यतुल्यतेचा उल्लेख होऊन घोटाळा होतो तो होऊ नये म्हणून मी त्यावर थोडे भाष्य केले. श्री. दाभोलकरांनी त्याकडे दुर्लक्ष केले असते तरी त्यांच्या युक्तिवादाला बाध येण्याचे काहीच कारण नव्हते. पण या मूल्यतुल्यतेचा उपयोग त्यांना प्रिय असलेल्या परिव्यय-आधारित भाव देण्याच्या मागणीला वाटाणअच्छा अक्षदा लावण्यासाठी होतो असा अंदेशा त्यांना आल्यामुळे त्यावर त्यांनी आपले टीकास्त्र सोडले आहे.

औद्योगिक मालाच्या व शेतीमालाच्या किंमतीतील मूल्यतुल्यता चर्चिताना मी जे सूचकांक वापरले त्याचे आधारवर्ष १९६०-६१ हे होते. याला श्री. दाभोलकरांनी आक्षेप घेतला आहे. "कोणत्याही दोन उत्पादनांच्या मूल्यतुल्यतेचा विचार अशा प्रकारे करताना मूल्यतुल्यतेसाठी संदर्भ म्हणून ज्या वर्षांचा सूचकांक घ्यावयाचा त्या वर्षी त्या दोन्ही उत्पादनांची समसूल्यता समान आर्थिक परिस्थितील असणे आवश्यक आहे. १९६०-६१ चे काय पण अद्यापही तशी परिस्थिती निर्माण झालेली नाही. . . त्यामुळे औद्योगिक मालाची व शेतीमालाची मूल्यतुल्यता त्यात असमान बाबींचा दुरुस्तांक (correction factor) मिळवल्याशिवाय अर्थशास्त्रीय होणार नाही." (पृ. ६१-६२).

अर्थशास्त्र शिकवणाऱ्यांना सूचकांक व निर्देशांकाचे प्रथम विवेचन करताना विद्यार्थ्यांकडून विचारला जाणारा व त्या कल्पनेवर त्यांच्याकडून विचारण्यात येणारा हा नेहमीचा प्रश्न आहे. सूचकांक हे कोणत्याही गोष्टीत झालेला बदल अचूकपणे मोजण्याचे कार्यदक्ष माप नव्हे. त्यातील सापेक्ष बदलांचे तो सूचन करतो व स्थूलमानाने त्या बदलांची व्याप्ती दाखवितो. बदलांच्या दिशेचे सापेक्ष सूचन हेच त्यात महत्त्वाचे असते. त्याच्या सापक्षतेपोटीच त्याच्या आधारवर्षाचा प्रश्न उद्भवतो. आदर्श असा आधार वा आधारवर्ष त्याला कधीच उपलब्ध होऊ शकत नाही. कारण सर्वांना मान्य होणारा वस्तुनिष्ठ आधार हा शास्त्रीय रीतीने सिद्ध करता येत नाही. त्यामुळे तो नेहमीच यादृच्छिक (arbitrary) असतो. श्री. दाभोलकरांची दुरुस्तांकाची कल्पनाही अशीच आहे. ते म्हणतात तो दुरुस्तांक तरी कसा ठरवावयाचा ? श्री. दाभोलकरांना मान्य असलेला दुरुस्तांक इतरांना मान्य होईलच असे नाही व तो वस्तुनिष्ठ आहे याचे गमक तरी कोणते मानावयाचे ? कोणताही सूचकांक तयार करताना या गोष्टी लक्षात घेऊनच आधारवर्ष शेवटी यादृच्छिकरणेच निवडले जाते. मी वापरलेल्या सूचकांकात ते १९६०-६१ होते याखेरीज दुसऱ्या वर्षातील किंमतीचाही आधारवर्ष म्हणून उपयोग करून घेता येईल. परंतु श्री. दाभोलकरांना तसे निराळे वर्षही सुचवावयाची सोय नाही कारण त्यांच्या मते १९३९ पासून भारतात शेतीच्याच किंमती, पुरवठा मागणी नियमाप्रमाणे ठरतच नाहीत. म्हणून त्या औद्योगिक मालांच्या किंमतीशी मूल्य-तुल्य नाहीत. त्यापूर्वीच्या किंमती घेतल्या तर त्या सध्याच्या काळापासून फारच पूर्वीच्या असल्यामुळे योग्य ठरणार नाहीत. म्हणून त्यांची दुरुस्तांकाची सूचना. पण वर म्हटल्याप्रमाणे हा दुरुस्तांक तरी कसा ठरवावयाचा ? यासंबंधी अनेक प्रश्न निर्माण होतील. सर्व सूचकांकांची ही मर्यादा लक्षात घेता पाहिजेतर कोणतेच सूचकांक मानू नयेत असे श्री. दाभोलकरांना सुचविता येईल. पण हा पर्याय त्यांना अडचणीत टाकील कारण उत्पादनपरिव्ययावर आधारित किंमती शेतमालाला दरवर्षी देण्यासाठी त्यात होणारा दरवर्षीचा

फेरफार (माझ्या मते वाढ; त्यांच्या मते घट) अजमवण्यासाठी तरी सूचकांक लागतीलच. त्याला आधारवर्ष कोणते घ्यावे, वगैरे प्रश्न पुन्हा उपस्थित होतीलच. असे प्रश्न सोडविण्यासाठी कोणतेही वस्तुनिष्ठ व समाधानकारक आदर्श अस्तित्वात नसतात. ते नेहमी यादृच्छिकच असतात हे विद्यार्थ्यांना प्राथमिक चर्चेतच विवेचून सांगावे लागते. श्री. दाभोलकरांची तक्रार व शंका याच स्तरावरची आहे एवढेच.

## संदर्भ व टीपा

१ श्री. दाभोलकरांच्या लेखातील उताऱ्यांना दिलेली पृष्ठसंख्या 'अर्थसंवाद' जुलै–सप्टेंबर १९८२ या अंकाची आहे.

२. जिज्ञासूंना ती "व्यष्टीय व समष्टीय अर्थशास्त्र की अर्थशास्त्रे ?" अर्थसंवाद, जानेवारी-मार्च १९७९. या लेखात आढळतील.

३. माझ्या मूळच्या लेखातील या मजकुरातील शब्द 'कोणत्या प्रदेशातली सरासरी वा इतर उत्पादन-परिव्ययास प्रमाण धरावयाचे' असे आहेत. मला 'सरासरीच' फक्त अभिप्रेत नाही हे यावरून स्पष्ट होईल. 'सरासरी' उत्पादनपरिव्ययास का प्रमाण धरता येत नाही हे या संदर्भात चर्चावयाचे असल्यामुळे हा खुलासा येथे करणे आवश्यक वाटते.

(४) या प्रक्रियेचे परिणाम सांगताना श्री. दाभोलकर सांगतात की "प्रत्यक्ष परिस्थितीवर ( अर्थात श्री. दाभोलकर कल्पित ! ) आधारित अशा या गोष्टी लक्षात घेतल्या की त्यांचा अर्थशास्त्रीय परिणाम प्रा. सोवनी यांनी भीती व्यक्त केली त्याप्रमाणे शेतकी उत्पादनाच्या किमती तिपटीने तरी वाढतील असा होण्याची शक्यता नाही असे आढळून येईल" (पृ. ६७).

■ ■

---

## लेखक परिचय

**वि. म. दांडेकर** : भूतपूर्व संचालक, गोखले अर्थशास्त्र संस्था, पुणे. भारतातील नामवंत अर्थतज्ज्ञ

**सी. पं. खेर** : गांधीचौक, धारवाड. अर्थशास्त्रीय विषयांवर बरेच लेखन

**यशवंत रारावीकर** : प्रमुख, व्यावसायिक अर्थशास्त्र विभाग, बिटको महाविद्यालय, नासिक रोड.

**शा. धों. कुलकर्णी** : प्रमुख, व्यावसायिक अर्थशास्त्र विभाग आणि उपप्राचार्य, बी. वाय. के कॉलेज ऑफ कॉमर्स, नाशिक.

**नी. वि. सोवनी** : कार्याध्यक्ष, मराठी अर्थशास्त्र परिषद

**श्रीनिवास खांदेवाले** : अर्थशास्त्र विभाग, नागपूर विद्यापीठ, नागपूर.

# प्रसामान्य नफा कोणत्या कार्याचे वेतन आहे ?

श्रीनिवास वि. खांदेवाले

अर्थशास्त्रातील वेतनाच्या सिद्धांतनामध्ये प्रसामान्य नफ्याच्या संकल्पनेचे स्थान फार महत्त्वाचे आहे. प्रसामान्य नफ्याच्या संदर्भात प्रस्तुत निबंधात वेतन, मोबदला, व परतावा हे शब्द समानार्थी वापरले आहेत. व्यष्टि विश्लेषणात या संकल्पनेचा उपयोग व्यवसायसंस्थेच्या उत्पादनाचा व किंमतीचा समतोल ठरविण्यासाठी होतो. तसेच पेढीच्या दीर्घकालीन स्थैतिक समतोलाच्या विश्लेषणामध्ये मिळणाऱ्या एकूण नफ्याचे आवश्यक कार्याधारित व अनावश्यक, शुद्ध कार्यावर न आधारलेला नफा यातील फरक स्पष्ट करण्यासाठी होतो. प्रसामान्य नफ्याच्या पातळीच्या आधारावर त्यापेक्षा कमी व जास्त अशा दोन पातळी दर्शवून त्यांच्या आधारे असे सूचविले जाते की, प्रत्यक्ष नफा प्रसामान्य नफ्याच्या पातळीपेक्षा अधिक असल्यास भांडवल व इतर उत्पादनसाधने जास्त नफ्याच्या उद्योगात शिरतील. उलट प्रत्यक्ष नफा कमी झाल्यास उत्पादनसाधने या उद्योगाकडून दूर जातील. अशा रीतीने प्रसामान्य नफ्याच्या वेतनावरून उत्पादनसाधनांचे फेरवाटप कसे होते हेही दर्शविले जाते. शेवटी असे म्हटले जाते की व्यवसायसंस्थांची संख्या, प्रत्येक पेढीचे उत्पादन, व उत्पादित वस्तूची किंमत या सगळ्यांचे आपसात समायोजन अशा रीतीने होते की जेणेकरून व्यवसायसंस्थेला प्रसामान्य नफ्याइतकेच वेतन मिळेल. हे वेतन किती असते याचे उत्तर असे दिले जाते की वेतनाच्या या पातळीला नवीन पेढ्यांना या उद्योगात शिरण्यास प्रोत्साहन मिळत नाही किंवा धंद्यात असलेल्या पेढ्यांना बाहेर पडावेसे वाटत नाही.[1] हे वेतन आवश्यकतेइतकेच आहे हे दर्शविण्यासाठी ते सरासरी परिव्ययात समाविष्ट केले जाते. प्रसामान्य नफा हे कोणत्या उत्पादनकारकाचे कोणत्या कार्यासाठी वेतन आहे, याची चर्चा पुढील परिच्छेदांमध्ये केली आहे.

## प्रसामान्य नफा कोणत्या कारकाचे वेतन आहे ?

प्रसामान्य नफा हे कोणत्या कारकाचे वेतन आहे हे उपलब्ध सैद्धांतिक लिखाणावरून पाहू गल्यास असे दिसते की याबाबतच्या सिद्धांतांमध्ये एकवाक्यता नाही. त्यात तीन प्रकारची मते आढळतात : (अ) काही अर्थशास्त्रज्ञ प्रसामान्य नफ्याला संयोजकाने गुंतविलेल्या स्वतःच्या भांडवलाचा परतावा मानतात. (ब) इतर काही मानतात की प्रसामान्य नफा हा संयोजकाच्या संघटन व व्यवस्थापन कार्याचे वेतन आहे. (क) काही अर्थशास्त्रज्ञ म्हणतात की तो भांडवलाचा परतावा अधिक संघटन व व्यवस्थापन कार्याचे वेतन असा संयुक्त मोबदला आहे.

एक-व्यक्ती संघटनेमध्ये (स्पर्धेच्या परिस्थितीत) जर असे गृहीत धरले की संघटकाजवळ स्वतःचे भांडवल नाही, तो केवळ स्वतःचे कार्य व कौशल्य यांचाच पुरवठा करतो तर अशा वेळी वर वर्णिलेल्या (ब) परिस्थितीप्रमाणे प्रसामान्य नफा हे संघटन व व्यवस्थापनाचे वेतन म्हणता येईल. जर त्या संघटकाने स्वतःचे भांडवलही गुंतविले तर तो (क) परिस्थितीनुसार भांडवल व व्यवस्थापनाचा संयुक्त मोबदला म्हटला जाईल. परंतु एक-व्यक्ती संघटनेत संघटकाने केवळ भांडवल गुंतविले आहे आणि प्रसामान्य नफा हा केवळ भांडवलाचा परतावा आहे अशी परिस्थिती

फारच क्वचित आढळते. परंतु बरेच अर्थशास्त्रज्ञ प्रसामान्य नफ्याला भांडवलाचा परतावा असे मानतात. उदाहरणार्थ फ्लेमिंग नफ्याची व्याख्या पुढीलप्रमाणे करतात. "पेढीच्या मालकीच्या भांडवली वस्तूंकरिता जो पैसा लागला त्याचा खर्च मजुरी, पगार आणि इतरांना देण्यात येणारा खंड यांच्याबरोबरच परिव्ययात समाविष्ट करावा म्हणूनच पेढीच्या मालकांच्या स्वतःच्या भांडवलावरील अपेक्षित व आवश्यक परताव्याचा दर येथे परिव्ययाचा एक भाग समजण्यात आला आहे. यालाच अर्थशास्त्रज्ञ थोडक्यात प्रसामान्य नफा असे म्हणतात". पुढे फ्लेमिंग म्हणतात, "प्रसामान्य नफा त्याला म्हणावे जो भांडवलाच्या खर्चाइतका असतो."[2] जोन रॉबिन्सन व जॉन इटवेल म्हणतात, "जेव्हा सगळे काही सुरळीत चालू असते तेव्हा यंत्र-सामग्रीच्या आयुष्यात **भांडवलाच्या गुंतवणुकीवर प्रसामान्य दराने शुद्ध नफा** मिळेल व भांडवलाचा खर्च भरून निघेल इतका आभास खंड मिळतो." ते **पुढे म्हणतात की,** " प्रसामान्य नफ्याचा दर कसा ठरतो याचे स्पष्टीकरण (मार्शल यांच्या लिखाणात) कोठेही आढळत नाही परंतु काही परिच्छेदांमध्ये तो दीर्घकालीन व्याजाच्या दराइतका समजला जातो. व्याजाचा दर हा दुसऱ्या संदर्भात तितिक्षेचा मोबदला असतो"[3] बोल्डिंग यांच्या मते "अर्थशास्त्रात परिव्ययाच्या संकल्पनेत प्रसामान्य नफ्याचा, म्हणजे भांडवलाच्या मालकाला त्या विशिष्ट उद्योगात भांडवल गुंतवून ठेवण्यासाठी उद्युक्त करण्यास जेवढी रक्कम आवश्यक आहे तिचा, समावेश केला जातो."[4] बायलास यांच्या मते "सरासरी परिव्यय हा किमतीइतका असतो आणि त्यामुळे पेढीला गुंतवणुकीवर केवळ प्रसामान्य परतावाच मिळतो. या बिंदूला प्रसामान्य नफ्याचा बिंदू असे म्हणतात."[5]

वरील परिभाषांमध्ये प्रसामान्य नफा हा भांडवलावरील प्रसामान्य परतावा आहे असे मानले गेले आहे. येथे प्रकर्षाने लक्षात घेणे आवश्यक आहे की या परिभाषांमध्ये व्यवस्थापन व संयोजनकार्याचा उल्लेख नाही व त्या कार्याच्या वेतनाचा संबंध प्रसामान्य नफ्याशी जोडलेला नाही. आता आपण अशा काही परिभाषांकडे वळू की ज्यामध्ये प्रसामान्य नफा हा केवळ संयोजकाच्या कार्याचा व कौशल्याचा मोबदला मानला गेला आहे.

मॅक्कोनेल सुचवितात की "**काही वेळा** संयोजकाचे उद्योजनकौशल्य विशिष्ट धंद्यात गुंतवून ठेवण्यासाठी जे किमान वेतन द्यावे लागते त्याला प्रसामान्य नफा म्हणतात....हे किमान किंवा सामान्य वेतन मिळाले नाही तर उद्योजक आपले श्रम या धंद्यातून काढून घेईल व पर्यायी उद्योगात लावील किंवा ती व्यक्ती उद्योजक न होता श्रमिक होणे पत्करील."[6] (जाड ठसा माझा). बोमॉल या संकल्पनेकडे वेगळ्या दृष्टिकोणातून पाहतात व एका वेगळ्याच गृहितकाचा अंगीकार करतात. त्यांच्या मते "**एखादा लहान उद्योजक सुखवस्तु जीवन जगण्याइतके उत्पन्न मिळवीत असेल**. परंतु हे उत्पन्न त्याने इतरांसाठी नोकरी केल्यास मिळणारे वेतन व त्याने त्याचे भांडवल इतरत्र गुंतविल्यास मिळणारा परतावा यापेक्षा जास्त नसल्यास तो केवळ आपल्या श्रमाची मजुरी व भांडवलावरील व्याज मिळवितो."[7] (जाड ठसा माझा). या व्याख्येतून भांडवलावरील व्याज तात्पुरते बाजूला सारल्यास संयोजकाचे उत्पन्न हा केवळ संयोजनकार्याचा मोबदला मानला गेलेला आहे असे म्हणता येईल. वरील व्याख्येत लहान उद्योजक व सुखवस्तु जीवनस्तर या संकल्पनांचे स्पष्टीकरण दिलेले नाही.

वरील दोन प्रकारच्या व्याख्यांवरून दोन प्रश्न निर्माण होतात. पहिला प्रश्न असा की जोन रॉबिन्सन, बोल्डिंग, बायलास इत्यादी अर्थशास्त्रज्ञ म्हणतात त्यानुसार प्रसामान्य नफा हा केवळ भांडवलावरील परतावा आहे की संयोजनकार्याचा मोबदला आहे ? दुसरा प्रश्न असा की तो विशिष्ट दर आहे की ती विशिष्ट रक्कम आहे? बोमॉल यांनी सुखवस्तु जीवनस्तर हा शब्दप्रयोग केल्यामुळे हा प्रश्न निर्माण होतो.

आता आपण अल्फ्रेड मार्शल व पॉल सॅम्युअल्सन यांनी केलेल्या व्याख्या विचारात घेऊ. या दोन्ही व्याख्यांमध्ये प्रसामान्य नफा हा संयोजन-श्रम व भांडवल या दोहोंचे संयुक्त वेतन अशी (थोड्याफार फरकाने) भूमिका आहे.

मार्शल म्हणतात की (स्पर्धेच्या परिस्थितीतील) दीर्घकाळातील नफा हा "भांडवलाची प्रसामान्य पुरवठा-किंमत अधिक उद्योग व्यवस्थापनासाठी लागणाऱ्या क्षमता व शक्तींची किंमत आणि ज्या संघटनप्रयत्नांमुळे व्यवस्थापन कौशल्य व आवश्यक भांडवल एकत्र आणले जाते त्याची प्रसामान्य पुरवठा-किंमत यापासून फारसा विचलित होऊ शकत नाही."[8] या ठिकाणी मार्शल यांनी व्यवस्थापन व संघटन ही दोन कार्ये वेगळी मानली आहेत हे लक्षात घेण्यासारखे आहे. कारण पुढच्याच काही परिच्छेदांमध्ये ते भांडवलावरील व्याज वेगळे करून बाकीच्या मोबदल्याचा

व्यवस्थापन-वेतन असा उल्लेख करतात. मार्शल यांची हीच परिभाषा आज रूढ आहे; हेही लक्षात घेणे आवश्यक आहे की तेभांडवलाला मिळणाऱ्या मोबदल्याचा उल्लेख दर म्हणून करतात परंतु व्यवस्थापनाच्या मोबदल्याचा उल्लेख उत्पन्न असा करतात. ( The normal **earnings of mangement** are of course high in proportion to the capital, and therefore the **rate of profits per annum on capital** is high when the work of. management is heavy in proportion to capital."[९] '(जाड ठसा माझा) ) यामध्ये प्रसामान्य नफा हे व्यवस्थापन व भांडवल यांचा संयुक्त मोबदला आहे हे ध्वनित होते. येथे संघटन व व्यवस्थापन या दोन कार्यापैकी जर व्यवस्थापनाचाच उल्लेख केलेला आहे तर मग संघटनकार्याचा मोबदला कोणता ? उद्योगात व्यवस्थापक पगारी असू शकतात परंतु संघटक पगारी असणे कठीण आहे. म्हणून दोन कार्यांच्या स्वतंत्र वेतनाचा प्रश्न निर्माण होतो. पॉल सॅम्युअल्सनसुद्धा म्हणतात "की जर (प) हा (ब) या समबिंदूपाशी असेल तर तुमचा महत्तम नफा (तुमचे श्रम व भांडवल यावरील परताव्यासह) शून्य असतो."[१०]

प्रसामान्य नफ्याचा दर आणि रक्कम यातील गोंधळ थोडा वाढतो तो मार्शल यांच्या एका वक्तव्यामुळे ते म्हणतात की "गुंतविलेल्या भांडवलावरील वार्षिक नफ्याचा दर आणि विक्रीवरील (turnover : पणनावर्त) नफ्याचा दर यामध्ये भेद करणे आवश्यक आहे."[११] हे दोन भिन्न असतात. मार्शल यांच्यामते मध्ययुगीन आर्थिक इतिहासाबद्दल (विशेषतः नफ्याच्या संदर्भात) जे लिहिले गेले आहे त्यात नफ्याच्या या दोन दरांमधील फरक लक्षात न ठेवल्यामुळे त्या लिखाणाचे महत्त्व कमी होते. त्यांच्या मते उद्योगपती जेव्हा प्रसामान्य नफ्याविषयी बोलतात तेव्हा ते पणनावर्तावरील दराविषयी बोलत असतात की भांडवलावरील दर वर्षाच्या नफ्याच्या विषयी बोलत असतात हे त्यांनाही स्पष्ट माहित नसते.[१२]

वरील उदाहरणांवरून व्यवसायसंस्थेचे उत्पादन, किंमत इत्यादींचा समतोल-बिंदू काटेकोरपणे दर्शविण्या-साठी प्रसामान्य नफा हे वेतन कोणत्या कार्यासाठी, कोणत्या स्वरूपात (दर किंवा रक्कम) दिले जाते व ते निश्चितपणे कसे ठरते हे सिद्धांतामध्ये ठरणे आवश्यक आहे आणि त्यासाठी प्रसामान्य नफ्याची योग्य परिभाषा करणे आवश्यक आहे हे लक्षात येईल.

---

## संदर्भ व टीपा

१) रॉबिन्सन, जोन, इकॉनॉमिक्स ऑफ इम्परफेक्ट कॉम्पीटिशन, मॅकमिलन, १९३३ पृ. ९२ लायभास्की, एच. एच., दि नेचर ऑफ प्राईस थिअरी, दुसरे मुद्रण, दि डोरसी प्रेस, १९६३, पृ. १५४.

२) फ्लेमिंग, एम., इंट्रोडक्शन टू इकॉनॉमिक अनॅलिसीस, जॉर्ज ॲलन ॲन्ड अनविन, १९६९, पृ. ११६ :

The cost of finance for the capital goods owned by a firm must, therefore, be included in cost, as well as the payments of wages, salaries, and rents to other people. That is why the rate of return expected and required by the firm's owners on their own financing, is here treated as an element of cost. For brevity, economists usually refer to it as "normal profits".

३) रॉबिन्सन, जोन व इटवेल, जॉन, ॲन इंट्रोडक्शन टू मॉडर्न इकॉनॉमिक्स, टाटा मॅकग्रॉहिल, नवी दिल्ली, १९७४, पृ. ४२–४३ :

"When everything is working out normally, the quasi-rents received by a plant over its life are sufficient to cover the capital invested in it, alongwith a normal rate of net profit on the cost of investment.

There is no explanation of what determines the normal rate of profit though in some passages, it seems to be identified with the long term rate of interest, which, in another context, is the ' reward of waiting'"

४) बोल्डिंग, के. ई., इकॉनॉमिक ॲनलिसिस्, खंड १ (मायक्रोइकॉनॉमिक् ॲनलिसिस), चवथी आवृत्ती, हार्पर ॲंड रो पब्लिशर्स, न्यूयॉर्क, १९६६, पृ. २५०. :

(" The economist's concept of cost therefore includes a normal profit, that is, that sum which is just necessary to pay to the owner of capital employed in order to persuade him to keep his capital in this particular occupation". )

५) बायलास, मायक्रोइकॉनॉमिक थिअरी :– ए ग्राफिकल ॲनलिसिस्, मॅकग्रॉहिल कं. पृ. १३५.:

"...average cost is equal to price, and so the firm is making only a normal return on investment. This point is called the point of normal profits".

६) मॅक्कोनेल, इकॉनॉमिक्स, चवथी आवृत्ती, कोगाकुशा कं. लि., १९६९, पृ. ४४६.:

"The minimum payment required to keep Brook's entrerpreneurial talents engaged in this enterprise is sometimes called a normal profit. As is true of implicit rent or implicit wages, this normal return for the performing of entrepreneurial function is an implicit cost. If this minimum, or normal, return is not realised, the entrepreneur will withdraw his efforts from this line of production and reallocate them to some alternative line of production. Or the individual may cease being an entrepreneur in favour of being a labourer."

७) बोमॉल, डब्ल्यु. जे., इकॉनॉमिक थिअरी ॲंड ऑपरेशन्स अनॅलिसिस, दुसरी आवृत्ती, प्रेन्टीस हॉल ऑफ इंडिया, नवी दिल्ली, १९७०, पृ. ३१६ :

"A small businessman may earn a comfortable living. But if his earnings are no more than he could get by spending the same amount of time working for someone else plus the return he could get by investing his money elsewhere, the economist states that he is receiving just the wages for his labour and interest on his capital.

८) मार्शल, अल्फ्रेड, प्रिन्सिपल्स ऑफ इकॉनामिक्स, आठवी आवृत्ती, मॅकमिलन १९५९ पृ. ५०३ :

"......that share of the normal expenses of production of any commodity which is commonly classed as prorits, is so controlled on every side by the action of the principle of substitution, that it cannot long diverge from the normal supply price of the ability and energy required for managing the business, and lastly the normal supply price of that organization by which the appropriate business ability and requisite capital are brought together."

९) मार्शल, उपरोक्त, पृ. ५०८.

१०) सॅम्युअल्सन, पॉल, इकॉनॉमिक्स, आठवी आवृत्ती, मॅक्ग्रॉहिल, १९७०, पृ. ४३३.

११) १२) मार्शल, पूर्वोल्लेखित, पृ. ५१३ वरील तळटीप क्र. १.

■ ■

# मराठी अर्थशास्त्र परिषद

## आजीव सभासद

१) डॉ. रवीन्द्र स. सबनीस
ए १४, आंबेकर नगर, परळ,
मुंबई ४०० ०१२

२) श्री. संतोष तेंडुलकर
६०५ परिमल, घाटकोपर (पूर्व),
मुंबई ४०० ०७७

३) प्रा. नी. वि. सोवनी
१३०७ सदाशिव पेठ,
पुणे ४११ ०३०

४) डॉ. बी. आर. रायरीकर
लाला लजपतराय वाणिज्य आणि
अर्थशास्त्र महाविद्यालय, मुंबई ४०० ०३४

५) प्रा. प्रभुराम जोशी
'कविता कुंज', प्लॉट नं. १९,
तिसरा रस्ता,
गुरु गुरुनानक रोड, वांद्रा (प.)
मुंबई ४०० ०५०

६) श्री. गोविंद तळवलकर
राम महाल, ५ वा मजला,
डी. व्ही. रोड, चर्चगेट,
मुंबई ४०० ०२०

७) डॉ. विष्णू विनायक बोरकर
अर्थशास्त्र विभाग,
मराठवाडा विद्यापीठ,
औरंगाबाद ४३१ ००४

८) श्री. पांडुरंग वासुदेव गाडगीळ
२२ 'वसंत', कार्टर रोड,
खार (दांडा),
मुंबई ४०० ०५२

९) श्री. विनायक राजगुरू
पौलामी, ४७३।२५ ए, गुलटेकडी,
पुणे ४११ ००९

१०) श्री. यशवंत सखाराम पंडित
७६९।१ डेक्कन जिमखाना,
पुणे ४११ ००४

११) प्रा. सुरेश धोंडोपंत तेंडुलकर
प्रोफेसर ऑफ इकॉनॉमिक्स,
दिल्ली स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स,
युनिव्हर्सिटी ऑफ दिल्ली,
दिल्ली ११० ००७

१२) प्रा. शामराव नानासाहेब यादव
धनंजयराव गाडगीळ वाणिज्य महाविद्यालय,
सातारा ४१५ ००२

१३) श्री. शशिकांत मनोहर जावडेकर
'सुवास्तु', ५२८, शनिवार पेठ, मेहुणपुरा,
पुणे ४११ ०३०

१४) डॉ. विजय लक्ष्मण केळकर
इकॉनॉमिक अॅडव्हायझर,
भारत सरकार, वाणिज्य मंत्रालय,
नवी दिल्ली ११० ००७

१५) प्रा. सुब्रय्या पंढरी नाईक
अ-७, प्रशांत १३९, ५ वी मार्ग,
माहिम, मुंबई ४०० ०१६

१६) श्री. विवेक गोविंद लिमये
'नीलमणी', डॉ. म. ब. राऊत मार्ग,
३२ शिवाजी पार्क,
मुंबई ४०० ०२८

१७) डॉ. वसंत प्रभाकर पेठे
व्हीला चांदणी,
दशभुज गणेश सहकारी संस्था,
पौड फाट्याच्या अलिकडे, कर्वे रस्ता,
पुणे ४११ ००४

१८) प्रा. शरद शंकर जोशी
५५ शिवाजी हौसिंग सोसायटी,
शिवाजी नगर, पुणे ४११ ०१६

१९) प्रा. परशुराम विनायक पटवर्धन
'सरस्वती' ३८।४ एरंडवणे,
पुणे ४११ ००४

२०) डॉ. आनंद शांताराम नाडकर्णी
अ – ३ प्रबोधन को-ऑप. हौसिंग
सोसायटी, ६१/अ, ९-१० एरंडवणे
पुणे ४११ ००४

२१) श्री. रावजी गुलाबचंद गांधी
'पंचशील', प्लॉट क्र. १०, रोड
क्र. १०, जुहू, मुंबई ४०० ०४९

२२) डॉ. राजाराम गोपाळ पैठणकर
बी–४, अनिकेत सोसायटी
बिबवेवाडी रस्ता,
पुणे ४११ ००९

२३) प्रा. दे. अ. दाभोलकर
'समन्वय'
क्षिप्रा सहकारी वसाहत,
२५/५/८, कर्वे नगर,
पुणे ४११ ०२९

२४) प्रा. गंगाधर गोपाळ गाडगीळ
४ अभंग, साहित्य सहवास,
वांद्रे (पूर्व),
मुंबई ४०० ०५१

२५) प्रा. जीवराज लुभचंद गांधी
२३ स्टाफ क्वार्टर्स,
फर्गसन महाविद्यालय परिसर,
पुणे ४११ ००४

२६) प्रा. (सौ.) चंद्रा के. दलाया
द्वारा एस. ए. उल्लल,
१२४/७ ए,
एरंडवणे, पुणे ४११ ००४

२७) प्रा. रमेश गजानन पानसे
सोनोरी, ३६ वरई,
ठाणे ४०० ६०१

२८) श्री. विश्वनाथ विनायक देशपांडे
मॅनेजमेंट रीसर्च सर्व्हिसेस,
नॅशनल हाऊस, ६ टु लोक रोड,
मुंबई ४०० ०३९

२९) प्रा. (श्रीमती) मीना श्रीकृष्ण आपटे
२५/३५ 'बी' खासबाग,
कोल्हापूर ४१६ ००२

३०) प्रा. मधुकर दत्तात्रेय देशपांडे
३ प्रतिभानगर
कोल्हापूर ४१६ ००२

३१) डॉ. स. ह. देशपांडे
कृष्णकुंज,
१९–बी/ए, महंत रोड (विस्तारीत),
विलेपार्ले (पूर्व),
मुंबई ४०० ०५७

३२) प्रा. प्रमोद ठोंबरे,
द नेहरू इन्स्टिटयूट ऑफ सोशल स्टडीज,
टिळक महाराष्ट्र विद्यापीठ,
पुणे ४११ ०३७

३३) प्रा. आण्णासाहेब नारायणराव जोंधळे
लोकमान्य हौसिंग कॉलनी,
नंदूरबार (जि. धुळे),
४२५ ४१२

३४) प्रा. गणपती लक्ष्मण अभ्यंकर
द्वारा श्री. चंद्रकांत म. कोल्हटकर
५१३ शास्त्री हॉल, नवी इमारत,
ग्रँट रोड, मुंबई ४०० ००७

३५) डॉ. वि. म. दांडेकर
८२०/२, शिवाजीनगर,
पुणे ४११ ००४

३६) डॉ. नरहर क. कुलकर्णी
चिंतामणराव कॉलेज ऑफ कॉमर्स
पोस्ट ऑफिस, विलिंग्डन कॉलेज,
सांगली ४१६ ४१६

३७) डॉ. नीलकंठ भालचंद्र सप्रे
प्राध्यापक निवास, वाडिया कॉलेज,
पुणे ४११ ००१

३८) श्री. बिंदुमाधव वाकणकर
४ सी/१६, बाज अपार्टमेंट,
साईबाबा नगर,
बोरीवली (प.) ४०० ०९२

३९) डॉ. सुकदेव दामोदर तुपे
प्रपाठक अर्थशास्त्र विभाग,
मराठवाडा विद्यापीठ,
औरंगाबाद ४३१ ००४

४०) सौ. कुमुदिनी चंद्रकांत देशपांडे
दीपज्योती, सरस्वतीनगर,
देवपूर, धुळे ४२४ ००२

४१) प्रा. कुमुदिनी दांडेकर
८२०/२ शिवाजीनगर,
पुणे ४११००४

४२) प्रा. लक्ष्मण गंगाराम जाधव
६०१ कसबा पेठ,
पुणे ४११ ०११

४३) प्रा. विठ्ठल महादेव रानडे
गोगटे —जोगळेकर कॉलेज,
रत्नागिरी ४१५ ६१२

४४) प्रा. (सौ.) वत्सला प्रेमचंद सरवाल
आर. बी. ४११७, रेल्वे ऑफिसर्स फ्लॅट,
लोअर निस्बन रोड,
माजगाव, मुंबई ४०० ०१०

४५) डॉ. सुरेश्वर गोस्वामी
अर्थशास्त्र विभाग,
मुंबई विद्यापीठ,
विद्यानगरी, मुंबई ४०० ०९८

४६) डॉ. भालचंद्र रामचंद्र हेकणे
ज्ञानदेवी साहित्य सहवास,
वांद्रे (पूर्व), मुंबई ४०० ०५१

४७) डॉ. सुधा सोवाणी
अर्थशास्त्र विभाग
एस्. एन्. डी. टी. कॉलेज फॉर वुमेन,
मुंबई ४०० ०२०

४८) श्री. अशोक शंकर दांडेकर
फ्लॅट नं. ४, 'गीत गुंजन',
न्यु पाटकर लॉजच्या मागे,
ऑफ टर्नर रोड (विस्तार),
वांद्रे (पश्चिम), मुंबई ४०० ०५०

४९) प्रा. अशोक गजानन मोडक
दातार सदन,
वल्लभभाई पटेल मार्ग,
जोशी प्रशालेजवळ,
डोंबिवली.

५०) डॉ. हरि कृष्ण परांजपे
३ सोनोली, प्रभात रोड,
६ वी गल्ली
पुणे ४११ ००४

५१) प्रा. विनायक रामचंद्र शिरगुरकर
निवास क्र. ५,
सर परशुरामभाऊ महाविद्यालय आवार,
टिळक रोड,
पुणे – ४११ ०३०

५२) प्रा. दिनकर बोरीकर
रेक्टर ब्लॉक,
सरस्वती भुवन, बॉईज होस्टेल,
औरंगाबाद ४३१ ००१

५३) प्रा. नारायण अनंत मावळंकर
६ विद्याविहार,
पुणे ४११ ०१६

५४) प्राचार्य वसंत कृष्ण नुलकर
९३ सदाशिव पेठ,
पुणे ४११ ०३०

५५) श्री. मधुकर अनंत बाकरे
'सारनाथ' नं. ८२/९२,
५९ बी, सोफिया कॉलेज लेन,
वॉर्डन रोड, मुंबई ४०० ०२६

५६) प्राचार्य माणिकराव तुकाराम पवार
१००/८७५ (HIG)
महर्षि नगर,
पुणे ४११ ०३७

५७) प्रा. वि. सी. जोशी
२ समाधान कॉलनी,
सेशन कोर्टामागे,
औरंगाबाद ४३१ ००१

५८) प्रा. सुहास रामचंद्र जोगळेकर,
सी – ३, मधुवन,
फर्गसन महाविद्यालय पथ,
पुणे ४११ ००४

५९) प्राचार्य एम्. व्ही. कौण्डिन्य
संगमनेर महाविद्यालय,
संगमनेर, जि. अहमदनगर,
४२२ ६०५

६०) डॉ. मो. वा. तथा वसंत पटवर्धन
'प्रद्युम्न', सुभाष रोड ७वा रस्ता
७७३।३।१ एरंडवणा
पुणे – ४११ ००४

६१) प्रा. मुकुंद सिद्धेश्वर महाजन
'गीतगोविंद,'
२३० सदाशिव पेठ,
पुणे ४११ ०३०

६२) डॉ. पी. आर. ब्रह्मानंद
संचालक, युनिव्हर्सिटी डिपार्टमेंट
ऑफ इकॉनॉमिक्स,
विद्यानगरी (कालिना परिसर),
सांताक्रूझ (पूर्व)
मुंबई ४०० ०९८

६३) श्री. वामनराव चोरघडे
धरमपेठ (विस्तारित), नागपूर,
पिन ४४० ००२

६४) प्रा. खाँजासाहेब घुडुलाल पठाण
१०५० खणभाग, सांगली ४१६ ४१६

६५) प्रा. जयकुमार फाझगौडा पाटील
६८७ हुक्केरी वाडा,
सांगली ४१६ ४१६

६६) प्रा. संतोष रामचंद्र दास्ताने
१३ अभंग 'ए,' मुंबई-पुणे रस्ता
पुणे ४११ ००३

६७) डॉ. श्रीधर आत्माराम देशपांडे
४८१, प्रोफेसर्स कॉलनी, हनुमाननगर,
नागपूर ४४० ००९

६८) डॉ. श्रीनिवास लक्ष्मण लोकरे
३१ एम्. ए. लक्ष्मीनगर,
नागपूर ४४० ०२२.

६९) प्रा. मोरेश्वर सदाशिव भावे
प्राध्यापक निवास,
मु. जे. महाविद्यालय आवार,
जळगाव ४२५ ००१

७०) डॉ. दि. ब. केरूर
स. प. महाविद्यालय,
पुणे ४११ ०३०

७१) श्री. सी. पं. खेर
गांधी चौक, धारवाड,
पिन ५८० ००१

७२) श्रीमती मंगला जयवंत मसुरकर
अ – २ यशोधन,
दीक्षित रस्ता (विस्तारीत),
विलेपार्ले (पूर्व), मुंबई ४०० ०५७

७३) प्रा. विजय प्रभाकर परांजपे
९२/२ 'दुर्गा', एरंडवणा,
पुणे ४११ ००४

७४) सौ. विद्या केशव साठे
४८१ ब ९, 'दवबिंदु',
श्रीकृष्ण सोसायटी, पर्वतीदर्शन,
पुणे ४११ ००९

७५) सौ. रेखा दिलीप आपटे
८९२ सदाशिव पेठ,
पुणे ४११ ०३०

७६) सौ. विद्या रत्नाकर कुलकर्णी
१४ रामदूत सोसायटी,
४९८/अ नारायण पेठ,
पुणे ४११ ०३०

७७) सौ. अमरजा नेरूरकर
९ लक्ष्मी बिल्डिंग,
बाभई बोरिवली (पश्चिम),
मुंबई ४०० ०९२

७८) डॉ. विठ्ठलराव बापुराव घुगे
अर्थशास्त्र विभाग प्रमुख,
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर ४१६ ००४

७९) प्रा. मनोहर दत्तात्रय पाध्ये
अर्थशास्त्र विभाग,
मराठवाडा विद्यापीठ,
औरंगाबाद, ४३१ ००४

८०) प्रा. सदानंद वर्दे
'कपिलवस्तु'
बांद्रा (प.), मुंबई ४०० ०५०

८१) प्राध्यापिका कृष्णा भारद्वाज
४ न्यू कॅम्पस्,
जवाहरलाल नेहरू युनिव्हर्सिटी,
नवी दिल्ली ११० ०६७

८२) प्रा. जयंत सदाशिव राईलकर
२/१७ सिद्धार्थ नगर (४),
गोरेगाव, मुंबई ४०० ०६२

८३) प्रा. वासुदेव यशवंत कोल्हटकर
३६ वेलणकर नगर,
पुणे ४११ ००९

८४) प्रा. वसंतराव तातोबा चौगले
'सतीश बंगला', मार्केट यार्ड समोर,
दक्षिण शिवाजी नगर,
सांगली ४१६ ४१६

८५) प्रा. भगवान सोनाजीराव म्हस्के
डॉ. ठोकरट ह्यांचा बंगला,
विद्युत कॉलनी, बेगमपुरा,
औरंगाबाद ४३१ ००४

८६) डॉ. गि. सो. कल्याणकर
प्रपाठक, अर्थशास्त्र विभाग,
मराठवाडा विद्यापीठ,
औरंगाबाद ४३१ ००४

८७) प्रा. चंद्रकांत केळकर
१० 'प्रल्हाद', आरे रोड,
गोरेगाव (पूर्व),
मुंबई ४०० ०६३

८८) प्रा. एस्. डी. बाळ
द्वारा एस्. एन्. डी. टी. विद्यापीठ,
१ नाथीबाई ठाकरसी रस्ता,
मुंबई ४०० ०२०

८९) प्रा. रामराव कृष्णा शिंदे
७ प्राध्यापक निवास,
छत्रपती शिवाजी महाविद्यालय,
सातारा कॅम्प ४१५ ००२

९०) डॉ. श्यामसुंदर हरीदासजी जाजनधिया
प्राचार्य, जी. एस्. विज्ञान,
कला व वाणिज्य महाविद्यालय,
खामगाव ४४४ ३०३

९१) डॉ. सौ. प्रिया वि. मुतालिक देसाई
ब्रोचा हाऊस टेरेस फ्लॅट,
गार्डन रोड, मुंबई ४०० ०३९

९२) प्रा. सी. टी. येवलेकर,
रुपारेल महाविद्यालय,
सेनापती बापट मार्ग,
मुंबई ४०० ०१६

९३) प्रा. नारायण शंकर आंबर्डेकर,
अर्थशास्त्र व राज्यशास्त्र प्रमुख,
टीचर्स होस्टेल,
विलिंग्डन महाविद्यालय,
सांगली ४१६ ४१६

९४) डॉ. प्रभाकर रघुनाथ जोशी,
२४ परमेश्वर कृपा,
महात्मा गांधी रोड,
घाटकोपर,
मुंबई ४०० ०८६

९५) डॉ. गोविंद जिवाजी खुदानपूर
९१७/१९ एफ, गणेशवाडी,
पुणे ४११ ००४

९६) डॉ. जी. व्ही. कामत हेलेकर
फ्लॅट नं. १ गुरुनाथ, RUADOVREM
पणजी, गोवा – ५०३ ००१

९७) प्रा. जी. एम्. राजर्षि
कुलसचिव, मुंबई विद्यापीठ,
क्लब हाऊस, चर्चगेट,
मुंबई ४०० ०२०

९८) प्रा. दिनकर हरी महाजन
रेक्टर बंगला,
मुळजी जेठा महाविद्यालय,
जळगाव ४२५ ००१

९९) प्रा. रघुनाथ शांताराम ओक,
पळशीकर बिल्डिंग,
नवग्रही, धुळे ४२५ ००१

१००) प्रा. रामकृष्ण दयाराम राणे
रेक्टर, मुलींचे वसतिगृह,
मुळजी जेठा महाविद्यालय,
जळगाव ४२५ ००१

१०१) प्रा. या. शि. महाजन,
'सरोज' ७ प्रतापनगर,
जळगाव ४२५ ००१

१०२) डॉ. रंगनाथ भारद्वाज,
अर्थशास्त्र विभाग,
मुंबई विद्यापीठ,
विद्यानगरी, कालिना,
मुंबई ४०० ०९८

१०३) प्राचार्य जे. जे. जोशी
कला आणि वाणिज्य
महाविद्यालय, धरणगाव
जिल्हा जळगाव
पिन ४२५ १०५

१०४) डॉ. वसंत मार्तंड जाखडे,
फ्लॅट नं. ११, तरंगिणी
अपार्टमेंटस्, बॉम्बे डाईंग इस्टेट,
वीर सावरकर मार्ग,
प्रभादेवी, मुंबई ४०० ०२५

१०५) श्री. ए. डी. भोरकर
दिनकर को. ऑप. हौसिंग सोसायटी,
ब्लॉक नं. ४, भागोजी कीर मार्ग,
माहिम, मुंबई ४०० ०१६

१०६) डॉ. अरुण प्रभाकर कुलकर्णी
८०८, कला-वसंत सोसायटी,
१५ वी गल्ली, भांडारकर मार्ग
पुणे, ४११ ००४

१०७) प्रा. अशोक देवीदास गाढवे
१६०२ डॉ. राजेन्द्रप्रसाद रोड,
जुना गुरांचा बाजार,
मु. पोस्ट – बार्शी,
जि. सोलापूर ४१३ ४०१

१०८) डॉ. भ. ना. दातार
ई–४ प्रथमेश को. ऑप. हौसिंग सोसायटी,
ओल्ड बॉम्बे डाईंग कंपाऊंड,
प्रभादेवी, मुंबई ४०० ०२५

१०९) डॉ. शं. के. मोडक
अर्थशास्त्र विभाग,
सिडनहॅम कॉलेज ऑफ कॉमर्स,
ॲन्ड इकॉनॉमिक्स,
बी. रोड, चर्चगेट,
मुंबई ४०० ०२०

११०) श्री. लिंबाजी मनोहरपंत पालके
भावना निवास, पहिला मजला,
पळसुले ह्यांचा बंगला, डॉ. नानिवडेकर
हॉस्पिटलच्या पाठीमागे,
लोकमान्य रोड, पालघर, ४०१४०४

१११) प्रा. वसंत श्री. पटवर्धन
गोखले अर्थशास्त्र संस्था,
पुणे ४११ ००४

११२) डॉ. रवींद्र रा. दोशी
अर्थशास्त्र विभाग,
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर ४१६ ००४

११३) प्रा. शि. ना. माने
अर्थशास्त्र विभाग,
धनंजयराव गाडगीळ महाविद्यालय,
सातारा ४१५ ००२

११४) डॉ. श्री. वि. खांदेवाले
'गुलशन,' १३ नवनिर्माण सोसायटी,
प्रतापनगर,
नागपूर ४४० ०२२

११५) प्रा. पांडुरंग जनार्दन ताम्हनकर
ताम्हनकर बंगला,
एस्. टी. स्टँडजवळ,
सांगली ४१६ ४१६

११६) प्रा. जगन्नाथ शामराव पाटील
मु. पो. कुमठे, तालुका-तासगाव,
जिल्हा सांगली,
पिन ४१६ ३०६

११७) डॉ. बी. डी. कुलकर्णी,
सर्व्हे नं. ८६, नलवडे चाळ,
आझादवाडी, कोथरूड,
पुणे – ४११ ०२९

११८) प्रा. सौ. सरल जुगादे
२८०, रामनगर,
नागपूर ४४० ०१०

११९) प्रा. श्रीरंग बळीराम झोपे
न्यू इंग्लिश स्कूलजवळ,
हुसनअल्ली फ्लॅट, जामनेर रस्ता,
भुसावळ, जिल्हा – जळगाव,
पिन ४२५ २०१

१२०) प्रा. अविनाश य. जोशी
कला–वसंत सोसायटी,
भांडारकर रस्ता,
पुणे – ४११ ००४

१२१) प्रा. गंगाधर रघुनाथ गोखले
१४४० शुक्रवार पेठ, शेवडे बोळ
पुणे ४११ ००२

१२२) प्रा. मनोहर सिद्धेश्वर सुभेदार
२ शारदा सोसायटी,
कर्वे रोड, घंटाळी, ठाणे
ठाणे ४०० ६०२

१६२) प्रा. (सौ.) सुनिता मनोहर चिपळोणकर
१८।१ पोस्टल कॉलनी,
भागीरथी भुवन,
चेंबूर, मुंबई ४०० ०७१

१६३) प्रा. मुरलीधर प्रल्हाद कुलकर्णी
५४५, भास्कर भवन,
हेरंब (थेर) सेक्शन,
शिव मंदिर रोड,
अंबरनाथ (जिल्हा ठाणे)
पिन ४२१ ५०१

१६४) प्रा. (सौ.) रेखा तालमकी
सी।६, 'शीतल',
बँक ऑफ इंडिया स्टाफ सोसायटी,
रामनगर, ऑफ एस्. व्ही. रोड,
बोरिवली (प.)
मुंबई ४०० ०९२

■ ■

## मराठी अर्थशास्त्र परिषदेची प्रकाशने

**नी. वि. सोवनी** : अर्थसिद्धांत, आणखी चिकित्सक निबंध (१९७७), पृष्ठे २२६, किंमत रु. २०. (एकमेव विक्रेते : द कोल्हापूर रायटर्स को-ऑपरेटिव्ह सोसायटी लि. ४०–४९–इ, शाहूपुरी, सहावी गल्ली, कोल्हापूर १).

**मो. वि. भाटवडेकर** : शिक्षणाचे अर्थशास्त्र (१९७८), पृष्ठे १७८, किंमत रुपये २०. (वितरण व्यवस्था : व्हीनस प्रकाशन, तपश्चर्या, ३८१ क, शनिवार पेठ, पुणे ४११ ०३०).

**भ. ग. बापट** : आंतरराष्ट्रीय व्यापार : सिद्धांत आणि धोरण (१९८२), पृष्ठे ३३३, किंमत रु. ५०. (वितरक : कॉन्टिनेंटल प्रकाशन, विजयनगर कॉलनी, पुणे ४११ ०३०).

## अर्थसंवाद : मागील वर्षांचे अंक

एप्रिल १९७७ पासून अर्थसंवादच्या प्रकाशनास प्रारंभ झाला. मागील वर्षांच्या अंकांच्या मर्यादित प्रती शिल्लक आहेत. ज्यांना –विशेषतः ज्या ग्रंथालयांना – त्या विकत हव्या असतील त्यांनी मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या मुंबई कार्यालयाशी तत्परतेने संपर्क साधावा.

**रवीन्द्र सबनीस**
मानद कार्यवाह

१४४) प्रा. विजयसिंग तुकाराम जाधव
मु. शेलकेवाडी,
पोस्ट केरेवाडी,
तालुका कवठे महाकाळ
जिल्हा – सांगली.

१४५) प्रा. अण्णा किसनराव डोईफोडे
संगमनेर महाविद्यालय,
संगमनेर,
जिल्हा – अहमदनगर
पिन ४२२ ६०५

१४६) प्रा. मारुतराव लक्ष्मणराव अंबे
संगमनेर महाविद्यालय, संगमनेर
जिल्हा – अहमदनगर
पिन ४२२ ६०५

१४७) प्राचार्य चंद्रसेन रामराव मोहिते
शिवाजी महाविद्यालय,
उदगीर, जिल्हा लातूर,
पिन ४१३ ५१७

१४८) प्रा. बन्सीकुमार कन्हैयालाल छाजेड
'आरती'
सरस्वती हौसिंग सोसायटी
विद्यानगरी, धुळे ४२४ ००१

१४९) प्रा. श्रीकांत कालिदास जोशी
गार्डन रोड, न्यू ब्लॉक्स,
अंमळनेर (जिल्हा–जळगाव)
पिन ४२५ ४०१

१५०) प्रा. सुनील गणेश ढेकणे
३ एरंडवणा, गोरे बिल्डिंग,
पुणे ४११ ००४

१५१) प्रा. सदानंद रामचंद्र नाडकर्णी
देवचंद कॉलेज,
अर्जुननगर (जिल्हा कोल्हापूर)
पिन ४१६ ००१

१५२) श्री. राजेन्द्र नीलकंठ कुलकर्णी
९, विश्रामबाग सोसायटी,
सेनापती बापट मार्ग,
पुणे ४११ ०१६

१५३) प्रा. दाऊद मोहंमद अल्ली मीठाणी
जुसब अपार्टमेंट, फ्लॅट नं. २०१
बाग रोड, अंधेरी (प.)
मुंबई ४०० ०५८

१५४) सौ. भाग्यश्री अजित रानडे
६६/७ डी, विधी महाविद्यालयासमोर,
पुणे ४११ ००४

१५५) प्रा. (सौ.) मेधा यशवंत जोशी
ए – १ अमरज्योती अपार्टमेंटस्,
व्ही. एन्. पुरव मार्ग,
चुनाभट्टी (पू.)
मुंबई ४०० ०२२

१५६) प्रा. रा. ना. भालेराव
प्रताप तत्त्वज्ञान केन्द्र,
ब्लॉक नं. १,
अंमळनेर, जिल्हा–जळगाव
पिन ४२५ ४०१

१५७) प्रा. एन्. टी. जाधव
अर्थशास्त्र विभाग,
प्रताप कॉलेज,
अंमळनेर, पिन ४२५ ४०१

१५८) श्रीमती ज्योत्स्ना व्ही. रजपूत
२/२९ चैतन्य कॉलनी,
नेहरू रोड, वाकोला ब्रिज,
सांताक्रूझ (प.)
मुंबई ४०० ०५५

१५९) प्रा. पु. के. सोमाशी
श्याम निवास, गोखले रोड,
नौपाडा, ठाणे,
पिन ४०० ०६१

१६०) प्रा. अवधूत नाडकर्णी
समर्थ सदन, सीझर रोड,
अंधेरी (प.)
मुंबई ४०० ०५५

१६१) श्री. मोरेश्वर पांडुरंग ताटके
लक्ष्मी निवास नंबर २, रुम नं. ९
घंटाळी पथ, नौपाडा,
ठाणे ४०० ६०२

१६२) प्रा. (सौ.) सुनिता मनोहर चिपळोणकर
१८।१ पोस्टल कॉलनी,
भागीरथी भुवन,
चेंबूर, मुंबई ४०० ०७१

१६३) प्रा. मुरलीधर प्रल्हाद कुलकर्णी
५४५, भास्कर भवन,
हेरंब (थेर) सेक्शन,
शिव मंदिर रोड,
अंबरनाथ (जिल्हा ठाणे)
पिन ४२१ ५०१

१६४) प्रा. (सौ.) रेखा तालमकी
सी।६, 'शीतल',
बँक ऑफ इंडिया स्टाफ सोसायटी,
रामनगर, ऑफ एस्. व्ही. रोड,
बोरिवली (प.)
मुंबई ४०० ०९२

■ ■

## मराठी अर्थशास्त्र परिषदेची प्रकाशने

**नी. वि. सोवनी** : अर्थसिद्धांत, आणखी चिकित्सक निबंध (१९७७), पृष्ठे २२६, किंमत रु. २०. (एकमेव विक्रेते : द कोल्हापूर रायटर्स को-ऑपरेटिव्ह सोसायटी लि. ४०–४९–इ, शाहूपुरी, सहावी गल्ली, कोल्हापूर १).

**मो. वि. भाटवडेकर** : शिक्षणाचे अर्थशास्त्र (१९७८), पृष्ठे १७८, किंमत रुपये २०. (वितरण व्यवस्था : व्हीनस प्रकाशन, तपश्चर्या, ३८१ क, शनिवार पेठ, पुणे ४११ ०३०).

**म. ग. बापट** : आंतरराष्ट्रीय व्यापार : सिद्धांत आणि धोरण (१९८२), पृष्ठे ३३३, किंमत रु. ५०. (वितरक : कॉन्टिनेंटल प्रकाशन, विजयनगर कॉलनी, पुणे ४११ ०३०).

## अर्थसंवाद : मागील वर्षांचे अंक

एप्रिल १९७७ पासून अर्थसंवादच्या प्रकाशनास प्रारंभ झाला. मागील वर्षांच्या अंकांच्या मर्यादित प्रती शिल्लक आहेत. ज्यांना –विशेषतः ज्या ग्रंथालयांना – त्या विकत हव्या असतील त्यांनी मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या मुंबई कार्यालयाशी तत्परतेने संपर्क साधावा.

**रवीन्द्र सवनीस**
मानद कार्यवाह

१४४) प्रा. विजयसिंग तुकाराम जाधव
मु. शेलकेवाडी,
पोस्ट कैरेवाडी,
तालुका कवठे महाकाळ
जिल्हा – सांगली.

१४५) प्रा. अण्णा किसनराव डोईफोडे
संगमनेर महाविद्यालय,
संगमनेर,
जिल्हा – अहमदनगर
पिन ४२२ ६०५

१४६) प्रा. मारुतराव लक्ष्मणराव अंत्रे
संगमनेर महाविद्यालय, संगमनेर
जिल्हा – अहमदनगर
पिन ४२२ ६०५

१४७) प्राचार्य चंद्रसेन रामराव मोहिते
शिवाजी महाविद्यालय,
उदगीर, जिल्हा लातूर,
पिन ४१३ ५१७

१४८) प्रा. बन्सीकुमार कन्हैयालाल छाजेड
'आरती'
सरस्वती हौसिंग सोसायटी
विद्यानगरी, धुळे ४२४ ००१

१४९) प्रा. श्रीकांत कालिदास जोशी
गार्डन रोड, न्यू ब्लॉक्स,
अंमळनेर (जिल्हा–जळगाव)
पिन ४२५ ४०१

१५०) प्रा. सुनील गणेश ढेकणे
३ एरंडवणा, गोरे बिल्डिंग,
पुणे ४११ ००४

१५१) प्रा. सदानंद रामचंद्र नाडकर्णी
देवचंद कॉलेज,
अर्जुननगर (जिल्हा कोल्हापूर)
पिन ४१६ ००१

१५२) श्री. राजेन्द्र नीलकंठ कुलकर्णी
९, विश्रामबाग सोसायटी,
सेनापती बापट मार्ग,
पुणे ४११ ०१६

१५३) प्रा. दाऊद मोहंमद अल्ली मीठाणी
जुसब अपार्टमेंट, प्लॉट नं. २०१
बाग रोड, अंधेरी (पं.)
मुंबई ४०० ०५८

१५४) सौ. भाग्यश्री अजित रानडे
६६/७ डी, विधी महाविद्यालयासमोर,
पुणे ४११ ००४

१५५) प्रा. (सौ.) मेधा यशवंत जोशी
ए – १ अमरज्योती अपार्टमेंटस्,
व्ही. एन्. पुरव मार्ग,
चुनाभट्टी (पू.)
मुंबई ४०० ०२२

१५६) प्रा. रा. ना. भालेराव
प्रताप तत्त्वज्ञान केन्द्र,
ब्लॉक नं. १,
अंमळनेर, जिल्हा–जळगाव
पिन ४२५ ४०१

१५७) प्रा. एन्. टी. जाधव
अर्थशास्त्र विभाग,
प्रताप कॉलेज,
अंमळनेर, पिन ४२५ ४०१

१५८) श्रीमती ज्योत्स्ना व्ही. रजपूत
२.२९ चैतन्य कॉलनी,
नेहरू रोड, वाकोला ब्रिज,
सांताक्रूझ (प.)
मुंबई ४०० ०५५

१५९) प्रा. पु. के. मोकाशी
श्याम निवास, गोखले रोड,
नौपाडा, ठाणे,
पिन ४०० ०६१

१६०) प्रा. अवधूत नाडकर्णी
समर्थ सदन, सीझर रोड,
अंधेरी (प.)
मुंबई ४०० ०५५

१६१) श्री. मोरेश्वर पांडुरंग ताटके
लक्ष्मी निवास नंबर २, रुम नं. ९
घंटाळी पथ, नौपाडा,
ठाणे ४०० ६०२